# दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास :

# (निवडक आत्मकथनांच्या संदर्भात)

**(Dalit Stree Likhit Aatmakathanancha Abhyas :**

**(Nivdak Aatmakathananchya Sandharbhaat)**

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


अभ्यासक

**घुरे दिप्ती कृष्णा**

हजेरी क्र. : 22P0190008

ABC ID : 774995786050

पी. आर. : 201809204

मार्गदर्शक

**जयेश गावकर**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# Dalit Stree Likhit Aatmakathanancha Abhyas :

# (Nivdak Aatmakathananchya Sandharbhaat)

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

## MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION


**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by

**Ghure Dipti Krishna**

Seat No: 22P0190008

ABC ID: 774995786050

PRA: 201809204

Under the supervision of

**Jayesh Gaonkar**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature


**Goa University**

**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, **"दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास : निवडक आत्मकथनांच्या संदर्भात"** is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Jayesh Gaonkar and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

**Ghure Dipti Krishna**

**Seat no: 22P0190008**

**Date:** 16/04/2024

**Place: Goa University**

# COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report **"दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास : निवडक आत्मकथनांच्या संदर्भात"** is a bonafide work carried out by Ms **Dipti Krishna Ghure** under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

**Jayesh Gaonkar**

Date: 16/04/2024

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

Dept Stamp

Date: 25/04/2024

Place: Goa University

# मनोगत

नवीन अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय वर्षासाठी प्रबंधिका लिहावी लागते. या प्रबंधिका लेखनासाठी ' **दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास : निवडक आत्मकथनांच्या संदर्भात'** हा मी विषय निवडला. या विषयावर अभ्यास करीत असताना मला अत्यंत आनंद होत आहे. या विषयावर अभ्यास करीत असताना अनेकांचे सहाय्य मला लाभले. या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

दलित स्त्री आत्मकथनांवर अभ्यास करण्याची प्रेरणा मला, माझ्या महाविद्यालयातील प्रा. कविता गावस यांच्याकडून मिळाली. महाविद्यालयात असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली उर्मिला पवार यांच्या 'आयदान' या आत्मकथनांवर प्रोजेक्ट सादर केला होता. दलित स्त्रियांविषयी अजून जाणून घेण्याची इच्छा मनात जागृत झाली आणि ती इच्छा पूर्ण करण्याची संधी मला इथे मिळाली. प्रा. कविता गवस यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे.

प्रा. पूर्वा वस्त मॅडम मार्गदर्शक म्हणून काही काळ  लाभल्या. त्यांचे सहकार्य मला खूप लाभदायक ठरले. प्रा. पूर्वा वस्त मॅडम यांचेही मी कृतज्ञता व्यक्त करते.

प्रा. जयेश गावकर, गोवा विद्यापीठ हे माझ्या या संशोधन प्रबंधिकेसाठी मार्गदर्शक म्हणून मला लाभले. सरांच्या मार्गदर्शनामुळेच माझ्या अभ्यासाला योग्य दिशा प्राप्त झाली आणि माझा अभ्यास पूर्णत्वास गेला. सरांनी केलेले मार्गदर्शन आणि सूचना मोलाच्या ठरल्या. सरांमुळे अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या तसेच साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण अधिक व्यापक झाला. त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यास शब्द अपुरे आहेत.

या अभ्यासासाठी मला गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयांची मदत झाली. गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी ग्रंथ उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. पणजीतील कृष्णादास श्यामा केंद्रीय ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी ग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचीही आभारी आहे. माझ्या या अभ्यासासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ज्या ज्या व्यक्तीने मला मार्गदर्शन, सहकार्य केले, प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभारी आहे.

# दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास:

# निवडक आत्मकथनांच्या संदर्भात

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरण | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| **Declaration** | | |
| **Completion certificate** | | |
| मनोगत | | |
| १. | प्रस्तावना | १ - ७ |
| २. | दलित साहित्य : संकल्पना स्वरूप आणि वाटचाल | ८ - १९ |
| ३. | मराठी दलित आत्मकथने आणि स्त्रियांची आत्मकथने | २० - ३८ |
| ४. | निवडक दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येणाऱ्या दलित आणि स्त्री जाणिवा | ३९ - ९५ |
| ५. | निवडलेल्या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास | ९६ - १०८ |
| ६. | निवडक स्त्री लिखित आत्मकथनांचे वाङ्मयीन मूल्यमापन | १०९ - ११८ |
| ७. | समारोप आणि निष्कर्ष | ११९ - १२३ |
| परिशिष्ट | | १२४ - १२५ |
| संदर्भ सूची | | १२६ - १२७ |

# प्रकरण १

# प्रस्तावना

# प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात एकूण साहित्यामध्येच काही परिवर्तने आली.साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला.स्वातंत्र्यानंतरच्या पंधरा-वीस वर्षाच्या काळात मराठी साहित्यात काही नवीन प्रवाह निर्माण झाले.

१९६० नंतर मराठी साहित्यात महत्त्वाची घडामोड झालेली आपल्याला आढळून येते. मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह दिसून येऊ लागले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, खिस्ती साहित्य, मुस्लिम साहित्य, बालसाहित्य, विज्ञान साहित्य, कामगार साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य, जन साहित्य, समकालिन साहित्य असे विविध प्रवाह उदयास आले. या प्रवाहातून मराठी भाषेतील साहित्य सकस आणि समृद्ध झाल्याचे दिसून येते. त्यातले दोन मुख्य टप्पे म्हणजे ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य हे दोन प्रमुख प्रवाह आहे. या प्रवाहाच्या आगमनाने साहित्यात खूप मोठा बदल दिसून येऊ लागला.पहिल्यांदा एकच एक साहित्य म्हणून पहात होतो, पण १९६० नंतर त्या त्या जाणीवातील लोक एकत्र येऊन लेखन करू लागले आणि त्यातूनच हे प्रवाह जन्माला आले.

भारतीय हिंदू समाजव्यवस्थेत वर्णव्यवस्था घालून दिलेली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार व्यवस्थेने ही वर्णमाला बनलेली आहे. ही व्यवस्था बनवणारा माणूसच त्यानीची ही व्यवस्था बनून त्या व्यवस्थेत इतर माणसांना नेमून दिले आहे. या वर्णव्यवस्थेत सर्वात शेवटचा वर्ण म्हणजे शूद्र. या वर्णात येणाऱ्या समाजाने वरील माणसाची सेवा, गुलामगिरी करणे हाच त्यांचा जन्माला येण्याचा उद्देश आहे असे वरील लोक समजतात. त्याचाकडूम आपली सर्व कामे करून घेतात. आपले गुलाम असल्या प्रमाणे त्यांना वागवतात. अस्वच्छतेमुळे समाज त्यांना अस्पृश्य म्हणून दूर ठेवू लागला. दारिद्र्य, यातना, गुलामगिरी इत्यादीचा त्याना सामना करावा लागला. याच अस्पृश्य समजातील लोकांना ‘दलित, मागासवर्गीय’ असे म्हणून समाज त्यांना ओळखू लागला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे दलित शोषित समाजात एक प्रचंड वैचारिक क्रांती झाली. दलित समाजाला शिक्षण देऊन शहाणे केल्याशिवाय त्यांच्यात जागृती होणार नाही म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजासाठी अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालये स्थापन केली. ’शिका व संघटित व्हा’ ही शिकवण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिली. दलित समाज शिक्षित झाला. हजारो वर्षापासून मुका असलेला समाज बोलू लागला. शिक्षण घेत असताना दलित तरुण स्वतंत्रपणे विचार करू लागले व तो विचार लेखणीने व्यक्तही करू

लागले. मराठी साहित्य वाचत असताना त्यांना जाणवून आले की दलित समाजा विषयी चुकीचं लिहिलेल आहे. साहित्यातून जे दुःख, वेदना दर्शवलेली आहे, त्या वेदनेपेक्षा आपली वेदना, आपले दुःख कितीतरी अधिक आहे व त्याचे चित्रण आपण सहज करू शकतो, असे त्यांना वाटू लागले. आपल्या मनातील दुःख, वेदना, विद्रोह इत्यादी सर्व साहित्यातून व्यक्त होऊ लागले. या अशा सर्व कारणामुळे दलित साहित्यनिर्मितीला प्रारंभ झाला.

१९६० मध्ये अनेक दलित लेखक,लेखिका लेखन करू लागल्या.दलित साहित्य हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. दलित साहित्यकांनी सर्वात प्रथम 'कविता' हा वाङ्मयप्रकार हाताळला व नंतर आत्मचरित्र, कथा, कादंबरी, नाटक असे इतर वाङ्मयप्रकार हाताळले. दलित साहित्यामध्ये कवितेच्या खालोखाल 'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार अधिक प्रमाणात पहावयास मिळतो. समाजातील शोषणाखाली भरडलेल्या व्यक्तीने स्वतःचे अनुभव, स्वतःचे जगणे अतिशय मोकळेपणाने कथन केलेले आहे. दलित लेखकाबरोबर लेखिकेने पण आत्मकथन हा प्रकार हाताळला आहे. त्यांनी आपल्या वेदना, दलित स्त्री आणि दलित जाणिवा आपल्या लेखनाच्या माध्यमातून व्यक्त केल्या आहेत. स्त्री म्हणून तिला भोगाव्या लागणाऱ्या वेदना त्याचप्रमाणे दलित स्त्री म्हणून समाज त्यांना कशाप्रकारे छळतो याचे दर्शन आत्मकथनांतून घडवलेले आहे. आर्थिक व सामाजिक प्रश्नांना या साहित्य प्रवाहाने अतिशय महत्त्व दिले आहे. दलित स्त्री आत्मकथनांतून लेखिकेनी माणसाच्या आर्थिक प्रश्नांना महत्त्व देऊन माणसाचे जगणे मांडलेले आहे.

**संशोधन विषयक समस्या**

इतर आत्मचरित्र किंवा आत्मकथनांहून दलित स्त्री आत्मकथने अधिक वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. याचे कारण म्हणजे त्यांच्या आत्मकथनांतून दलित स्त्रियांचे जगणे, त्यांचे दुःख, त्यांचे शोषण, त्यांचे कष्टी जीवनाचे दर्शन समाजासमोर आलेले आहे. दलित स्त्री आत्मकथनांतून दलित स्त्री जाणिवा व्यक्त झालेल्या आहेत. ही आत्मकथने वर्णव्यवस्थेवर भाष्य करताना दिसून येतात. एकूण दलित समाज, संस्कृती,दलित स्त्री जाणिवांवर भाष्य करणारी ही स्त्री आत्मकथने आहेत. ही आत्मकथने दलित समाजाचे चित्रण करत असल्याकारणाने सदर विषयात संशोधन पर अभ्यास होणे गरजेच आहे.

**संशोधनकार्याची उपयुक्तता / आवश्यकता**

आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक राजकीय व मानसिक दृष्टीने ज्याचे शोषण झाले असा हा मानवी समूह आहे. दलित समाज हा इतर समाजाहून वेगळा आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक राजकीय व मानसिक दृष्टीने ज्याचे शोषण झाले असा हा मानवी समूह आहे. इतर समाजाहून या समाजातील माणसांनी भरपूर भोगलेले, सोसलेले आहे. त्यामुळे या अभ्यासातून दलित स्त्री जाणीव समजून घेण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे भारतातील वर्णव्यवस्था व अस्पृश्यतेचा प्रश्न समजून घेण्याची आवश्यकता आहे. दलित समाज आणि सांस्कृतिक जीवनाची ओळख होणे गरजेचे आहे. यावरील कारणामुळे सदर विषयात संशोधन होणे गरजेचे आहे.

**संशोधनकार्यामागची उद्दिष्टे**

१. आत्मकथनांचे स्वरूप व वैशिष्ट्ये समजून घेणे.
२. दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येणाऱ्या दलित आणि स्त्री जाणिवा समजून घेणे.
३. दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येणाऱ्या दलित समाज आणि संस्कृतीचा आढावा घेणे.
४. दलित स्त्री आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास समजून घेणे.
५. दलित स्त्री लेखिकेने आत्मकथन हा प्रकार कशा पद्धतीने हाताळलेले आहे याचा विचार करणे.

**गृहीतकांची मांडणी**

१. दलित स्त्री आत्मकथनांतून वर्णव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट होते.
२. दलित स्त्री आत्मकथनांतून दलित संस्कृतीचे दर्शन होते.
३. दलित स्त्री आत्मकथनांतून दलित स्त्री जाणिवा व्यक्त झालेली आहे.
४. दलित स्त्री आत्मकथनांतून दलित समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेचा वापर केलेला दिसून येतो.
५. दलित लेखिकेने आत्मकथन हा प्रकार योग्य पद्धतीने हाताळलेला दिसून येतो.

**संशोधन पद्धती**

**१. वर्णनात्मक**

'दलित स्त्री लिखित आत्मकथने निवडक आत्मकथनांच्या अनुषंगाने' या विषयावर अभ्यास करत असताना दलित स्त्री आत्मकथनांतून दलित जाणिवा समजून घेण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापार होणार आहे. त्याचप्रमाणे दलित स्त्री जाणिवा समजून घेण्यासाठी या पद्धतीचा वापर होणार आहे.

**२. समाजशास्त्रीय**

दलित समाज समजून घेण्यासाठी त्यांच्या चालीरीती, परंपरा, संस्कृती इत्यादी समजून घेण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा वापर होणार आहे.

**संशोधनविषयक साहित्याचा आढावा**

दलित स्त्री लिखित आत्मकथने या विषयाचा अभ्यास करत असताना डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या स्त्री साहित्याचा मागवा खंड दोन या पुस्तकात त्यांनी दलित लेखिकेवर भाष्य केलेले हे आढळून येते. दलित आत्मचरित्रे हे शीर्षक देऊन त्यांनी या अंतर्गत १९५१ ते २००० या सर्व दलित स्त्रियांच्या आत्मचरित्राचे थोडक्यात परिचय करून दिलेला आहे. स्त्री आत्मकथने लिहिणाऱ्या सर्व लेखिकेचा उल्लेख डॉ. यशवंत मनोहर यांनी आंबेडकरवादी मराठी साहित्य या पुस्तकात केलेला आहे. मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा यात महत्त्वाच्या दतलि स्त्री लेखिकेवर भाष्य केलेले आहे. कुमुद पावडे, मुक्ता सर्वगोड, बेबी कांबळे, शांताबाई कांबळे यांच्या साहित्याचा उल्लेख केलेला आहे. डॉ.सदा कऱ्हाडे यांच्या दलित साहित्य चिकित्सा या पुस्तकात आत्मचरित्रांचा नावाने उल्लेख केलेला आढळून येतो. शरणकुमार लिंबाळे यांच्या भारतीय दलित साहित्य या पुस्तकात त्यांनी केलेली समीक्षा आढळून येते.ते म्हणतात दलित स्त्रियांचे दलितत्व दुहेरी असतं. एकतर ती स्त्री म्हणून व दुसरे दलित जन्म म्हणून. या दुहेरीपणातही तिला सातत्याने आत्मभान जागे ठेवावे लागते. प्राचार्य म.सु.पगारे यांनी दलित साहित्याच्या इतिहासावर भाष्य केलेले आहेत. यात त्याने दलित साहित्याचा इतिहास आरंभापासून मांडलेला दिसून येतो. त्यांनी निवडक आत्मचरित्राचा परिचय करून दिलेला आहे. त्यात मुक्ता सर्वगोड, कुमुद पावडे, बेबी कांबळे, या दलित लेखिकांच्या आत्मकथनावर भाष्य केलेले आढळून येते. डॉक्टर

रमेश धोंगडे यांच्या दलित आत्मचरित्र साहित्य आणि समाज या पुस्तकात दलित आत्मचरित्र आत्मकथन याची समीक्षा केलेली आढळून येते. यात त्यांनी 'जिणं आमचं' बेबी कांबळे याच्या आत्मकथनांचा सविस्तर रित्या मांडणी केलेली आहे. या आत्मकथनातील प्रत्येक प्रकरणावर त्यांनी भाष्य केलेले दिसून येते. कुमुद पावडे यांच्या अंत: स्फोट या आत्मकथानावर डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी त्यांच्या दलित आत्मकथन एक आकलन या पुस्तकात लेख लिहिलेला आढळून येतो. कुमुद पावडे यांचे 'अंत: स्फोट हे आत्मकथन छोटे असले तरी लेखिकेच्या भाव स्वभावामुळे ते प्रदीर्घ काळ स्मरणात राहणार' असे त्यांचे मत आहे. स्त्री आत्मकथनांचा थोडक्यात उल्लेख डॉ. अविनाश सांगोलेकर यांच्या दलित साहित्य: उगम आणि विकास या पुस्तकात आढळतो. डॉ.वासुदेव मुलाटे यांनी दलितांची आत्मकथने या पुस्तकात महत्त्वाच्या दलित स्त्री आत्मकथनावर संशोधनपर लेख लिहिलेले आढळतात. त्यांनी आत्मकथनांच्या समीक्षेचा व्याप समर्थपणे हाताळलेला आहे. डॉ. प्रतिभा अहिरे यांच्या समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने या पुस्तकात प्रकरण चौथे या अंतर्गत दलित स्त्रियांची आत्मकथने असा प्रकरण आलेला आहे. या प्रकरणात त्यांनी दलित इतिहासाविषयी थोडक्यात भाष्य केलेले आहे. त्याचप्रमाणे दलितांची व्याख्या, उत्पती, संकल्पना,दलित साहित्य या सर्व गोष्टींचा भाष्य केलेले आहे. डॉ. आरती कुसरे कुलकर्णी यांच्या दलित स्वकतने: साहित्य रूप या पुस्तकात त्याने दलित साहित्या विषयी भाष्य केलेले आढळून येते. स्त्री लेखिकेच्या साहित्याचा आढावा डॉ. अविनाश सांगोलकर यांनी दलित साहित्य: प्रवाह आणि प्रकार या पुस्तकात केलेले दिसून येते. नीलिमा गुंडी यांनी स्त्रीलिखित आत्मचरित्रे: चिकित्सक परामर्श शोधनिबंध लिहिलेला दिसून येतो. डॉ. रवींद्र पाटील यांनी दलित ग्रामीण आत्मकथनाची आशयसूत्रे यावर शोधनिबंध लिहिलेला दिसून येतो. शरणकुमार लिंबाळे यांच्या साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह या पुस्तकात सूर्यनारायण रणसुभे, प्रकाश खरात, प्रभाकर मांडे यांनी दलित साहित्य या विषयावर शोधनिबंध लिहिलेले आढळून येतात.

**व्याप्ती आणि मर्यादा**

कविता, कथा, कादंबरी, आत्मकथन, प्रवासवर्णन इत्यादी असे वेगवेगळे वाङ्मयप्रकार आहेत. या प्रकारातील आत्मकथन या प्रकारावर अभ्यास केलेला आहे. दलित आत्मकथन हे मोठे व्यापक क्षेत्र आहे. या क्षेत्रात अनेक लेखक, लेखिकेने आत्मकथन हा प्रकार हाताळलेला आहे. यातील स्वातंत्र्योत्तर कालखंडातील लेखिकेने लिहिलेली काही निवडक आत्मकथनांचा अभ्यास केलेला आहे.त्यात कुमुद पावडे यांनी अंत:स्फोट (१९८१),

मुक्ता सर्वगोड यांचे मिटलेली कवडे (१९८३), बेबी कांबळे यांचे जिणं आमचं (१९८६), शांताबाई कांबळे यांचे माझ्या जल्माची चित्तरकथा (१९८६) या आत्मकथनांचा अभ्यास केलेला आहे.

**'दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास : (निवडक आत्मकथनांच्या संदर्भात)'** हा अभ्यास पाच प्रकरणाद्वारे केला जाणार आहे. शेवटी समारोप व निष्कर्ष जोडण्यात येणार आहे. प्रबंधिकेचे पहिले प्रकरण **'दलित साहित्य : संकल्पना, स्वरूप व वाटचाल'** या प्रकरणामध्ये दलित साहित्याच्या पार्श्वभूमीचा अभ्यास केला जाणार आहे. त्याचप्रमाणे दलित कोणाला म्हटले जाते, दलित साहित्याची संकल्पना, व्याख्या व स्वरूप इत्यादींचा विचार केला जाणार आहे. तसेच दलित साहित्याच्या वाटचालीचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे **'मराठी दलित आत्मकथने आणि स्त्रियांची आत्मकथने'** यामध्ये 'आत्मचरित्र' या प्रकारचा थोडक्यात अभ्यास केला जाणार आहे. आत्मचरित्राची संकल्पना व विविध अभ्यासकांनी मांडलेल्या मताचा विचार केला जाणार आहे. त्याचप्रमाणे 'आत्मकथन' या प्रकाराचा अभ्यास केला जाणार आहे. आत्मकथनाची संकल्पना,व्याख्या, स्वरूप आणि वैशिष्ट्यांचा अभ्यास केला जाणार आहे. तसेच 'आत्मचरित्र व आत्मकथन' या दोन्ही प्रकारामधील फराकांची पडताळणी केली जाणार आहे. 'आत्मकथन' हा प्रकार आत्मचरित्राप्रमाणे भूतकाळात चालत नाही तर तो भूतकाळाबरोबर वर्तमान काळातही चालू असतो. मराठी दलित आत्मकथने आणि स्त्रियांच्या आत्मकथनांचा विचार केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे **'निवडक दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येणाऱ्या दलित आणि स्त्री जाणिवा'** या प्रकरणात निवडलेल्या चारही आत्मकथनांतील दलित आणि स्त्री जाणिवांचा अभ्यास केला जाणार आहे. सर्वात प्रथम दलित आणि स्त्री जाणीव कशाला म्हणतात हे पाहिले जाणार आहेत. चारही आत्मकथनांतून दलित स्त्रियांच्या शोषित जीवनाचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे **'निवडलेल्या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास'** असे आहे. या प्रकरणात तुलनात्मक साहित्यांची संकल्पना व स्वरूप इत्यादींचा विचार केला जाणार आहे. त्याचप्रमणें निवडलेल्या चारही आत्मकथनाची सर्व अंगाने तुलना करण्यात येणार आहे.

प्रकरण पाच **'निवडक स्त्री आत्मकथनांचे वाङ्मयीन मूल्यमापन'** या प्रकरणात निवडक स्त्रियांच्या वाङ्मयीन आत्मकथनांचे मूल्यमापन केले जाणार आहे. तसेच सत्यकथन, तटस्थवृत्ती, 'स्व'ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशल मांडणी, वस्तूस्थितीदर्शक निवेदक, या घटकाद्वारे मूल्यमापन केले जाणार आहे.

अशा पाच प्रकरणाद्वारे **'दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास : (निवडक आत्मकथनांच्या संदर्भात)'** हा अभ्यास करण्यात येईल. शेवटी समारोप व निष्कर्षाने या प्रबंधिकेची सांगता करण्यात येईल.

**-------------------------------------- xxxxxxxxxxxxxx ----------------------------------------**

# प्रकरण २

# दलित साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल

# प्रकरण २ : दलित साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल


प्रास्ताविक................................................................................................ ८

दलित सहित्याची पार्श्वभूमी.............................................................................. ९

२.१ दलित साहित्य संकल्पना................................................................................ ९

२.१.२ व्याख्या.............................................................................................११

२.२ दलित साहित्याचे स्वरूप...........................................................................१२

२.३ दलित साहित्याची वाटचाल.......................................................................१४

२.४ समारोप.............................................................................................१८

२.५ निष्कर्ष...............................................................................................१८

संदर्भ ग्रंथ...............................................................................................१९

# प्रकरण २ : दलित साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल

## प्रास्ताविक

इंग्रज राजवटीचा परिणाम संपूर्ण भारतावर झाला. या राजवटीमुळे संपूर्ण समाज व्यवस्था हादरून गेली.अव्वल इंग्रजी कालखंडाची प्रेरणा घेऊन स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह सुरू झाले.या वेगवेगळ्या वाङ्मयीन प्रवाहमुळे मराठी साहित्य अधिक समृद्ध झाले.

इंग्रजी राजवटीतून भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. समाजात शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली विशिष्ट समाजातील लोकांना शिक्षण मिळाले. समाजातील वेगवेगळ्या जाती-जमातीतील लोकांना शिक्षण मिळाले. शिक्षणाचा प्रसार हा ग्रामीण भागातही झाला. शिक्षणाचा लाभ सर्व समाजातील लोकांना झाल्यामुळे मराठी साहित्यात नवनवीन वाङ्मयीनप्रवाहाचा जन्म झाला. याविषयाचे विवेचन वर केलेले आहे. तरी १९६० नंतर उदयास आलेले दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, इत्यादी प्रवाहांची प्रामुख्याने नावे घेता येईल.

समाजातील सर्व लोकांना शिक्षण मिळाल्याने त्यांना आपल्यावर अन्याय होतो याची जाणीव झाली. शिक्षणामुळे समाज सुशिक्षित झाला. त्यांना 'स्व' ची जाणीव झाली. या जाणिवेतूनच आपले दुःख, वेदना, यातना, त्रास, अनुभव इत्यादी साहित्याद्वारे समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केला.

## दलित सहित्याची पार्श्वभूमी

भारत १९४७ साली इंग्रज राजवटीतून स्वतंत्र झाला. भारतातील लोकांना अनेक आश्वासन देण्यात आली होती विशेषतः दलित समजातील लोकांना. भारत स्वतंत्र झाला की देशातील सर्व सामाजिक प्रश्न सुटतील असे आश्वासन देण्यात आले होते. या स्वातंत्र्याचा लाभ विशिष्ट समाजातील लोकांना झालाच नाही. त्यांचे प्रश्न सुटण्याऐवजी ते अधिक गुंतागुंतीचे होत गेले. या लोकांच्या परिस्थितीत सुधारणा झालीच नाही. बहुजन समाजाकडून या लोकांना हीन दर्जाची वागणूक मिळाली. या समाजावर सवर्ण समाज आपला हक्क दाखवू लागला. या समाजातील लोकांना खूप वाईट तऱ्हेची कुत्र्या – मांजरापेक्षाही वाईट वागणूक मिळाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध प्रकारच्या चळवळीने या दलित समाजातील लोकांना जीवन जगण्याची दिशा दिली. आंबेडकरांनी या लोकांना शिक्षणाचे महत्त्व सांगून त्यांना शिक्षण दिले. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' या धोरणेने दलित समाज जागृत झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या प्रेरणेने व त्याच्या नेतृत्तामुळे दलित शोषित समाजातील लोकांमध्ये वैचारिक क्रांती झाली. १९५६ साली एक महत्त्वपूर्ण घटना घडली त्या घटनेमुळे या समाजातील लोकांचे जीवन बदलून गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने १९५६ साली दलित समाजातील लोकांनी मोठ्या प्रमाणात धर्मांतर केले. शोषित समाजातील लोकांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

धर्मांतर झाले त्याच वर्षी म्हणजे ६ डिसेंबर १९५६ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे हा संपूर्ण समाज हादरून गेला. त्यांना कुठेतरी उजेडाची किरणे दिसत होती त्या किरणाने काळोखाचे रूप धारण केले होते. या लोकांवर जे अत्याचार, बहिष्कार, हल्ले इत्यादी झाले त्यामुळे त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आणि याचं भावनेतून दलित चळवळीचा उदय झाला.

१९६० नंतर मराठी साहित्यात विविध प्रवाह उदयास आले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी .

## २.१ दलित साहित्य संकल्पना

दलित साहित्याचा उदय हा मराठी साहित्यातच नव्हे, तर भारतीय साहित्यात झाला. हे साहित्य नवे अनुभवविश्र्व व मूल्यात्मक संवेदना देणारी घटना आहे. दलित साहित्य ही संज्ञा घेऊन दलित लेखकांनी साहित्य चळवळ संपूर्ण

भारतात चालवली. दलित साहित्य समजावून घेण्याआगोदर 'दलित' ह्या शब्दाचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. 'दलित' या शब्दाचा पारंपरिक अर्थ म्हणजे जे दुःखानी गांजलेले, दुःखानी भरडलेले, चिरडलेले, दुःखानी दबलेले, दळलेले असा आहे. जन्मापासून शोषित म्हणजे 'दलित' या अर्थाने 'दलित' शब्द वापरला जातो. ज्याचा आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, मानसिक इत्यादी शोषण झालेले असते असा मानवी समूह म्हणजे दलित समूह होय. दलित साहित्य म्हणजे अशा लोकांचे साहित्य जे आर्थिक दृष्टया, सामाजिक चिरडले गेलेले आहे. दलित लेखक जो शोषणाविरुद्ध बोलतो, शोषणाविरुद्ध लिहितो, वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थावर आघात करतो त्याचप्रमाणे तो हिंदू धर्माला नाकारतो, तो दलित जीवनमूल्यांचे दर्शन घडवितो तो म्हणजे दलित लेखक व ती जाणीव म्हणजे दलित साहित्य.[1]

मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये दलितांच्या जीवनाबद्दल चांगले विचार केले नाही. दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध, त्यांना मिळालेली वागणूक इत्यादी विषयांवर फारसे लिहिले गेले नाही. त्यांनी भोगलेले जीवन, त्यांना आलेले अनुभव त्यांच्या जगण्या – मारण्याच्या प्रश्नांवर साहित्यनिर्मिती झाली नाही. त्याच्या जीवनाविषयी पोटतिडकिने कुठचे लिहिले गेले नाही. या उलट त्यांच्याविषयी खूप वाईट बोलण्यात आले. त्यांना वर्णव्यवस्थेच्या गळफासात भरण्यात आले. जेव्हा या समाजाला शिक्षण मिळाले तेव्हा त्यांच्यामधला आत्मभान जागृत झाला. दलित तरुण पिढीला वस्तुस्थितीचे भान आले. त्याच्यावर होणारा अन्यायची जाणीव झाली. त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. या भावनेतूनच दलित चळवळीला सुरुवात झाली. या चळवळीतूनच पुढे दलित साहित्य निर्मितीला सुरुवात झाली. दलित साहित्याची निर्मिती ही दलित चळवळीचे प्रतिक्रियात्मक असलेल्या चळवळीचे रूप आहे. दलित साहित्यिक हे प्रथम स्वतःला दलित चळवळीचे कार्यकर्ता समजतात व त्यानंतर स्वतःला साहित्यिक समजतात. या चळवळीतून दलित कवी, दलित कथाकार, दलित कादंबरीकार, दलित आत्मकथनकार, दलित नाटककार उदयाला आले.या साहित्य चळवळीचा संबंध प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष राजकीय, समाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने हजारो वर्ष मुका असलेला समाज बोलका झाला. शिक्षणाने हा समाज सुधारला. त्याच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार, शोषण, वागणूक इत्यादीविषयी आवाज उठवू लागले. समाजात जगत असताना त्यांना आलेले अनुभव, दुःख, वेदना इत्यादी इतरांना कळावे या हेतूने त्यांनी लेखन केले. यातूनच दलित साहित्य निर्मितीचा उदय झाला. दलित साहित्याचा उदय हा केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या

तत्तविचारातून झाला. दलित साहित्यात दलित लोकांची जीवन कहाणी अभियक्त करणारे साहित्य हे दलित साहित्य आहे. दलित साहित्य हे विद्रोहाचे, वेदनेचे, नकाराचे साहित्य आहे. हे साहित्य त्या विशिष्ट समाजाचे त्यांच्या अनुभवातून जन्माला आले. दलित साहित्य हे विद्रोहाचे साहित्य असेल तरी त्याचा हेतू एकच होता तो म्हणजे समाज परिवर्तन.

## २.२.२ व्याख्या

### १. म. ना. वानखडे

"दलित साहित्य माणसाला केंद्रबिंदू मानतो. माणसाच्या सुख, दुःखाशी समरस होते व माणसाला सम्यक क्रांतीकडे घेऊन जाते. माणसाच्या समूहाला म्हणजे समाजाला समतेची शिकवण देते. माणसाला महान मानते. दलित साहित्य हे माणसा – माणसात वैरभाव न पसरविता ते माणसा – माणसात प्रेम पसरविते".[२]

म. ना. वानखडे यांच्या मते दलित साहित्यात माणसाला केंद्रबिंदू मानले जाते. हे साहित्य माणसाच्या सुख, दुःखाशी एकरूप होऊन माणसाला क्रांतीकडे घेऊन जाते. दलित साहित्य हे माणसात शत्रुत्व न पसरवता माणसामध्ये प्रेम पसरवतो.

### २. बाबुराव बागूल

" माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान करणारे, वंश, वर्ण, आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य असते ते दलित साहित्य होय". [३]

बाबुराव बागूल यांच्या मते दलित साहित्य हे माणसाला महान बनवतात त्याचप्रमणे माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करते. माणसाने बनवलेल्या वर्णव्यवस्थेला विरोध करणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य.

### ३. गंगाधर पानतावणे

" दलित साहित्य म्हणजे मुक्तीगीत! दलित साहित्य म्हणजे आत्मशोध! दलित साहित्य म्हणजे नाकारलेल्या जीवनाचे दर्शन! दलित साहित्य म्हणजे मूलगामी जाणिवांचा नवा आविष्कार".[4]

गंगाधर पानतावणे यांच्या मते दलित साहित्य या समाजातील लोकांचे मुक्तीगीत आहे. दलित साहित्या मधून आपल्याला आत्मशोध दिसून येतो. त्यांना त्यांच्या 'स्व' ची जाणीव होते. सवर्ण समाजातील लोकांनी या लोकांना

दिले वागणूक याचे दर्शन आपल्याला दलित साहित्यात होते आणि या सर्वातून नवीन साहित्य जन्माला येते ते म्हणजे दलित साहित्य.

### ४. यशवंत मनोहर

“ बुध्दविचार हा क्रंतिविचार आहे. तो परिवर्तनाचा विचार आहे. क्रंतिविचार विश्र्वविचार आहे. विज्ञान हा क्रांतिविचार आहे. तो विश्र्वविचार आहे. दलित ही क्रांतिजाणीव आहे. ती विश्वजाणीव आहे. मराठीतील दलित साहित्य विश्वातील क्रंतिजाणिवेचा भाग आहे. ही क्रंतिजाणीव मराठीमध्ये आणि भारतामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने साहित्यविष्कारी होत आहे. या साहित्यविष्काराचेच दलित साहित्य हे नाव आहे”.[5]

यशवंत मनोहर यांच्या मते दलित साहित्य म्हणजे विश्वविचाराचे साहित्य. त्यांच्या साहित्याचा दर्जा त्यांनी भगवान बुध्द यांच्या क्रंतिविचाराशी जोडलेला आहे. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित समूह जागृत झाला. त्यांचे दृश्य आपल्याला दलित साहित्य दिसून येतात. बाबासाहेबाची विचारसरणी आपल्याला दलित साहित्यात दिसून येते.

उपरोक्त विवेचनाचा आधार घेतल्यास एक गोष्ट स्पष्ट जाणवते ती म्हणजे हजारो वर्ष मुका असलेला समाज बोलका होतो, त्यांना त्यांच्या ‘स्व’ ची जाणीव होते आणि या जाणिवेने समाज परिवर्तनासाठी, मुक्तीसाठी,त्या वेदनेने आलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.

## २.२ दलित साहित्याचे स्वरूप

दलित साहित्य हे केवळ मनोरंजन व्हावे या हेतूने कधीच निर्माण झालेले नाही. हे साहित्य निर्माण होण्या मागे एकच हेतू होता तो म्हणजे त्यांना आलेले अनुभव समाजाला कळावे. तसेच वर्णव्यवस्थेमुळे झालेल्या अन्यायातून मुक्त करणे व त्यांना योग्य दिशा देणे या हेतूने दलित साहित्याचा जन्म झाला व हे दलित साहित्याचे प्रयोजन म्हणून स्वीकारणे योग्य ठरले. दलित साहित्य हे अन्यायाविरुद्ध बंड पुकारून वर्ण आणि जाती व्यवस्थेला नकार देवून अस्तित्वात आले. बाबासाहेबांच्या शिकवणीतून या समाजाला आत्मभान आले. त्यांना त्याच्या ‘स्व’ ची जाणीव झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने या दलित साहित्याचा उदय झाला. माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळाली पाहिजे हा त्यांचा मुख्य उद्देश असतो.

आत्मशोध, नकार, विद्रोह, समूहमनाचे आविष्कारण, वेदना, या घटकांनी  दलित साहित्याचे स्वरूप विभागलेले आहे.

**१. आत्मशोध**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतून दलित साहित्य चळवळ उभी राहिली. दलित साहित्य चळवळीचा मुख्य हेतू म्हणजे समाजात माणसाला माणूस म्हणून आदर देण्याचा होता. विशिष्ट समाजातील लोकांचे सवर्ण समाजातील लोकांनी त्यांचे माणूसपण नाकारले. त्यांना अतिशय हीन दर्जाची वागणूक समाजाकडून मिळाली. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करण्यात आला. सवर्ण समाजातील लोक त्यांना आपले गुलाम समजत होते. आपला मालकी हक्क त्यांचावर गाजवीत होते. अशा वेळी विशिष्ट समाजातील लोकांना योग्य दिशा दाखवण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांना त्यांच्या अस्तित्वाची, 'स्व' ची जाणीव करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षणामुळे या समाजाला आत्मभान आले. दलित साहित्यातून आत्मभानाची जाणीव साहित्यातून अधिकप्रमाणात दिसून येते. दलित मुक्तीच्या लढ्यात मुख्य सूत्र एकच ते म्हणजे माणसाच्या आत्मसन्मानाचा.

**२. नकार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एकच ध्येय होते ते म्हणजे दलित  समाजातील लोकांमध्ये आत्मभान निर्माण करणे. त्यांना त्याच्या अस्तित्त्वाची जाणीव करून देणे. या वेगवेगळ्या गोष्टी घडवून आणत असताना वाटेत येणाऱ्या सर्व अडथळ्यांना नकार द्यावा लागायचा. वर्षानुवर्षे त्यांचावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार, विशिष्ट जातीत जन्माला आल्याकारणाने समाज  त्यांना हीन वागणूक द्यायचा, बहुजन समाज दलित समजतील लोकांना छळायचा इत्यादी अनेक गोष्टींना नकार दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने दलित समाजातील लोकांना आत्मभान आले. स्वतःवर होणाऱ्या शोषण, गुलामगिरी, अन्याय, अत्याचार इत्यादी गोष्टीना नकार देण्याची भूमिका दलित साहित्याने घेतली.

**३. विद्रोह**

बहुजन समाज व्यवस्थेविरुद्ध दलित साहित्याने विद्रोहाची भूमिका घेतली आहे. दलित साहित्यातून प्रकट होणारे विद्रोह व नकार हे या समजतील लोकांना त्याच्या 'स्व' ची जाणिव करुन देते. दलित समाज हजारो वर्ष मुका राहून

त्यांचे अन्याय, अत्याचार, गुलामगिरी सहन करत होते. त्यांना गुलाम ठेवू पाहणाऱ्या या व्यवस्थेविरुद्ध हा विरोध होता. हा दलित साहित्यातील विद्रोह हा केवळ एका व्यक्तीविषयी किंवा केवळ समाजाविषयी नाही तर हा विद्रोह असमानता या विषयी आहे. दलित समाजाला या असमानता विषयीचे चटके जीवन जगत असताना लागलेले आहे. या असमानता विषयी हा विद्रोह आहे.

**४. समूहमनाचे आविष्कारण**

दलित साहित्यातून एक महत्वपूर्ण जाणीव होते ती म्हणजे या साहित्यातून समूहमनाचे दर्शन घडते. दलित साहित्य हे असे साहित्य आहे ज्यात लेखक जरी स्वतः विषयी बोलत लिहीत असला तरी तो अनुभव असतो तो पूर्ण समूहाचा असतो. लेखकाला जीवन जगत असताना आलेले अनुभव हे समजतील इतर व्यक्तींचेही अनुभव असते. हे असे असण्यामागे कारण एकच ते म्हणजे संपूर्ण दलित समाज हा बहुजन समजतील लोकांकडून पिळला गेला आहे. या बहुजन समाजाकडून त्यांचे शोषण झाले आहे. जीवन जगत असताना त्यांना आलेले हे अनुभव ते एका व्यक्तीचे नसून संपूर्ण दलित समाजाचे आहे.

**५. वेदना**

बहुजन समाजातील लोकांनी विशिष्ट समाजातील लोकांना इतर माणसाप्रमाणे या समाजातील लोकांना माणूस म्हणून वागणूक दिली नाही. या उलट त्यांना खूप वाईट वागणूक दिली. सर्व क्षेत्रामधून त्यांचे शोषण झाले. दलित लोकांना त्यांनी जाती – जमातीवरून हीन दर्जाची वागणूक दिली. दलित साहित्याने समाज परिवर्तन करण्यासाठी या वर्णव्यवस्थेच्या विरोधात लढा दिला.

## २.३ दलित साहित्याची वाटचाल

मराठी साहित्यात १९६० नंतर महत्त्वाची घडामोड झालेली आपल्याला आढळून येते. १९६० नंतर साहित्यात आपल्याला वेगवेगळे प्रवाह दिसून येऊ लागले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, खिस्ती साहित्य, मुस्लिम साहित्य, बालसाहित्य, विज्ञान साहित्य, कामगार साहित्य, भटक्या विमुक्तांचे साहित्य, जन साहित्य, समकालिन साहित्य असे विविध प्रवाह उदयास आले. या प्रवाहातून मराठी भाषेतील साहित्य सकस आणि समृद्ध झाल्याचे दिसून येते. त्यातले दोन मुख्य टप्पे म्हणजे ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य हे दोन प्रमुख प्रवाह आहे. या प्रवाहाच्या आगमनाने साहित्यात खूप मोठा बदल दिसून येऊ लागला.

पहिल्यांदा एकच एक साहित्य म्हणून पहात होतो, पण १९६० नंतर त्या त्या जाणीवातील लोक एकत्र येऊन लेखन करू लागले आणि त्यातूनच हे प्रवाह जन्माला आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित समाज विकसित होऊ लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या समाजाला त्याने सुशिक्षित बनवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना त्यांच्या 'स्व' ची जाणीव करून दिली. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याया, अत्याचार, शोषण इत्यादी विरोध करायला शिकवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित समाजाची प्रेरणा स्थान ठरले.

दलित साहित्याचा उगम हा जरी १९६० मध्ये मानला जात असला तरी दलित साहित्याची सुरुवात ही १९२० पासन झालेली दिसून येते. १९२० आंबेडकर युग सुरू झाले तेव्हा पासून दलित समाज आपले विचार लेखनाच्याद्वारे व्यक्त करू लागले. त्याच काळात 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'प्रबुद्ध भारत' या नियकालिका द्वारे लेखन करू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने हजारो वर्ष मुका असलेला समाज बोलू लागला. आपले विचार लेखनाच्या माध्यमातून समाजासमोर मांडू लागला.

१९५६ साली एक दलित समाजात एक महत्त्वपूर्ण घटना घडली ती म्हणजे धर्मांतराची. दलित समाजाने हिंदू धर्माचा त्याग करून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. या घटनेने त्यांच्या लेखणीला आणि वाणीला नवे बळ दिले. त्याचं वर्षी एक दुःखत घटना घडते त्या घटनेने संपुर्ण दलित समाज हादरून जातो. ६ डिसेंबर १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपुर्ण दलित समाज दुःखात, शोकसागरात बुडून गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या समाजाला या नरकातून बाहेर प्रकाशाकडे नेणारी एक प्रेरक शक्ती होती. आता कुठेतरी हा समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हा समाज चांगला सुधारला होता. सामान्य माणसाप्रमाणे जीवन जगता येईल ही जी त्याच्यी इच्छा  त्यांचा निधनाने नष्ट झाली. त्यांच्या समोर अनेक प्रश्न येऊन उभे राहिले होते. त्यांचे दुःख, वेदना, इत्यादी कोणासमोर मांडायचे अशा अनेक प्रश्नांनी त्यांना घेरून घेतले. याच शोकात त्यांची चार वर्ष निघून गेली. त्यांचे दुःख, वेदना, अनुभव, शोषण इत्यादी हळू हळू शब्दातून बाहेर येऊ लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणीने त्यांनी पुन्हा एकदा लेखनाला सुरुवात केली आणि १९६० मध्ये त्याचे रूपांतर दलित साहित्य म्हणून मराठी साहित्यात रुजू झाले. दलित साहित्यिक आपले अनुभव, वेदना, दुःख, शोषण इत्यादी साहित्य द्वारे समजासमोर मांडू लागले. जीवन जगत असताना त्यांना 'दलित' असल्या कारणाने समाजात जीवन जगत असताना आलेले अनुभव साहित्यद्वारे समजा समोर आणले.

दलित साहित्य हे प्रस्थापित व्यवस्थेला आणि प्रस्थापित साहित्याला विद्रोही प्रतिक्रियेतून उदयास आले. त्याच्या विरुध्द खूप वाईट बोलण्यात आले, या प्रस्थापित मराठी साहित्याला विरोध दलित सुशिक्षित पिढीने केला आणि या द्वारे दलित साहित्य उदयास आले. दलित साहित्य हे या समाजातील लोकांच्या वेदनेचे साहित्य आहे. त्याचप्रमणे हे साहित्य त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार इत्यादी यांना नकार व विद्रोह करणारे साहित्य आहे. या साहित्याची एकच भूमिका होती ती म्हणजे त्यांना भोगाव्या लागलेले व्यथा, वेदना, दारिद्र्य, दुःख इत्यादी अनुभव त्यांनी घेतले ते सर्व अनुभव साहित्यातून व्यक्त करून, त्यांचावर ही वेळ, हे जीवन अनुभवावे लागले त्या समाजव्यवस्थेवर शब्दांनी वार करावा अशी भूमिका दलित साहित्याने घेतली.

दलित साहित्य काळानुसार वेगवेगळे वाङ्‌गयप्रकर सुरू झाले. दलित साहित्यिकांनी सर्वात प्रथम जो वाङ्मयप्रकार हाताळला तो म्हणजे ‘कविता’ हा प्रकार आहे. त्यानंतर इतर वाङ्मयप्रकार हाताळले जसे की आत्मकथन, कथा, कादंबरी, नाटक इत्यादी. १९६० पूर्वी दलित कविता लिहिण्यास सुरुवात झाली होती. ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’ या साप्ताहिकांतून व इतर नियतकालिकातून उदयास आली होती. दलित कवितेची नवी रूपे म्हणजे नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, दया पवार, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर इत्यादी कवीच्या कवितेतून पहावयास मिळते.

मराठी कादंबरीपेक्षा वेगळी कादंबरी म्हणजे दलित कादंबरी. दलित कादंबरीत आलेले अनुभव, त्यांनी जगलेले जीवन हे मराठी कादंबरीपेक्षा भिन्न आहे. दलित समाज आपल्या लेखनातून त्यांना त्यांचावर होणाऱ्या अन्यायविषयी समाजाला कळावे या हेतूने ते लेखन करता. अण्णा भाऊ साठे यांची ‘फिरकी’ कादंबरीतून अस्पृश्य व्यक्तींच्या पराक्रमाचे चित्रण करणारी आहे. बाबुराव बागुल, यशवंत मनोहर, अशोक लोखंडे, केशव मेश्राम, अशोक व्हटकर, बाबुराव गायकवाड इत्यादी दलित साहित्यिकाने दलित कादंबरीत आपले योगदान दिलेले आहे.

दलित साहित्यात कथा हा प्रकार अतिशय समृद्धपणे व्यक्त झाला आहे. ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’ या साप्ताहिकांतून दलित कथेला सुरुवात झाली. या साप्ताहिकांतून अनेक दलित कथा आढळून येतात. अण्णा भाऊ साठे हे दलित कथेतील श्रेष्ठ कथाकार आहे. त्यांच्या कथेतून आपल्याला सामाजिक जाणीव आणि ऐतिहासिक दृष्टिकोन दिसून येतो. त्याचप्रमाणे शंकरराव खरात, बाबुराव बागुल, वामन होवाळ, सुखराम हिवाळे, केशव मिश्राम, प्रकाश खरात, उर्मिला पवार इत्यादी दलित साहित्यिकाने मराठी दलित साहित्याचे दालन समृद्ध केले.

दलित आत्मचरित्र अथवा स्वकथने अथवा आत्मकथने हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यातच नव्हे तर भारतीय साहित्यात पण महत्त्वपूर्ण आहे. दलित साहित्यामध्ये देखील दलित आत्मकथनांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. दलित साहित्यिकांनी स्वतः चे अनुभव, स्वतः चे जगणे आत्मकथनांतून मोकळेपणाने कथन केले आहे. प्र. ई. सोनकांबळे, दया पवार, माधव कोंडविलकर, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, किशोर शांताबाई कांबळे, लक्ष्मण माने, कुमुद पावडे इत्यादी दलित साहित्यिकांनी आत्मकथन लिहून दलित प्रवाह समृध्द बनविला.

दलित साहित्यात इतर प्रकाराप्रमाणे नाटक हा प्रकारही विकसित झाला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचे ‘तृतीय रत्न’ हे नाटक दलित साहित्याचे प्रारंभी नाटक असे संबोधले जाते. त्यानंतर अनेक नाटके उदयास आली. दलित साहित्य चळवळी सोबत नाटके लिहिले जाऊ लागले. म. भि. चिटणीस, भि. शि. शिंदे, दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, प्रकाश त्रिभुवन, भगवान हिरे, योगिराज वाघमारे, अविनाश डोळसे, लक्ष्मण माने इत्यादी लेखकाने नाटक हा प्रकार हाताळला.

दलित साहित्यातून स्पष्टपणे दिसून येते ते म्हणजे दलित साहित्याने शोषित माणसाच्या प्रश्नांना महत्त्व देऊन व्यापक पातळीवर वाङ्मयनिर्मिती केली.

## २.४ समारोप

दलित साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल या प्रकणात सर्वात प्रथम दलित साहित्याची पार्श्वभूमी समजून घेतली. त्यानंतर दलित साहित्याची संकल्पना जाणून घेतली. त्यात ‘दलित’ या शब्दाचा अर्थ जाणून घेतला. ‘दलित’ कोणाला म्हटले जाते, दलित साहित्याची सुरुवात कशी झाली याचा अभ्यास केला. पुढे विविध अभ्यासकांनी ‘दलित’ साहित्यावर केलेल्या व्याख्याच अभ्यास केला. नंतर स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित साहित्याचा उदय झाला. दलित साहित्यिकांनी केवळ मनोरंजन व्हावं या हेतूने लेखन केले नाही. तर त्याचा लेखना मागे एकच उद्देश होतो तो म्हणजे त्यांना आलेले अनुभव समाजाला कळावे. त्यानंतर आत्मशोध, नकार, विद्रोह, समूहमनाचे आविष्कारण, वेदना या घटकांचा अभ्यास केला. पुढे दलित साहित्याच्या वाटचालीचा अभ्यास केला. त्यातून असे जाणवून आले की दलित साहित्याचा उगम हा जरी १९६० मध्ये मानला जात असला तरी दलित साहित्याची सुरुवात ही १९२० पासन झालेली दिसून येते. १९२० आंबेडकर युग सुरू झाले तेव्हा पासून दलित समाज आपले विचार लेखनाच्याद्वारे व्यक्त करू लागले.

## २.५ निष्कर्ष

१. दलित समाजावर होणारे अन्याय, अत्याचार, बहिष्कार, हल्ले  इत्यादीतून त्यांच्या मनात जी असुरक्षिततेची भावना निर्माण झाली त्यांतून दलित चळवळीचा उदय झाला.
२. दलित साहित्य निर्मितीचा उदय हा त्यांना आलेल्या अनुभवांतून, दुःखातून, वेदनेतून झाला. एकूण समाजाला ते कळावे या हेतूने साहित्याची निर्मिती झाली.
३. दलित साहित्यातून हजारो वर्ष मुका असलेला समाज बोलका झाला, त्यांना त्यांच्या ‘स्व’ ची जाणीव झाली आणि या जाणिवेतून समाज परिवर्तनासाठी, मुक्तीसाठी, साहित्य तयार झाले.
४. दलित साहित्यातील विद्रोह हा केवळ एका व्यक्तीविषयी किंवा केवळ समाजाविषयी नाही तर हा विद्रोह असमानतेविषयी आहे.
५. दलित साहित्यात लेखक जरी स्वतःविषयी बोलत, लिहीत असला तरी तो अनुभव त्याचा एकट्याचा नसून पूर्ण समूहाचा असतो.

६. मराठी साहित्य हे व्यक्तिगत होते, पण १९६० नंतर वेगवेगळा प्रवाह जन्माला आले. त्या त्या जाणिवेतील लोक एकत्र येऊन लेखन करू लागले आणि यातूनच प्रवाह जन्माला आले.

## संदर्भ ग्रंथ


१. लिंबाळे, शरणकुमार. "साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह." दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. क्र. ११७

२. निंबाळकर, वामन. "दलित साहित्य : स्वरूप व भूमिका." प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. क्र. १६

३. निंबाळकर, वामन. "दलित साहित्य : स्वरूप व भूमिका." प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. क्र. १६

४. कऱ्हाडे, स.दा. "दलित साहित्य चिकित्सा." स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०११, पृ. क्र. १०

५. मनोहर, यशवंत. "दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप." प्रबोधन प्रकाशन, औरंगाबाद, १९७८, पृ. क्र. ४२

६. सांगोलेकर, अविनाश. "दलित साहित्य : प्रवाह आणि प्रकार." प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८

७. पगारे, म.सु. "दलित साहित्याचा इतिहास." प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००५

८. गंधारे, द.के. "मराठी वाङ्मय प्रकार : स्वरूप संकल्पना व वाटचाल." शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१५

९. लुलेकर, प्रल्हाद. "वेदनांचा प्रदेश." कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०००


**------------------------------------ xxxxxxxxxxxxxxxx ------------------------------------------**

# प्रकरण ३

# मराठी दलित आत्मकथने आणि स्त्रियांची आत्मकथने

# प्रकरण ३ : मराठी दलित आत्मकथने आणि स्त्रियांची आत्मकथने


प्रास्ताविक............................................................. ...................................२०

चरित्र आणि आत्मचरित्र मधील फरक...................................................२१

३.१ आत्मचरित्राची संकल्पना...............................................................२१

३.१.२. व्याख्या......................................................................................२२

३.२ आत्मकथन संकल्पना व स्वरूप......................................................२३

३.२.२. व्याख्या......................................................................................२५

३.३. स्वरूप...........................................................................................२६

३.४. आत्मकथनांची वैशिष्टये.................................................................२८

३.५. आत्मचरित्र व आत्मकथन या मधील फरक.......................................३०

३.६. मराठी दलित आत्मकथने...............................................................३१

३.७. दलित स्त्रियांची आत्मकथने............................................................३४

३.८ समारोप..........................................................................................३७

३.९ निष्कर्ष..........................................................................................३७

संदर्भ ग्रंथ..........................................................................................३८

# प्रकरण ३ : मराठी दलित आत्मकथने आणि स्त्रियांची आत्मकथने

## प्रास्ताविक

मराठीत चरित्र, आत्मचरित्र आणि आत्मकथन असे नवीन वाङ्मयीनप्रवाह उदयास आले. हे तिन्ही प्रकार जरी ऐकायला समान असले तरी हे तिन्ही प्रकार भिन्न आहेत. 'आत्मकथन' हा प्रकार दलित साहित्यिकांनी पुढे आणलेला आहे. मराठीत १९६० नंतर आत्मकथन या वाङ्मयीनप्रवाहाला सुरुवात झाली. मराठीतील पहिले पुस्तक रूपात आलेले आत्मकथन म्हणजे दया पवार यांचे 'बलुतं' हे 'आत्मकथन' होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे मराठीतील दलित आत्मकथनकारांची प्रेरणा आहे. त्यांच्या प्रेरणेने हजारो वर्ष मुका असलेला समाज बोलका झाला. त्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराना विरोध करण्यासाठी ही आत्मकथने उदयास आली.

दलित समाजातील साहित्यिकांनी त्यांच्या स्वतःच्या अनुभवांना आकार देण्यासाठी ही आत्मकथने लिहिली. वर्णव्यवस्थेमुळे समाजात ते कसे भरडले गेले, जीवन जगत असताना त्यांना आलेले अनुभव, दुःख, वेदना, यातना इत्यादी सर्व वाचकांना समजावे या हेतूने त्यांनी आत्मकथने लिहिली. विशिष्ट समाजात जन्माला आल्याकारणाने समाज त्यांना कशाप्रकारे हीन वागणूक देतो हे वाचकांना कळावे या उद्देशाने त्यांनी आत्मकथने लिहिली. 'आत्मकथन' या प्रकाराचे एक वैशिष्ट्य म्हणजे लेखक स्वतःविषयी सांगत असतो पण सांगत असताना स्वतःला विशिष्ट समाजाचे प्रतिनिधित्त्व करून सांगत असतो. आत्मकथनकार स्वतः विषयी कमी आणि समष्टी विषयी जास्त बोलत असतो. हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आपल्याला 'आत्मकथन' या प्रकारात दिसून येते.

दलित चळवळीच्या माध्यमातून 'आत्मकथन' या प्रकाराचा जन्म झाला. अनेक दलित लेखक आपले अनुभव लेखनातून सांगू लागले. अनेक दलित लेखकांनी आपले दुःख आत्मकथनाद्वारे समाजासमोर मांडले. दलित आत्मकथन हे मोठे व्यापक क्षेत्र आहे. या क्षेत्रात अनेक साहित्यिकांनी लेखन केले आहे. लक्ष्मण माने यांचे 'उपरा', लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या', किशोर शांताबाई काळे यांचे 'कोल्हट्याचं पोर', शंकरराव खरात यांचे 'तराळ-अंतराळ', द. शि. सवाखंडे यांनी 'मरणकाळा', प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी', माधव कोंदविलकर यांचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' इत्यादी ही काही महत्त्वाची आत्मकथने लिहिलेली आहे. ज्या प्रकारे दलित पुरुषांनी आत्मकथने लिहिली, त्याचप्रमाणे अनेक दलित स्त्रियांनीही आत्मकथने लिहिली. दलित स्त्री

आत्मकथनांनी एकूण आत्मकथन या प्रकाराला एका वेगळयाच स्तरावर नेले. स्त्री आत्मकथनांमुळे, 'आत्मकथन' या प्रकाराला एक वेगळाच आशय प्राप्त करून दिला आहे.

पहिले मराठीतील दलित स्त्री आत्मकथन म्हणून कुमुद पावडे ह्यांचे १९८१ सालात आलेले अंत:स्फोट या आत्मकथनांचा उल्लेख केला जातो. पुढे अनेक दलित स्त्रियांनी आत्मकथने लिहिली. मुक्त सर्वगोड यांनी 'मिटलेले कवाडे', शांताबाई कांबळे यांनी 'माझ्या जल्माची चित्तरकथा', बेबी कांबळे यांनी 'जिण अमचं', जनाबाई कचरू गिऱ्हे यांनी 'मरणकळा', उर्मिला पवार यांनी 'आयदान' इत्यादींचा उल्लेख करता येईल. दलित स्त्री आत्मकथमुनांळे मराठी आत्मकथनांना एक नवी दिशा मिळाली.

## चरित्र आणि आत्मचरित्र मधील फरक

मराठी वाङ्मयाचा इतिहास पाहिला तर मराठी वाङ्मयात अनेक प्रकार आहे जसे की कथा, कादंबरी, कविता, नाटक इत्यादी. त्याचप्रमाणे 'आत्मचरित्र' हा मराठी वाङ्मयाचा एक प्रकार आहे. चित्राला जवळ जाणारा हा वाङ्मयप्रकर असला तरी अनेक गोष्टीमुळे हा प्रकार वेगळा ठरतो. 'आत्मचरित्र' हे लेखक स्वतःच लिहित असतो पण चरित्रात मात्र एखाद्या व्यक्तीचे चरित्र दुसरा व्यक्ती लिहीत असतो. आत्मचरित्रात स्वतः लेखक म्हणजेच आत्मचरित्रकार त्या आत्मचरित्राचा नायक असतो. तो अपल्या जीवनातील घटना, प्रसंग, आठवणी इत्यादी मांडत असतो. पण चरित्रात एखादा दुसरा व्यक्ती ज्याला जे माहीत असते, एकलेले असत ते तो टिपत असतो. आत्मचरित्र हे एखादा व्यक्ती आयुष्याच्या शेवटच्या टप्यात लिहीत असतो. तर चरित्र हे एखाद्याच्या मृत्यु नंतर लिहिले जाते. चरित्र व आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारातील हा फरक दिसून येतो.

## ३.१ आत्मचरित्राची संकल्पना

'आत्मचरित्र' हा शब्द इंग्रजीतील 'Autobiography' या शब्दावरून आला आहे. आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मयप्रकाराहून वेगळा आहे. निरनिराळ्या वाङ्मयप्रकारापैकी 'आत्मचरित्र' हा प्रकार म्हटलं तर सोपा,म्हटलं तर अवघड दोन्ही स्वरूपाचे आहे. सर्वात सोपा कशा अर्थाने तर इतर वाङ्मयप्रकाराप्रमाणे म्हणजे कथा, कादंबरी, नाटक, इत्यादी प्रकारात लेखकाला आपल्या कल्पनाशक्तीची फारशी आवश्यकता भासत नाही. तर सर्वात अवघड या अर्थाने आत्मचरित्र लेखनासाठी तीव्रता व दीर्घ अध्ययन आवश्यक असते. या प्रकारात स्वतःच स्वतःचे प्रतिबिंब

आरशात पाहण्यास माणूस जितका एक रूप होतो, तितका दुसऱ्याचे प्रतिबिंब पाहण्यास एकरूप होत नाही. हाच महत्त्वाचा फरक अपल्याला या वाङ्मयप्रकारात दिसून येतो.

'आत्मचरित्र' या प्रकारात स्वतः लेखक आत्मचरित्राचा केंद्रबिंदू असतो. लेखक आपल्या जीवनातील घटना, प्रसंग, आठवणी इत्यादी गोष्टीची नोंद करीत असतो. आयुष्यातील सर्वच घटना, प्रसंगाची नोंद करणे गरजेच नाही. नोंद करत असताना लेखक आवश्यक नसलेल्या घटना टाळू शकतो. हे स्वतंत्र्य आत्मचरित्रकाराकडे असत.

'आत्मचरित्र' लिहिण्यामागचा आत्मचरित्रकराचा एकच हेतू असतो तो म्हणजे आपल्या मनातील भावना, जीवन जगत असताना जे अनुभवल, दुःख, सुख इत्यादी सर्व आत्मचरित्रात सांगून आपला ताण मुक्त करण्यासाठी तो लेखन करीत असतो. आपले जीवन इतरांना कळावे ही त्यांची इच्छा असते. आत्मचरित्र लिहिण्याची परंपरा ही प्राचीन काळापासन चालत आलेली आहे. मराठीतील पहिले आत्मचरित्र हे व्याकरणकार 'दादोबा पांडुरंग तर्खडकर' यांनी लिहिलेले आहे. आत्मचरित्र लिहिण्यामागचा आत्मचरित्रकाराचा अजून एक हेतू म्हणजे या लेखनाच्या माध्यमातून लेखक ज्या काळात जगला व त्या काळाचा इतिहास समाजासमोर यावा याच हेतूने लेखन केले जाते. आत्मचरित्र हा प्रकार स्वतःच आपल्या जीवनावर स्वतःच लिहायचे असते. इथे लिहिणारा आणि ज्या विषयावर लिहिले जाते तो एकच व्यक्ती असल्या कारणाने इथे स्तयदर्शनाला अधिक महत्व असतो.

## ३.१.२. व्याख्या

### १. डॉ. स. दा. कऱ्हाडे

" स्वतःच्या जीवनाचे दुरुस्तपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले निवेदन म्हणजे आत्मचरित्र." [1]

### २. प्रा. रा. ग. जाधव

" आपल्या जीवनविषयक अनुभवाचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखकाने लेखनरुपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र." [2]

### ३. डॉ. विमल भालेराव

" स्वतःचे जीवन तटस्थपणे नेहाळून त्यातून आवश्यक त्या बाबींची निवड करून त्यांचे प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यातून स्वचित्रण रेखाटने म्हणजे आत्मचरित्र." [3]

वरील व्याख्यांचा विचार करता जाधव यांच्या मते एखाद्या व्यक्ती जो आत्मचरित्र लिहितो त्यांनी त्याच्या जीवनातील सर्व बऱ्या वाईट अनुभवांचे चित्रण करावे. आत्मचरित्रात एकूण त्यांच्या स्वभावाचे दर्शन लेखन स्वरूपात वाचकांसमोर यावे. त्याचप्रमाणे डॉ. विमल भालेराव यांच्या मते आत्मचरित्रकाराने स्वतःला नीट पारखून आवश्यक असलेल्या घटनांची निवड करायला पाहिजे आणि ते निवेदन प्रांजळ प्रामाणिक असायला हवे.

वास्तविक पाहता 'आत्मचरित्र' म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील घटना, प्रसंग, आठवणी इत्यादी वयाच्या शेवटच्या टप्प्यात आठवण करून लिहिणे म्हणजे आत्मचरित्र.

'आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकरा पाठोपाठ मराठी साहित्यात 'आत्मकथन' हा प्रकार आला.

## ३.२ आत्मकथन संकल्पना व स्वरूप

मराठी साहित्यातील इतर वाङ्मयप्रकाराहून 'आत्मकथन' हा प्रकार इतराहून वेगळा आहे. हा प्रकार प्राचीन काळापासून चालत आलेला नसून अगदी अलीकडच्या काळापासून सुरू झालेला आहे. या वाङ्मयप्रकाराचा उदय हा दलित लेखकांनी केला. दलित साहित्यिकांनी या प्रकाराला पुढे आणले. त्यांनी या साहित्याला अधिक समृद्ध व संपन्न केले. एकंदरीत 'आत्मकथन' म्हणजे काय तर एखाद्या व्यक्तीने आपल्या जीवनात भोगलेली दुःख, सुख, वेदना, आठवणी इत्यादी यांचे कथन करणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित समाज अधिक समृद्ध झाला. त्यांच्या नेतृत्वाखाली दलित लोकांना शिक्षण मिळाले. हजारो वर्षे पासून हा समाज अस्पृश्यतेच्या नावाखाली दबला गेला, वर्णव्यवस्थेच्या नावाने समाजाकडून त्यांना हिन वागणूक मिळाली. हजारो वर्ष मुका असलेला हा समाज शिक्षणाने बोलका झाला. आपल्या लेखनातून आपले विचार, वेदना, दुःख, सुख इत्यादी समाजाकडे पोहचवू लागला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे या समाजाला शिक्षण मिळाले. शिक्षणामुळे हा समाज अधिक समृद्ध झाला. समाजाकडून आपल्याला वाईट वागणूक मिळते यांची जाणीव झाली व त्यामुळे ह्या लेखणीच्या माध्यमाने ते आपले विचार, अनुभव  लोकांपर्यंत आत्मकथनांच्या माध्यमातून पोहचवू लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने दलित सुशिक्षित समाज लेखन करू लागला. लेखनाच्या माध्यमातून आपले जीवन व्यक्त करून आपले दुःख हलके करू लागले. आपल्या जीवनातील दुःख, वेदना, विद्रोह इत्यादी

साहित्यातून हा समाज मांडू लागला. आपल्या आयुष्यातील वेदना, जाणिवा इत्यादी मांडण्यासाठी या समाजाला 'आत्मकथन' हा प्रकार अधिक जवळचा भासू लागला. यांच जाणिवेने अनेक आत्मकथने जन्माला आली.

'आत्मकथा' व 'आत्मकथन' हे दोन्ही प्रकार समान असल्यासारखे वाटते पण या दोन्ही प्रकारांमध्ये भिन्नता आहे. दोन्ही प्रकारात लेखक कथनच करीत असतो पण या दोन्ही प्रकारात फरक आहे. 'आत्मकथा' या प्रकाराला कुठे तरी शेवट असते. म्हणजे त्या कथेला कुठे तरी शेवट असते पण आत्मकथनांत तसे नाही. 'आत्मकथन' हा प्रकार सदैव चालूच असतो. 'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार वाचकाला अधिक हृदयस्पर्शी वाटतो. करण हा प्रकार वास्तवाशी निगडीत असतो. या प्रकारात वास्तवाचे दर्शन होते. आत्मकथनकार ज्या समाजात जन्माला आला त्या समाजाचे चित्रण आत्मकथनांत असते. लेखकाच्या अवती- भोवती जे घडत, लेखकाला समाजात जगत असताना आलेले अनुभव, त्यांच्या जीवनात जे बरे वाईट प्रसंग आले त्यांचे चित्रण लेखक आपल्या आत्मकथनांत करत असतो.

'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार विशिष्ट समाजातील लोकांनीच हाताळलेली आहे. त्यामुळे विशेषता या वाङ्मयप्रकारात दारिद्र्याचे व भुकेचे चित्रण आलेले आहे. आत्मकथनांत 'मी' चे दर्शन घडते. 'मी' ने भोगलेले, 'मी' ला जाणवलेले, 'मी' चे जगणे त्या आत्मकथनांत व्यक्त होत असते. इथे 'मी' आपल्या जगण्या बरोबर समष्टीचे रूप धारण करतो. आपण जे भोगतो तेच समष्टीही भोगत असते. आत्मकथनांत आत्मकथनकार आपल्या बरोबर स्माष्टीचे दर्शन घडवतो. तो आपल्या पुरतीच मर्यादित राहत नाही तर आपल्या बरोबर समाजाचा विचार करतो. 'आत्मकथन' या शब्दाची जर आम्ही फोड केली तर 'आत्म' हा शब्द 'आत्मन' या शब्दापासून तयार झाला. यांचा अर्थ स्वतःने केलेले कथन म्हणजे 'आत्मकथन'.

'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार कोणाला बोध करण्यासाठी या उद्देशाने लिहिले जात नाही. तर 'आत्मकथन' या प्रकारांतून आत्मकथनकाराचे जीवन, त्यांची जडण-घडण हे अपेक्षीत असते. आत्मकथनांतून प्रामुख्याने आम्हाला जाणवते ते म्हणजे आत्मकथनकार जगण्यासाठी धडपडत असतो. जगण्यासाठी ज्या ३ मूलभूत गोष्टीची गरज असते ते म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा या महत्त्वाच्या गरजेसाठी ते लढताना दिसतात. त्याचप्रमाणे समाज त्यांच्या बरोबर कसा वागतो, समाज विशिष्ट समाजातील लोकांना कसा छळतो यांचे दर्शन आत्मकथनांत दिसून येते.

### ३.२.२. व्याख्या

**१. डॉ. स. दा. कऱ्हाडे**

" स्वतः चे चरित्र लिहावयाचे एक प्रकारचे आत्मनिवेदन आत्म्प्रकटीकरण आत्मकथन करण्यासारखे आहे." [4]

**२. डॉ. यशवंत मनोहर**

३. " दलित आत्मकथन म्हणजे दलित आत्म्पर लिखाण होय." [5]

**४. प्रा. चंद्रकुमार नगले व डॉ. गंगाधर पानतावणे**

" कथन हे सत्याचे प्रतीक आहे." [6]

वरील व्याख्यांचा विचार करता दैनंदिन जीवन जगत असताना त्यांच्या वाट्याला दलित असल्या करणारे अनेक दुखाना सामोरे जावे लागते. समाजात जगात असताना त्यांना त्याच्यावर होणारा अन्याय याची त्यांना जाणीव होते. या जाणिवेतून ते स्वतः विषयी आणि विशिष्ट समाजाविषयी होणारा अन्याय लेखनातून मांडण्याचा प्रयत्न करणारे साहित्य म्हणजे दलित आत्मकथन

**५. लक्ष्मणशास्त्री जोशी**

" भारतीय समाज – जीवनात संस्कृतीच्या नावाखाली जो समाज तुडविला गेला, ज्याला रीतिरिवाज, परंपरा व नितीमूल्यांच्या नावाखाली हिंदू समाजाने दास म्हणून वागवले त्या समाजाच्या, भावनेचा कोंडीचा, पिढ्यान् पिढ्या मुक्या असणाऱ्या मनांचा वेदनांचा शब्दविष्कार म्हणजे 'आत्मकथन' होय." [7]

**६. रा. ग. जाधव**

" आत्मा दुखवल्यामुळे, स्वतत्वाचे भान घेऊन स्वतःच्या व स्वसमाजाला अस्तित्वाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी व्यक्तिजीवनाला मर्यादेत समाजजीवनाची उत्तरे वेशीवर टांगणारी आणि 'स्व' व स्वेतंराचे प्रबोधन घडवण्याचे कार्य करणारे साहित्य म्हणजे दलित आत्मकथन." [8]

वरील व्याख्यांचा विचार करता रा. ग. जाधवांच्या मते दलित लोकांना त्यांच्या 'स्व' ची जाणिव होते. त्या जाणिवेतून प्रश्न निघतो तो म्हणजे माझ्या जगण्याचा अर्थ काय आहे? तेव्हा दलित असल्याकारणाने त्यांच्या वाट्याला आलेली दुःखे, वेदना, यांची जाणीव या समाजाला होते. त्यांच्याबरोबर खूप वाईट होत आहे याचा त्यांना आत्मभान होतो. या आत्मभानांतूनच ते समाज व्यवस्थेला नकार देण्यासाठी लढतात आणि त्यातूनच 'आत्मकथन' साहित्य प्रकारचा उगम होतो. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचीही व्याख्या जाधवच्या व्याख्येच्या जवळ जाणारी आहे. त्याच्या मते समाज व्यवस्थेच्या नावाखाली या दलित सामजाची पिळवणूक केली जाते. हजारो वर्षे गप्प राहून मुकेपणाने तो अत्याचार शांतपणे सहन केला. पण जेव्हा त्यांना त्यांच्या 'स्व' ची जाणीव होते तेव्हा त्या मुकेपणी  सहन करत आलेली वेदना शब्दरूपात समाजासमोर येते त्याला 'आत्मकथन' म्हटले जाते.

संशोधकाच्या मते विशिष्ट समाजातील लोकांना जीवन जगत असताना सवर्ण समाजाकडून मिळालेले अनुभव, दुःख, वेदना, इत्यादी सर्व वास्तव रुपात स्वतःचे जीवन कथन करणे म्हणजे 'आत्मकथन' होय.

## ३.३. स्वरूप

२१ व्या शतकात 'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यात उदयास आला. 'आत्मकथन' हा प्रकार मराठीत आत्मचरित्रामागे आला. तरी 'आत्मकथन' या प्रकाराने मराठी साहित्याचे दालन अधिक समृद्ध केले.

'आत्मकथन' म्हणजे स्वतःला व्यक्त करणे होय. 'आत्मकथन' या प्रकाराची चिकित्सा करता मोठ्या प्रमाणात आत्मकथनांत आत्मकथनकाराचे दुःखच अलेले दिसून येते. लेखकाच्या मनातील घुसमट, भोगलेले  आयुष्य लेखनाच्या माध्यमात उतरून काढतो व आपले मन हलके करतो. आपण जे जीवन जगलो ते इतरांना समजावे यासाठी आत्मकथन लिहिले जाते. 'आत्मकथन' हे मनोरंजनासाठी लिहिले जात नाही. आत्मकथनांचा खरा उद्देश इतरांना त्यांचे जीवन कळावे, त्यांची दुःखाची कहाणी कळावी हा असतो. समाजात त्यांना मिळालेली वागणूक, त्यांनी घेतलेले अनुभव, जगत असताना त्याला होणाऱ्या वेदना, विशिष्ट समाजात जन्माला आल्याकरणाने इतर समाजाकडून होणारा अपमान, त्रास इत्यादी समस्यांचा पट आत्मकथनांतून सांगितला जातो.

'आत्मकथन' या वाङ्मयप्रकाराला दोन अंगे आहेत. एक म्हणजे 'भौतिक अंग' आणि दुसरे 'आत्मिक अंग'. आत्मकथनकाराच्या जीवनात जे घडते, घटनाप्रसंग, या सर्व गोष्टींना भौतिक अंग असे म्हटले जाते. जेव्हा या घटना घडतात, त्या दरम्यान लेखकाच्या मनात आलेला विचार, राग, द्वेष, भावना इत्यादींना आत्मिक अंग असे म्हटले जाते.

'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार प्रमुख ५ घटकांनी विभागलेला आहे. ते म्हणजे सत्यकथन, तटस्थवृत्ती, 'स्व' ला केंद्रस्थान, घटकाची निवड व कुशाल मांडणी आणि वस्तुस्थितीदर्शक निवेदन अशा प्रकारे विभागलेले आहे.

### १. सत्यकथन

आत्मकथनांत सत्यकथन हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. सत्यकथनामुळेच आत्मकथन अधिक प्रभावी बनते. आत्मकथन हे स्वतः लेखकाचे असल्या कारणाने लेखक हा आत्मथनाचा नायक असतो. आत्मकथनांत जे घटना-प्रसंग, आलेले असतात ते सगळे प्रसंग लेखकाशी निगडीत असतात. त्यामुळे आत्मकथनांत आलेल्या सर्व घटना प्रसंगाचा प्रत्यक्ष स्वतः लेखक साक्षीदार असतो. आणि स्वतः लेखक साक्षीदार असलेल्याकारणाने आत्मथनांत सत्याचा खराखुरा आविष्कार घडतो.

### २. तटस्थवृत्ती

तटस्थवृत्ती हा आत्मकथनांचा दुसरा महत्त्वाचा टप्पा आहे. जर आत्मकथनकार हा निष्पक्ष असेल तरच आत्मकथन योग्य पद्धतीने त्याला मांडता येईल. त्याला जे मांडायचे आहे ते तो चांगल्या पद्धतीने मांडेल. आत्मकथनकाराला तटस्थ असणे महत्त्वाचे आहे. आत्मकथनकाराचे लेखन हे प्रांजळ, प्रामाणिक असणे गरजेच आहे. त्यांचे लेखन हे सरळ हवे. आत्मकथनकाराला स्वतःचे आत्मनिरिक्षण करता आले पाहिजे. आपल्या चांगल्या गोष्टींबरोबरच वाईट गोष्टीचा म्हणजेच आपल्यातील दोषाचा विचार करता आला पाहिजे. आपण केलेल्या चुका लेखकाला जाहीरपणे सांगता अल्यापाहीजे त्याचबरोबर त्या चुका कबूलही करता आल्या पाहिजे.

### ३. 'स्व' ला केंद्रस्थान

आत्मकथनांत 'स्व' हा महत्त्वाचा असतो कारण त्यांच्या भोवतीच आत्मकथन फिरत असत. आत्मकथनांत लेखक म्हणजेच 'स्व' हा नायक असतो. आत्मकथन लिहिणारा लेखक आणि त्यात येणारा 'स्व' हा एकच असतो. आत्मकथनकाराने स्वतःचे व्यक्तिमत्व कसे प्रभावी होईल यांची खबरदारी घ्यावी लागते. आत्मकथनांचा लेखक स्वतः आपण असल्याकारणाने व्यक्तिमत्त्व प्रभावी करण्यासाठी घटना, प्रसंग, पात्र, यांची योग्य निवड करणे आवश्यक असते. आत्मकथनांत येणाऱ्या सर्व घटना, प्रसंग, पात्र, परिस्थिती ही लेखका भोवती म्हणजेच 'स्व' भोवती फिरणे आवश्यक असते थोडक्यात आत्मकथनांत 'स्व' हा महत्त्वाचा असतो. 'स्व'चे दर्शन आले नाही तर त्या आत्मकथनांला महत्त्व राहणार नाही.

**४. घटनांची निवड व कुशाल मांडणी**

आत्मकथनकार हा स्वतः आत्मकथनांचा नायक असतो. त्यामुळे त्याला आपल्या आत्मकथनांत कोणत्या घटना, प्रसंगाची मांडणी करायची हे ठरविण्याचा अधिकार असतो. आत्मकथनकाराजवळ सर्व सुत्रे असतात. आत्मकथनांची सुरूवात कुठून करावी, कुठे थांबावे इत्यादी सर्व गोष्टीं ठरविण्याची जबाबदारी आत्मकथनकाराची असते. तसेच आपल्या आत्मकथनांची मांडणी कशी असावी, कोणते प्रसंग घ्यायचे, अगदी थोडक्यात मांडणी करायची की सगळ्या गोष्टी सांगायच्या इत्यादी आत्मकथनकाराच्या हातात असते. या अशा घटनांची निवड झाल्यावर ती घटना योग्य पद्धतीने त्यांची मांडणी कुशाल पद्धतीने झाली पाहिजे.

**५. वस्तुस्थितीदर्शक निवेदन**

आत्मकथनकाराच्या आयुष्यात बऱ्याच घटना घडलेल्या असतात. संपुर्ण आयुष्यातील मोजक्याच घटनांची निवड आत्मकथनकाराने करावी आणि त्याच्या आधारे संपूर्ण आत्मकथन लिहावे. या घटना असाव्यात, बरोबर सत्य वाटणाऱ्या असाव्यात. या सर्व बाबी जर आत्मकथनकाराने लक्षपूर्वक आपल्या लेखनात आणल्या तर ते आत्मकथन वस्तुस्थितीदर्शक होईल.

## ३.४. आत्मकथनांची वैशिष्टये

‘आत्मकथन’ हा असा प्रकार आहे ज्यात आत्मकथनकार स्वतःविषयी सांगत आहे असे वाटत असले तरी त्यांच्या लेखनातून अप्रत्यक्षपणे त्याच्या समजाचे दर्शन घडत असते. या आत्मकथनांत आलेला ‘मी’ हा सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य घटक असतो. या आत्मकथनांची काही ठळक वैशिष्ट्ये आहे.

**१. समूहभावना**

‘आत्मकथन’ हे एका विशिष्ट व्यक्तीचे नसते.तर त्या समाजाचे असते. ‘आत्मकथन’ हे विशिष्ट समाजातील लोक लिहीत असतात.ते त्या सामाजाचे प्रातिनिधिक कथन असते. आत्मकथनकार स्वतःविषयी सांगत असताना तो अप्रत्यक्षपणे आपल्या समाजाविषयी सांगत असतो. आत्मकथनांत स्वतः विषयी कमी आणि समूहाविषयी अधिक सांगत असतो. म्हणजेच आत्मकथनांत समूहभावनेला अधिक महत्त्व असतो.

### २. समाजदर्शन

आत्मकथन लिहिण्यामागचा एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे या आत्मकथनांच्या माध्यमातून त्या विशिष्ट समाजाचे दर्शन होणे. समाजात राहून आत्मकथनकार आपले जीवन जगत असतो. समाजात राहून वेगवेळये अनुभव लेखक अनुभवत असतो. एखाद्या व्यक्तीची जडणघडण ही तो ज्या समाजात राहत असतो त्या परिसरातून होत असते. एखाद्याचे व्यक्तिमत्व घडवण्यासाठी समाज हा महत्त्वाचा घटक आहे. समाज आणि व्यक्ती हे दोघेही एकामेकाशी जुळलेले असतात. त्या व्यक्तीवर समाजमूल्याचे संस्कार घडत असतात. या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब आत्मकथनांत दिसून येतात.

### ३. संस्कृतिदर्शन

आत्मकथनांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे संस्कृतिदर्शन होय. लेखक ज्या समाजात राहतो त्या समाजाची विशिष्ट अशी संस्कृती असते. त्या संस्कृतीचा ठसा त्या व्यक्तीवर आणि त्या समाजावर उमटलेला असतो. एखाद्याचे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी संस्कृती हा अविभाज्य घटक ठरतो. लेखकाचा जन्म जिथे होतो, त्या समाजाची परंपरा, रीती-रिवाज, अंधश्रध्दा, रुढी, धार्मिक, आचार – विचार, इत्यादी या सर्व गोष्टींचे दर्शन तो साहित्यातून अथवा आत्मकथनांतून घडवत असतो.

### ४. भूक आणि दारिद्र्य यांचे चित्रण

सर्व आत्मकथनांतून एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते ती म्हणजे पोटाचा प्रश्न. या विशिष्ट समाजातील लोकांना अस्पृश्यतेबरोबर भूक आणि दारिद्र्याचा प्रश्न भेडसावत असतो. जीवन जगत असताना त्यांच्या वाट्याला आलेले दारिद्र्य, दुःख, अनुभव इत्यादी सर्व वास्तववादी स्वरूपात आत्मकथनांत चित्रण करणे हे एक आत्मकथनांचे महत्त्वाचे वैशिष्ट मानले जाते. जगण्यासाठी ज्या मूलभूत गोष्टीची गरज असते त्यासाठी त्यांना मोठा लढा द्यावा लागतो. या सर्व गोष्टींचे चित्रण आत्मकथनांत होत असते.

### ५. ‘स्व’ विषयक जाणिवा

आत्मकथन हे विशिष्ट समाजातील लोकांचे असते. या आत्मकथनांतील नायक हा प्रतिनायक असतो. हा नायक आत्मकथनांत स्वतःविषयी कमी आणि आपल्या समाजाविषयी अधिक सांगत असतो. विशिष्ट समाजातील

आत्मकथनांचा समाज हा केंद्रबिंदू असतो. या अशा आत्मकथनांतून लेखक स्वतः बरोबर आपल्या समाजाचे दर्शन घडवत असतो. या दोन्ही जाणिवा आत्मकथनांतून व्यक्त होताना दिसतात.

**६. स्त्री चित्रण**

आत्मकथनांतून स्त्रियांचे दर्शन घडत असते. आत्मकथनांत आलेली स्त्री संस्कृतीचे पालन करणारी, कष्टाळू, सोशिक, श्रद्धाळू इत्यादी स्वरूपाचे जीवन जगते. समाजात स्त्रियांचे स्थान दुय्यम असते. समाज स्त्रियांना तुच्छ लेखून त्याचावर अन्याय, अत्याचार करतो. हा अन्याय, अत्याचार कोणालाच चुकलेला नाही मग ती विशिष्ट समाजातली स्त्री असो वा अन्य समाजातील, स्त्री या अशा परंपरेच्या बंधनातून मुक्त झालेली नाही. ती मुलाबाळांसाठी, संसारासाठी झटत असते. व्यसनी नवऱ्याबरोबर आयुष्य घालवते, संसाराचा गाढा ओढते अशा पद्धतीने स्त्रीयांचे दर्शन या आत्मकथनांतून धडविले जाते.

## ३.५. 'आत्मचरित्र' व 'आत्मकथन' या मधील फरक

'आत्मचरित्र', 'आत्मकथन' व 'आत्मकथा' हे ऐकण्यासाठी कानाला सारखेच शब्द वाटत असले तरी त्यात भिन्नता आढळून येते. 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार आत्मचरित्रकार वयाच्या शेवटच्या क्षणात लिहितो. पण आत्मकथन हा असा प्रकार आहे जो लेखक कधीही लिहू शकतो. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात लिहावा असा तो प्रकार नाही. लेखक कधीही लिहू शकतो. आयुष्याच्या कोणत्याही वर्षी तो लिहू शकतो. आत्मकथने ही वास्तवदर्शी स्वरूपाची असतात. आत्मचरित्रकार वयाच्या शेवटच्या टप्यात लिहीत असल्याकरणाने त्याचा अनुभव हा दीर्घ स्वरूपाचा असतो. आत्मचरित्रकार त्यात आपले संपुर्ण आयुष्य समावण्याचा प्रयत्न करत असतो. त्याचा जीवनाकडे बघण्याचा दुष्टिकोन वेगळा असतो. या सर्व करणामुळे आत्मचरित्राचा पल्ला हा आत्मकथनांपेक्षा मोठा असतो. आत्मचरित्रात अनेक घटना-प्रसंग आलेले दिसून येतात. आत्मचरित्राच्या तुलनेत आत्मकथनांत कमी घटना – प्रसंगाची केंद्र दिसून येतात. याच कारण म्हणजे आत्मचरित्र ही वयाच्या शेवटी लिहिल्या कारणाने त्यात जास्त घटना प्रसंगाची केंद्र दिसून येतात.

'आत्मकथन' हा प्रकार आत्मचरित्राप्रमाणे भूतकाळात चालत नाही तर भूतकाळाबरोबर वर्तमानकाळातही चालू असतो. त्याचप्रमाणे आत्मचरित्रात जी घटना घडून गेली त्या घटनांची नोंद असते पण आत्मकथनांत याच्या उलट दिसून येत. आत्मकथनांत घडून गेलेल्या घटना नोंदी बरोबर चालू वर्तमानातल्या घटनांचेही कथन केले जाते.

आत्मचरित्र हा असा प्रकार आहे जिथे एका व्यक्तीने जन्माला येऊन एकदाच लिहायचे असते. पण आत्मकथन हा प्रकार एक व्यक्ती आपल्या आयुष्यात कितीही वेळा लिहू शकतो. ज्या प्रमाणे आत्मचरित्रावर एकाच वेळी लिहिण्याचे बंधन घातले आहे तसे बंधन आपल्याला आत्मकथनांत दिसून येत नाही.

आत्मचरित्रात आत्मचरित्रकार जन्म ते शेवटच्या टप्प्यापर्यंतच्या संपूर्ण कालखंडाचा इतिहास असतो. आत्मचरित्रकाराचा एकच उद्देश असतो तो म्हणजे आपले जीवन इतरांना कळावे. काही प्रसंग आत्मचरित्रकार उगीचच खुलवून आणि फुलवून सांगत असतो. पण आत्मकथनांत आपल्याला वास्तवाचे दर्शन होत असते. त्याचा एकच उद्देश असतो तो म्हणजे समाजाला त्यांनी अनुभवलेले दुःख, वेदना, त्रास इत्यादी वाचकांना कळावा. भेदभाव बंद व्हावा हा त्याचा उद्देश असतो. त्यांनी भोगलेले दुःख हे समाजाला कळावे आणि त्यांनी वर्णव्यवस्था थांबवावी हे आत्मकथन लीहिण्यामागचे प्रयोजन होय.

'आत्मचरित्र' व 'आत्मकथन' लिहिण्यामागचा लेखकाचा एकच हेतू असतो तो म्हणजे आपल्या मनातील भावना, जीवन जगत असताना जे अनुभव, दुःख, सुख इत्यादी सर्व आत्मचरित्र व आत्मकथनांत सांगून आपला ताण मुक्त करावा. आपले जीवन इतरांना कळावे ही त्यांची इच्छा असते. त्याचा हेतू जरी एक असला तरी त्या हेतूत फरक असलेला दिसतो हे उपरोक्त उदाहरणाद्वारे स्पष्ट केले आहे.

## ३.६. मराठी दलित आत्मकथने

१९४५ नंतर मराठी साहित्यात अनेक वाङ्मयप्रवाह सुरू झाले. जसे की दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी. या पैकी लक्ष वेधून घेणारा प्रवाह म्हणजे दलित साहित्य होय. मराठी साहित्याचे दालन अधिक समृद्ध करण्याचे कार्य दलित साहित्याने केले. दलित साहित्याने मराठी साहित्याचे परिवर्तन वेगाने घडवून आणण्यास मदत केली. दलित साहित्यातील अनुभव, वेदना, यातना, दुःख इत्यानी सर्व भावना वास्तवाशी निगडीत आहे. या साहित्याला संवेदनशील भावनांचे अधिष्ठान आहे. या सर्व बाबीमुळे दलित साहित्य हे अधिक समृद्ध व सकस बनलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित साहित्याची आदिप्रेरणा होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेकडो वर्ष अस्पृश्यतेच्या नावाने समाजात कीड बनून राहिलेल्या या समाजाची अस्पृश्यता नाकारली. या समाजाला त्यांनी त्यांच्या अस्मितेची जाणीव करून दिली. लोकांच्या क्रांतिकारी विचारांना आणि कृतीना त्यांनी जाणीव करून

दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित समाजाला शिक्षण मिळाले. या सर्वाचा परिणाम असा झाला की, हा समाज आपल्या अस्तित्वासाठी, समतेसाठी, समान हक्कासाठी लढण्यास तयार झाला. या सर्वांचा परिणाम समाजव्यवस्थेवर होऊ लागला. दलित समाजावर होणारे शोषण थांबवण्यासाठी दलित चळवळीला सुरुवात झाली. या चळवळीचा परीणाम असा झाला की दलित समाजाला नवे भान, नवी दृष्टी आली. दलित समाजातील लोकांनी आपले विचार, भावना, दुःख इत्यादी साहित्यातूनच व्यक्त करून आपले मन हलके करू लागले. त्यांच्या साहित्याची कोणी विचारपूस करू अथवा नको करू त्यांनी आपले लेखन अधिक जिद्दीने, नेटाने, नव्या उमेदीने केले.

१९६० नंतर दलित साहित्यत अधिक परिवर्तन घडून आले. दलित लेखक आपले जीवन जगत असताना त्यांना आलेले अनुभव घेऊन लेखन करू लागले. आपले जीवनानुभव, विचार लेखनात उतरवून साहित्याचे वेगळे नवे रूप अस्तित्वात आले. दलित लेखकांनी कथा, कविता, एकांकिका, कादंबरी इत्यादी वाङ्मयप्रकार हाताळले. या साहित्य प्रकारांतून त्यांना जे समजला सांगायचं आहे ते स्पष्ट होत नव्हते. या वरील साहित्य प्रकारांतून त्यांना समाज व्यवस्थेला जो विरोध द्यायचा होता, तो या प्रकारांतून नीट उभारून येत नाही असे त्यांना वाटू लागेल. आपल्या समाजातील वास्तव, आपले अनुभव, जीवनातील सत्य लेखनाच्या स्वरूपात सर्वांन समोर मांडायचे धाडस त्या काळात या समाजातील पिढीने करायचे ठरविले. याच निर्धारातून दलित आत्मकथनांचा उदय झाला.

दलित साहित्यामध्ये कवितेच्या खालोखाल अधिक प्रमाणात पाहायला मिळणारा वाङ्मयप्रकार म्हणजे आत्मकथन. दलित आत्मकथन हा वाङ्मयप्रकार अधिक वाचकप्रिय आहे. दलित लेखकांनी स्वतःच्या विचारांना, अनुभवांना, दुखाना आकार देण्यासाठी ही आत्मकथने लिहिली. दलित आत्मकथनाची खरी सुरुवात ही मलिंद महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या वार्षिकांकात सापडतात.१९६४ च्या वार्षिकांकामध्ये प्र.ई.सोनकांबळे यांचे 'वाटाड्या' नावाचा आत्मकथनपर लेख प्रसिध्द झाला. या लेखातून दलित आत्मकथनांची सुरुवात झाली असे सांगितले जाते. पण पहिले पुस्तक स्वरूपात प्रकशित झालेले आत्मकथन म्हणजे दया पवार यांचे 'बलुतं'.दया पवार यांचे 'बलुतं' हे मराठी दलित साहित्यातील पाहिले आत्मकथन होय. या आत्मकथनांला विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे बहुमान लाभले. ह्या आत्मकथनांच्या पाठोपाठ थोड्याच काळात प्र. ई. सोनकांबळे ह्यांचे 'आठवणींचे पक्षी' व माधव कोंदविलकर ह्यांचे ' मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' अशी ही दोन महत्त्वाची दलित आत्मकथने प्रसिद्ध झाली.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या शिकवणीमुळे त्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव झाली. या समाजातील लोकांनी आपल्या जीवनात खूप काही पाहिलेले, भोगलेले येवढे होते, तेव्हा कल्पना करून लिहायची त्यांना गरज भासली नाही. कारण त्या लोकांनी त्याच्या जीवन खूप काही भोगलेले असल्या कारणाने काय लिहू? हा प्रश्न कधी त्यांना पडला नाही. सत्य, वास्तव त्यांनी भोगलेले आहे तेच या लेखनाच्या सहायाने समाजासमोर ठेवतात. लेखक आत्मकथनांतून केवळ स्वतःविषयी किंवा स्वतः चे अनुभव एवढ्यापूर्तीच आत्मकथन लिहिले जात नाही तर आत्मकथनांतून स्वतः बरोबर समाजाचे प्रतिनिधित्व केले जाते. लेखक सांगतो स्वतः विषयी पण ते सर्व समाजाला लागू पडते. लेखक ज्या अनुभवातून जात असतो तोच अनुभव समाजातील इतर लोकांनीही घेतलेला असतो. त्यांचे हे अनुभव, दुःख समाजाला कळावे, त्यांनी त्यांच्या दुःखाची जाणीव व्हावी या हेतूने ते लेखन करीत असतात. त्यांना समाजाला जागृत करायचे असत. त्यांच्या वाटेला आलेले दुःख नव्या पिढीच्या जीवनात येऊ नये म्हणून ते धडपडताना दिसतात.

भूतकाळातील भोगलेलं जीवन आणि वर्तमानात बदलणारे जीवन यांची रूपरेषा दलित आत्मकथनांत दर्शवलेली आहे. महार, मातंग, चांभार, ढोर, कैकाडी, कुडमुडे जोशी, उचल्या, बंजारा, बेरड, गोपाळ, लोहार, न्हावी, कोल्हाटी इत्यादी विविध दलित जाती – जमातीमधून आत्मकथने लिहिली गेली. प्रत्येकांना जाती – जमातीच्या वेदनेतून, दुःखातून जावे लागे. प्रत्येकांची जातकुळी निराळी असली तरी त्यांचे दुःख समान होते. त्यांना समाजाकडून जातीयतेचे चटके भोगावे लागत असे. समाज त्यांना खूप हीन दर्जाची वागणूक देत असे. त्यांना जनावरांप्रमाणे वागवले जात असे. आपल्या जीवनाची गाथा त्यांनी आत्मकथनांच्या सहायाने समाजासमोर आणलेली आहे. त्यांचे जीवन, जगण्यासाठी त्यांची चाललेली धडपड, त्यांच्या रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, दारिद्र्य, भूक, आंबेडकरी चळवळीचे चित्र इत्यादीचा पडसाद अत्मकथनांमधून आले आहे.

दलित आत्मकथनांमुळे या समाजातील व्यथा, वेदना, दुःख, भावना इत्यादी समाजपुढे मांडण्याच्या उद्देशाने या विशिष्ट समाजातील लोकांनी आत्मकथने लिहिण्यास सुरुवात केली. आत्मकथनांत लेखकाच्या जीवनात जे घडल ते तो विस्थापित स्वरूपात मांडत असतो. ‘आत्मकथन’ या प्रकाराला काही नियम नाही. जे त्यांनी भोगले, विशिष्ट समाजात जन्माला आल्या कारणाने त्याला आलेले अनुभव, दुःख, वेदना इत्यादी तो अखंडपणे लिहू शकतो.

या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की अनेक दलित लेखक आपले अनुभव लेखनातून सांगू लागले. अनेक दलित लेखकांनी आपले दुःख आत्मकथनांच्या द्वारे समाजासमोर मांडले. दलित आत्मकथने ही संख्येने आणि

गुणवत्तेनेही नजरेत भरण्यासारखी निश्चितच आहे.दलित आत्मकथन हे मोठे व्यापक क्षेत्र आहे. या क्षेत्रात अनेक लेखकाने लेखन केले आहे. जसे की लक्ष्मण माने यांनी 'उपरा', उत्तम बंडू तुपे यांनी 'काट्यावरची पोटं', शंकरराव खरात यांनी 'तराळ-अंतराळ', दादासाहेब मल्हारी मोरे यांनी 'गबाळ', शरणकुमार लिंबाळे यांनी 'अक्करमाशी', नामदेव व्हटकर यांनी 'कथा माझ्या जन्माची', नानासाहेब झोगडे यांनी 'फांजर', पार्थ पोकळे यांनी 'आभरान', रुस्तुम अचलखांब यांनी 'गावकी', लक्ष्मण गायकवाड यांनी 'उचल्या', श्रीरंग तलवार यांनी 'धुळपाटी', तुषार भाग्यवंत यांनी 'कोंडाळ', किशोर शांताबाई काळे यांनी 'कोल्हट्याचं पोर', ल. स. रोकडे यांनी 'झळा', पांडुरंग उमाजी जाधव यांनी 'म्हारुडा', भीमराव गस्ती यांनी 'बेरड', आत्माराम राठोड यांनी 'तांडा', बाळासाहेब गायकवाड यांनी 'ख्रिस्ती महार', द. शि. सवाखंडे यांनी 'मरणकाळा', डॉ. नरेंद्र जाधव यांनी 'आमचा बाप आन् आम्ही' इत्यादि एकाहून एक सरस, उत्तम आत्मकथने दलित लेखकांनी लिहिली आहे.

या आत्मकथनांतून एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे, ही उत्तम आत्मकथने लिहिणारे लेखक हे सर्व साहित्यिक आहे अशातला भाग नाही. तर यातील काही लेखक हे साहित्यिक नाही. ते साहित्यिक नसले तरी त्यांनी उत्तम आत्मकथने लिहिली. लक्ष्मण माने ज्यांनी 'उपरा' सारखे अप्रतिम आत्मकथन लिहिले ते एक सामाजिक कार्यकर्ते आहेत. माधव कोंडीलकर ज्यांनी 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' हे आत्मकथन लिहिणारे ते एक शिक्षक आहेत, उत्तम बंडू तुपे ज्यांनी 'काट्यावरची पोटं' हे आत्मकथन लिहिणारे ते एक मजूर आहेत, दादासाहेब मोरे ज्यांनी 'गबाळ' हे आत्मकथन लिहिणारे ते एक बी.कॉम. शिक्षण घेतलेले तरुण आहेत. इत्यादी असे अनेक दलित लेखक ज्यांनी अप्रतिम आत्मकथने लिहिली ते मुळात साहित्यिक होतेच असे नाही. हे सर्व कशामुळे शक्य झाले तर, त्यांनी हे सर्व त्यांच्या आयुष्यात अनुभवलेले होत म्हणून त्यांना ते लिहिता आले. त्यांनी ते अस्पृश्यतेचे चटके अनुभवलेले होते. अस्पृश्यतेमुळे त्यांना समाजात खुप वाईट वागणूक मिळाली, त्यांची दुःखे, वेदना अन्याय-अत्याचार या सर्व गोष्टींना त्यांना केंद्रस्थानी ठेवून लेखन केले.त्या शेकडो वर्षात त्यांनी जे सहन केल या सर्व अनुभवांमुळेच ते लिहिते झाले.

## ३.७. दलित स्त्रियांची आत्मकथने

ज्या प्रकारे दलित पुरुषांनी जशी आत्मकथने लिहिली, त्याचप्रमाणे अनेक दलित स्त्रियांनीही आत्मकथने लिहिली आहे. दलित स्त्री आत्मकथनांनी एकूण आत्मकथन या प्रकाराला एका वेगळ्याच स्तरावर जावून पोहोचवले.स्त्री आत्मकथनामुळे, आत्मकथन या प्रकाराला एक वेगळाच आशय प्राप्त करून दिला आहे. आत्मकथन हा प्रकार

केवळ मनोरंजनासाठी किंवा आनंदासाठी लिहिला जात नाही. तर जीवनातील गहन सत्य समाजासमोर यावे या उद्देशाने ती लिहिली गेली. समाजात स्त्री म्हणुन काही दुःखे आहेत, त्याचप्रमणे या समाजात दलित स्त्री म्हणून त्यांच्या वाट्याला आलेली दुःखे ही अधिक त्रास दायक आहेत. पहिले दलित स्त्री आत्मकथन म्हणून कुमुद पावडे ह्यांचे १९८१ सालात आलेले अंत:स्फोट या आत्मकथनांचा उल्लेख केला जातो.

समाज कोणताही असो, त्या त्या समाजाने सर्वाधिक शोषण स्त्रियांचे केलेले आहे. समाजात जगत असताना या लोकांना शूद्र म्हणून जसे त्याचे शोषण, अन्याय केला. त्याच पद्धतीने या समाजातील स्त्रियांवर शोषण केले. एक दलित स्त्री असल्यामुळे तिला आलेले अनुभव, दुःख, वेदना इत्यादी सर्व घटनेचे वास्तव चित्रण त्यांच्या आत्मकथनांतून आले आहे. त्यांच्या आत्मकथनांमधून आपल्याला वेगळयाच स्त्रीचे दर्शन घडते. जी स्त्री आपल्याला कुटुंबासाठी सतत राबणारी, कष्ट करणारी, आपल्या संसाराची चिंता करणारी, आपल्यावर होणारे अन्याय शोषणारी, सोशिक मनाची, नवऱ्यापेक्षा अधिक काम करणारी स्त्री अभिव्यक्त होते. या सर्व गोष्टींचे चित्रण दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येते. दलित स्त्री आत्मकथनामधील अनुभवविश्व दलितपुरुषापेक्षा वेगळे आहे. तिला एक दलित स्त्री म्हणून समाजाकडून यातना सहन कराव्या लागतात त्याचबरोबर तिला तिच्या स्वतःच्या समाजाकडून ही यातना, दुःख भोगावे लागते.

समाजात एक स्त्री म्हणून जन्माला आल्या कारणाने तिला आई, पत्नी, बहीण, मुलगी अशा विविध नात्यातून तिचा प्रवास चालतो. जीवनाचा परपंच ओढताना तिच्या वाट्याला कष्टाशिवाय फारसे काही येत नाही. त्यांचे जीवन दुःखाचे, कष्टाचे, यातनांचे असते. तिच्यावर होणारा अन्याय, अत्याचार या सर्व गोष्टींना ती मुकेपणाने सहन करीत जीवनाला सामोरे जाते. या सर्व गोष्टीचा उल्लेख त्यांच्या आत्मकथनांमधून त्या समाजासमोर मांडताना दिसून येतात.

अनेक दलित स्त्रियांनी आत्मकथने लिहिली आहे जसे की, मुक्त सर्वगोड यांनी 'मिटलेले कवाडे', शांताबाई कांबळे यांनी 'माझ्या जल्माची चित्तरकथा', बेबी कांबळे यांनी 'जिण अमचं', जनाबाई कचरू गिऱ्हे यांनी 'मरणकळा', उर्मिला पवार यांनी 'आयदान', कुमुद पावडे 'अंत:स्फोट', मल्लिका अमर शेख यांनी 'मला उध्वस्त व्हायचं', शांताबाई दाणी यांनी 'रात्रंदिन आम्हा' इत्यादींचा उल्लेख दलित स्त्री आत्मकथने म्हणून केला जातो.दलित स्त्री आत्मकथनामुळे मराठी आत्मकथनांना एक नवी दिशा मिळाली.

सर्व आत्मकथनांतून एक गोष्ट ठळक पणे दिसून येते ती म्हणजे आत्मकथनकाराने आत्मकथन लिहिताना त्यात आलेले अनुभव हे कलात्मकता साधण्याचा त्याचा प्रयत्न नव्हता. त्याचा एकच उद्देश होता तो म्हणजे त्याच्या

आत्मकथनांत आलेला आशय, अनुभव हे वाचकापर्यंत पोहोचवण्याचा त्याचा प्रामाणिक प्रयत्न होता.दलित आत्मकथनातील अनुभव हे प्रामुख्याने वर्णव्यवस्थेमुळे म्हणजेच जातीविशिष्ट असे आहेत. वर्णव्यवस्थेमुळे होणारा अन्याय यांचे भयानक चित्रण सर्व आत्मकथनांतून दिसून येत. त्याचप्रमाणे त्यांचे दुःख, जीवन जगत असताना आलेले दारिद्र्य, त्यांनी सोसलेल्या वेदना, त्यांना करावा लागणारा संघर्ष इत्यादी सर्व वास्तववादी दृश्य आत्मकथनांतून दिसून येते.

## ३.८ समारोप

'मराठी दलित आत्मकथने आणि स्त्रियांची आत्मकथने' या प्रकरणाच्या अंतर्गत सर्वात प्रथम चरित्र आणि आत्मचरित्र यातील फरक पडताळून पाहिला. नंतर आत्मचरित्राची संकल्पना जाणून घेतली. पुढे वेगवेगळ्या अभ्यासकाने आत्मचरित्रावर केलेल्या व्याख्या अभ्यास केला. नंतर आत्मकथन या प्रकाराची संकल्पना व स्वरूप जाणून घेणे याचा प्रयत्न केला. आत्मकथन या प्रकारावर वेगवेगळ्या अभ्यासकांनी मांडलेल्या मतांचा अभ्यास केला. पुढे सत्यकतन, तटस्थवृत्ती, 'स्व' ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशल मांडणी आणि वस्तुस्थितीदर्शक निवेदन या घटकांचा अभ्यास केला. नंतर आत्मकथन या प्रकारांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. समूहभावना, समाजदर्शन, संस्कृतीदर्शन, भूक आणि दारिद्र्य याचे चित्रण, 'स्व' विषयक जाणीव आणि स्त्री चित्रण या आत्मकथनांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. पुढे 'आत्मचरित्र' व 'आत्मकथन' यातील फरकांचा अभ्यास केला. नंतर मराठी दलित आत्मकथनांची वाटचाल जाणून घेण्याचा प्रयत्न केला. नंतर दलित स्त्री आत्मकथनांचा अभ्यास केला.

## ३.९ निष्कर्ष

१. 'आत्मकथन' हा प्रकार दलित साहित्यिक आणि पुढे आणलेला आहे.
२. दलित साहित्यिकांना आपल्या आयुष्यातील वेदना, जाणिवा, दुःख इत्यादी मांडण्यासाठी 'आत्मकथन' हा प्रकार अधिक जवळचा वाटला.
३. 'आत्मकथन' हा प्रकार आत्मचरित्राप्रमाणे भूतकाळात चालत नाही तर तो भूतकाळाबरोबर वर्तमान काळातही चालू असतो.
४. दलित आत्मकथनांत भूतकाळातील भोगलेले जीवन आणि वर्तमानत बदलणारे जीवन याची रूपरेषा दर्शवली जाते.
५. 'आत्मकथन' हा प्रकार केवळ मनोरंजनासाठी किंवा आनंदासाठी लिहिला जात नाही तर तो जीवनातील ग्रहन सत्य समाजासमोर यावे या उद्देशाने लिहिला जातो.

## संदर्भ ग्रंथ


१. कऱ्हाडे, स. दा. "चरित्र आत्मचरित्र." आवरण प्रकाशन, गिरगाव, १९७६, पृ. क्र. १०१

२. मोराळे, महालक्ष्मी. "आत्मचरित्रात्मक कादंबरी वाङ्मयप्रकार व वाङ्मयचर्चा." पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. क्र. ११

३. भालेराव, विमाल. "आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास." साहित्यप्रसार केंद्र, नागपूर, १९८५, पृ. क्र. १६

४. कऱ्हाडे, स. दा. "दलित साहित्य चिकित्सा." स्वरूप प्रकाशन ,औरंगाबाद, २०११, पृ. क्र. ११०

५. महोनार, यशवंत. "दलित स्वकथने." प्रबोध प्रकाशन, नागपूर, १९८२, पृ. क्र. ९१

६. गंधारे, द. के. " मराठी वाङ्मयप्रकार : स्वरूप संकल्पना व वाटचाल." शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१५, पृ. क्र. २५१

७. कऱ्हाडे, स. दा. "साहित्य विश्लेषण." स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९, पृ. क्र. ८४

८. मुलाटे, वासुदेव. "दलितांची आत्मकथने." स्वरूप प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. क्र. १९

९. कऱ्हाडे, सदा. "दलित साहित्य चिकित्सा." स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१

१०.पगारे, म.सु. "दलित साहित्याचा इतिहास." प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००५

११. लुलेकर, प्रल्हाद. "वेदनांचा प्रदेश." कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०००

१२.सांगोलेकर, अविनाश. "दलित साहित्य: प्रवाह आणि प्रकार." प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८

१३.मुलाटे, वासुदेव. "दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप." स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९


-------------------------------------- xxxxxxxxxxxxxxxxxxx --------------------------------------

# प्रकरण ४

# निवडक दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येणाऱ्या दलित आणि स्त्री जाणिवा

# प्रकरण ४ : निवडक दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येणाऱ्या दलित आणि स्त्री जाणिवा

प्रास्ताविक........................................................................................................३९

४.१. दलित जाणीव..................................................................................................४०

४.२ 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतील दलित जाणिवा.................................................४०

४.२.२ व्यवसाय..........................................................................................................४१

४.२.३ वर्णव्यवस्था.....................................................................................................४२

४.२.४ अस्पृश्यता.......................................................................................................४३

४.२.५ आंबेडकरी विचार.............................................................................................४४

४.२.६ दारिद्र्य..........................................................................................................४६

४.३ 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील दलित जाणिवा............................४७

४.३.१ व्यवसाय..........................................................................................................४८

४.३.२ वर्णव्यवस्था.....................................................................................................४९

४.३.३ अस्पृश्यता.......................................................................................................४९

४.३.४ आंबेडकरी विचार.............................................................................................५३

४.३.५ दारिद्र्य..........................................................................................................५४

४.४ 'अंतः स्फोट' या आत्मकथनांतील दलित जाणिवा....................................................५५

४.४.१ वर्णव्यवस्था.....................................................................................................५५

४.४.२ अस्पृश्यता.......................................................................................................५६

४.४.३ फुले आणि आंबेडकर यांचे विचार............................................................५८

४.५ 'मिटलेली कवाडे' या आत्मकथनांतील दलित जाणिवा................................................५९

४.५.१ व्यवसाय........................................................................................५९

४.५.२ वर्णव्यवस्था....................................................................................६०

४.५.३ अस्पृश्यता......................................................................................६१

४.५.४ दारिद्र्य........................................................................................६३

४.६ स्त्री जीवन.......................................................................................६४

४.७ 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतील स्त्री जाणिवा..........................................................६५

४.७.१ कौटुंबिक जीवन..................................................................................६५

४.७.२ समाज आणि दलित स्त्री..........................................................................६७

४.७.३ भाव – भावना....................................................................................६९

४.७.४ स्त्री शिक्षणासाठी केलेला संघर्ष.....................................................................७०

४.७.५ दलित स्त्रियांचे जगणे............................................................................७१

४.८ 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील स्त्री जाणिवा.......................................७२

४.८.१ कौटुंबिक जीवन..................................................................................७३

४.८.२ समाज आणि दलित स्त्री..........................................................................७५

४.८.३ भाव भावना......................................................................................७७

४.८.४ स्त्री शिक्षणासाठी केलेला संघर्ष.....................................................................७८

४.८.५ दलित स्त्रियांचे जगणे............................................................................८०

४.९.१ 'अंतःस्फोट' या आत्मकथनांतील स्त्री जाणिवा..........................................................८१

४.९.१ कौटुंबिक जीवन..........................................................................................८१

४.९.२ समाज आणि दलित स्त्री..........................................................................८३

४.९.३ भाव भावना...........................................................................................८४

४.९.४ स्त्री शिक्षणासाठी केलेला संघर्ष.....................................................................८५

४.९.५ नोकरीसाठी केलेला संघर्ष...........................................................................८६

४.९.६ दलित स्त्रीचे जीवन...................................................................................८७

४.१० 'मिटलेली कवाडे' या आत्मकथनांतील स्त्री जाणिवा.....................................८८

४.१०.१ कौटुंबिक जीवन.....................................................................................८८

४.१०.२ समाज आणि दलित स्त्री.........................................................................८९

४.१०.३ भाव भावना..........................................................................................९१

४.१०.४ दलित स्त्रियांचे जगणे..............................................................................९१

४.११ समारोप....................................................................................................९३

४.१२ निष्कर्ष.....................................................................................................९३

संदर्भ ग्रंथ......................................................................................................९४

# प्रकरण ४ : निवडक दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येणाऱ्या दलित आणि स्त्री जाणिवा

## प्रास्ताविक

भारतीय हिंदू समाजव्यवस्थेत वर्णव्यवस्था घालून दिलेली आहे. या वर्णव्यवस्थेत सर्वात शेवटचा वर्ण म्हणजे शूद्र. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या वर्णीयांची सेवा, गुलामी, चाकरी, स्वच्छतेची सर्व कामे शूद्र समाजातील लोकांना करावी लागत असे. या सर्वाची सेवा करता करता आपणही या समाजाचा एक भाग आहोत याचा त्यांना विसर पडला. या लोकांची स्वच्छता करता करता आपल्या स्वच्छतेचे भान त्यांना राहिले नाही. या समाजातील माणसे अस्वच्छ राहू लागली. अस्वच्छतेमुळे समाज त्यांना अस्पृश्य म्हणून दूर ठेवू लागला. या लोकांना समाजाने आपल्यापासून दूर ठेवले. दुःख, दारिद्र्य, यातना, गुलामगिरी, अज्ञानी इत्यादीचा त्याना सामना करावा लागला. समाज त्यांना अस्पृश्य म्हणून आपल्यापासून दूर ठेवू लागला. याच अस्पृश्य समजातील लोकांना 'दलित, मागासवर्गीय' असे म्हणून समाज त्यांना ओळखू लागला. या लोकांच्या नशिबी फक्त दुःखच होते. समाजाने केवळ आपल्यापासून दूर ठेवले नाही तर देवापासूनही दूर ठेवले. मंदिरातही त्यांना प्रवेश दिला नाही. एवढेच नव्हे तर समाजाने त्यांना गावाच्या बाहेर एका कडेला राहायला सांगितले. त्यांना आपल्या कार्यात सहभागी करून घेतले नाही. त्यांचा स्पर्शच नव्हे तर त्यांची सावलीही अपवित्र मानली गेली. या समाजातील लोकांनी गावातील लोकांची गुलामी चाकरी करावी लागली. त्याचे पडेल ते काम आवाज न करता गपचूप करावे लागते. सवर्ण समजतील लोक त्याचे शोषण करू लागले. त्यांच्यावर अन्याय अत्याचार करू लागले.

पुढे अनेक शतके उलटल्यानंतर त्यांच्या आयुष्यात उजेडाचा दिवस उगवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हा समाज हळूहळू सुधारू लागला. या समाजातील लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आत्मभानाची जाणीव करून दिली. त्यांना त्यांच्या 'स्व' ची जाणीव करून दिली. त्यांच्या प्रेरणेने या समाजाने हिंदू धर्माचा त्याग करून त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. सवर्ण समाजाची सर्व कामे सोडून दिली आणि नव्या जीवनाचा स्वीकार केला.

## ४.१ दलित जाणीव

१९६० मध्ये मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह उदयास आले. त्यापैकी एक प्रवाह म्हणजे दलित साहित्य. या समाजतील लोक लेखनाच्या मध्यमातून समाजासमोर वास्तव चित्रण करू लागले. आपले अनुभव लोकांना समजावे या हेतूने लेखन करू लागले. दलित समाजातील लोकांनी लिहिले म्हणून ते दलित साहित्य होत नाही. त्यात वेदना, विद्रोह, दुःख, माणसाच्या स्वतंत्रेसाठी धडपडणारे, वर्णव्यवस्थेविरुद्ध बंड करणारे, माणसाला महान बनवणारे या सर्वाचा समाविष्ट असणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य. दलित साहित्यात जातीयतेचे चटके दिसून येतात, शोषणाविरुद्ध बोलले जाते, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बोलले जाते. दलित साहित्यामधून एक विशिष्ट प्रकारची जाणीव निर्माण होते. तसेच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक,राजकीय, मानसिक दृष्टीने शोषण केले जाते.  या सर्व शोषणाला सामोरे जाणारा समाज म्हणजे दलित समाज. याच शोषणातून निर्माण झालेली जाणीव म्हणजे दलित जाणिवा होय.

## ४.२ 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतील दलित जाणिवा

'जिणं आमुचं' हे आत्मकथन बेबी कांबळे यांचे आहे. या आत्मकथनांत त्यांनी आपल्या जीवनाविषयी, 'महार' समजाविषयी, त्यांच्या रीतिरिवाजा विषयी त्याचप्रमाणे आंबेडकरी विचारधाराविषयी सांगितलेले आहे. हे आत्मकथन जन्मापासून ते प्रौड वयापर्यंतच्या जीवनावर भाष्य करते. आत्मकथन जरी स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रकाशित झालेले असले तरी, यात आलेल्या सर्व घटना, प्रसंग, वातावरण हे स्वातंत्र्योत्तरपूर्व कालखंडातील आहे.

'आत्मकथन' हे एखाद्या व्यक्तीचे असले तरी त्यात त्या व्यक्तिविषयी थोडे आणि समुहाविषयी जास्त बोलले जाते. आत्मकथनकार स्वतः विषयी बोलत असला तरी ते जीवन त्यांचे एकट्याचे नसून संपूर्ण समाजाचे असते. हे दलित आत्मकथनांचे महत्त्वाचे वैशिष्ट 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतून दिसून येते. लेखिका संपूर्ण आत्मकथनांत स्वतःविषयी फार न बोलता आपल्या समाजाविषयी बोलते. 'दलित' शब्द उच्चारताच यातना, शोषण, दुःख इत्यादी गाष्टी डोळयासमोर येतात . केवळ या समाजात जन्माला आल्या कारणाने गुलामगिरीचे जीवन अनुभवावे लागते. या सर्व गोष्टींचे परिपूर्ण चित्रण या आत्मकथनांतून घडवलेले आहे. हे आत्मकथन जरी बेबी कांबळे यांचे असले तरी

या आत्मकथनांचा खरा गाभा हा 'दलित समाज' आहे. अन्य आत्मकथनांच्या तुलनेत बेबी कांबळे यांचे आत्मकथन वेगळे ठरल त्यामागचे कारण म्हणजे आपल्या समाजाविषयीचे अचूक केलेले चित्रण होय.

## ४.२.२ व्यवसाय

दलित असल्यामुळे जातीयतेचे चटके संपुर्ण आत्मकथनांतून दिसून येते. या समाजात जन्माला आल्यामुळे त्यांना हे दारिद्र्य, गुलामगिरी अनुभवावी लागते. या समाजाने अमूक काम करावे हे ठरलेले आहे. घाम कष्टाची सर्व कामे त्यांच्याकडून करून घेतली जाते. मोबदल्यात मात्र शिल्लक राहिलेले उष्ट अन्न दिले जाते. कोणाचे लग्न असेल किंवा गावात कोणाच्या घरी कार्यक्रम असेल, त्यावेळी बाहेरील सर्व कामे या समाजातील लोकांनी करावी. तसेच हगणे, मुतणे काडावे. येवढे करूनही त्यांना हीन दर्जाची वागणूक दिली जाते. त्यांना अन्न पण चांगले मिळत नाही, राहिलेले उष्टे अन्न त्यांच्या नशिबी येते. गावातील सर्व लोक त्यांना गुलाम असल्यासारखे वागवतात. आपली घाण त्याच्याकडून काडून घेतात उलट त्यानाच शिव्या दिल्या जातात. त्यांनी फार मोठा अपराध केला अशी वागणूक त्यांना दिली जाते. त्यांचा पारंपरिक व्यवसाय म्हणजे गावात कुठेही जनावरे मेली तर ती काढावी. खरे पाहता समाज त्यांच्या या कामावर कृतज्ञ असायला हवा पण या उलट त्यांना दीन दर्जाची वागणूक दिली जाते. समाजाकडून त्यांची पिळवणूक, शोषण केलेले दृश्य दिसून येते. गावात जर कोणाचा मृत्यू झाला असेल तर त्यांच्या नातेवाईकांना दुःखाची खबर बातमी देण्याची जबाबदारी या लोकांची असते. ते उन्हा तान्हात चालत जाऊन ही खबर कळवतात. तेव्हा त्यांच्याकडून शिव्यांची बरसात होते. त्यांना नको नको ते ऐकावे लागते. माणुसकी विसरून खबर देण्यासाठी आलेल्या व्यक्तिला अपमानित करतात.

तसेच गावात जाऊन अन्नासाठी वन वन भडकावे लागते. लोकांच्या दरात जाऊन शिळे अन्न गोळा करावे लागते. अशा अन्नावरच ते जीवन जगतात. जेवणाच्या वेळेला जर ते गावात अन्न गोळा करायला गेले तर त्यांची एक विशिष्ट पद्धत आहे. एका काठीला खालून 'घुंगुरू' बांधून ते गावात जातात. तोंडातून आवाज न काढता काठीचा आवाज करायचा. हे सर्व कशासाठी तर जर एखाद्या गावात जेवणाचा वेळेला ते पोहोचले आणि त्यांच्या कानावर त्यांचा आवाज पडला तर बाटतात असा समज आहे म्हणून काठीला घुंगुरू बांधून ते फिरतात. अशा हीन दर्जाच्या वागणुकीतून या समाजाला जावे लागते. माणूस असून त्यांना या दर्जाची एकदम खालच्या दर्जाची वागणूक दिली

जाते. या लोकांना या समाजात जन्माला आल्याचा पश्चाताप होतो.त्यांना माणूस म्हणून न वागवता जनावरांप्रमाणे वागणूक दिली जाते. पोटाची भूक थांबवण्यासाठी स्त्रिया रानात जाऊन गवत, लाकडे गोळा करून गावात जाऊन विकतात. त्यावेळी त्यांच्या वस्तूना हव तस भाव मिळत नाही. समाजातील लोक खूप स्वस्तात त्याचाकडून वस्तू विकत घेतात. विकत घेत असताना त्याची वागणूक त्याच्या प्रती खूप वाईट असते. त्या वस्तूचे बारीक निरीक्षण केले जाते. त्यावर एक बारीक धागा, कापड, पंख इत्यादी असता कमा नये. त्याचप्रमणे पैसे देताना खूप लांबून फेकले जाते. या वस्तूंवर घामाचे, रक्ताचे, कष्टाचे थेंब पडले असतात या गोष्टीची त्यांना पर्वा नसते. ते स्वतः माणूस असून ही दुसऱ्या माणसांचे अशा तऱ्हेने ते शोषण करतात. या समाजात जन्माला आल्याकारणाने त्यांच्या नशीबी हे दुःख आलेले आहे.

### ४.२.३ वर्णव्यवस्था

वर्णव्यवस्थेच्या नावाखाली हा समाज भरडला, चिरडला गेला. वर्णव्यवस्थेच्या नावाने या समाजाचे धिंडोरे उडवले. वर्णव्यवस्था बनवणारा कोण? तर समाजच, त्यांनीच ही वर्णव्यवस्था तयार करून या दलित लोकांना खालचे स्थान दिले. या समाजातील लोकांना खूप वाईट वागणूक दिली. तर शूद्र लोकांना समाजात त्यांचे स्वतः चे अस्तित्व नाही. त्यांनी त्याची गुलामी करावी हाच त्याचा हेतू असतो. सवर्ण समाज आपल्याला श्रेष्ठ समजतो आणि या लोकांनी त्यांची चाकरी करावी असाच त्याचा समज आहे. गावात या लोकांची वस्ती ही कुठेतरी एका टोकाला असते जिथे माणसाची ये जा होत नाही. त्यांना कुठेतरी कोपऱ्यात घाणीत राहायला देतात. वर्णव्यवस्थेचे दृश्य आपल्याला दिसून येते जेव्हा त्यांना मंदिरात प्रवेश दिला जात नाही. त्यांना कुठल्याच देव धर्मात सहभागी होता येत नाही. हिंदू धर्मात जन्माला येऊनही त्यांना मंदिरात, देव धर्माच्या कार्यात सहभागी होता येत नाही. दूर राहून देवाला नमस्कार करावे लागते.

त्याचप्रमाणे या लोकांचे रहाणीमान सुद्धा या समाजा समान असता कामा नये. स्त्रियांनी कासोट्याला किनारची पट्टी द्यायची नाही अशी पट्टी केवळ पटलीणीनी द्यायची असते. गावात वाटेत कुठेही त्यांना सवर्ण समाज भेटला तर त्यांनी त्यांना पाया पडावे अशी रीत आहे. जर कोणी तसे केले नाही तर त्यांचा अपमान होतो. तसेच मान वर करून पाहण्याची मुभा त्यांना नाही. कायम मान खाली वाकलेली असायला हवी. जर वाटेत त्यांना कोणी भेटला तर यांनी

काट्या खुट्यांनी चालावे आणि त्यांनी बऱ्या वाटेने जावे. चावडीत या लोकांनी एका कोपऱ्यात गप्प उभे राहावे. वाण्याच्या दुकानात समान आणताना त्यांनी बाहेर उभ रहावे त्यांना शिवू नये म्हणून त्याचा उंबरठा उचं असतो. त्यांना कायम टोचून बोलले जाते. ये म्हाराच्या पोरणी, ये म्हरणी इत्यादी नावाने त्यांना हाका मारल्या जातात. समजतील लोकांनी त्यांना नाकारलेले आहे. त्यांना आपले गुलाम समजून त्यांचाकडून सर्व कामे करून घेतात. तेव्हा त्यांना त्याच्या जातीचा फरक पडत नाही; पण जेव्हा धार्मिक किंवा इतर कोणतेही काम  करताना मात्र ही जात मध्ये येते. थोडक्यात जातीवरून त्यांना छळले जाते.

### ४.२.४ अस्पृश्यता

जिथे तिथे आपल्याला ही अस्पृश्यता दिसून येते. या समाजाच नाळच या अस्पृश्यतेशी जुळलेले आहे. त्याचे जन्मा-जन्माचे नाते या अस्पृश्यतेशी आहे. या अस्पृश्यतेच्या नावाने समाजाने त्यांचावर राज्य केले आहे. त्यांना त्याचे गुलाम समजून वाटेल ती कामे त्यांच्याकडून करून घेतली आहे. समाज त्यांच्यावर अन्याय अत्याचार करतो. या समाजात जन्माला आल्या कारणाने त्यांना अस्पृश्यतेचे चटके भोगावे लागते. लेखिका शाळेत असताना बालवयापासून हे अस्पृश्यतेचे चटके भोगलेले आहेत. शाळेत त्यांना विद्यार्थ्यांकडून व बाईकडून वारंवार अस्पृश्यतेची जाणीव झालेली आहे. वर्गात त्यांना इतर विद्यार्थ्यांप्रमाणे बाकावर बसायला मिळत नसे. त्यांना बसायला बाईने दारच्या कोपऱ्यत जागा दिली होती. तिथेच त्यांनी बसायचे त्या जागेवरून हलयचे नाही. शाळा सुटेपर्यंत तिथेच तो कोपरा धरून बसायचे. याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर होत असे त्यांना फळयवरचे नीट दिसत नसे, त्यांची मते त्यांना मांडता येत नसे. वर्गातील मुलाचे वागणे त्यांच्या प्रती चांगले नव्हते. अस्पृश्यतेच्या भीतीने ती मुले त्याच्या जवळून जाताना जीव मुठीत धरून पळत असे. त्यांना टोचून बोलणे, त्यांची टिंगल उडवणे, त्यांना पाणी प्याला न देणे, त्यांचावर दगड मारणे, मातीचा वार करत असे. अशा अनेक गोष्टीचा सामना लेखिकेने केलेला होता. बाल वयातच जातीयतेचे चटके लेखिकेने भोगले होते.

वाण्याच्या दुकानात लांब राहून कुठेच न शिवता सर्व गिऱ्हाईक गेली, म्हणजे त्यांनी काय पाहिजे ते खरेदी करावे. पैसे उंबरठ्यावर ठेवून आपले सामान उचलावे. अंगणात जर काही वाळत घातलेले असेल तर ती व्यक्ती जाईपर्यंत लक्ष ठेवावे. सारखे सारखे सांगत राहायचे नीट चल, जपून चल नाही तर आमचा विटाळा होणार. दुकानदार आपल्या

लहान लहान मुलांना लहानपणापासूनच ही शिकवण द्याचा, त्यांना हे अस्पृश्यतेचे धडे शिकवायचा. दारात म्हारीण उभी आहे तिला शिवू नकोस आमचा विटाळा होणार असे त्या बाल मनावर अस्पृश्यतेचे धडे रुजवले जात असत. अस्पृश्यतेच्या नावाने त्यांचे जगणे मुश्किल होऊन गेले होते. त्यांना समाजात नीट चालता बोलताच येता नसे. गावात चालतानासुद्धा अस्पृश्यता दिसून येत असे. जर कोणी वाटेत भेटला तर त्यांना वाकून नमस्कार करावा लागत असे. जर कोणी केल नाही तर त्याचे समाजात जगणे मुश्किल करून सोडत असे.

जेव्हा स्त्री रानातून आणलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी गावात जाते. तेव्हा अस्पृश्यतेचे चटके तिची वाट पाहत असतात. त्या वस्तूंचे नीट बारीक निरीक्षण केले जाते. त्यांच्या कपड्यांचा एक बारीक धागा वस्तूवर असता कामा नये. एवढे बारीक निरिक्षण करून नंतर त्या वस्तूंची खरेदी केली जाते. देव कार्यासाठी, लग्न करण्यासाठी ब्राम्हण येत असे पण शिवण्याच्या भीतीने तोही सर्व विधी लांबूनच करत असे. दक्षिणा मात्र सोडत नसे. दक्षिणा नेतेक्षणी त्यांना ही अस्पृश्यता लागत नव्हती. त्यांचे रुबाब मात्र मोठे. स्वतः माणूस असून समोरच्या माणसाचे दुःख त्यांना कळत नसे. त्यांना जनावराहूनही खालच्या दर्जाची वागणूक दिली जाते. एका घटनेने ते स्पष्ट जाणून येते गावात मामलेदार येतो तेव्हा त्या मामलेदाराच्या घोड्याला या समाजातील लोकांनी तासंन तास खाजवत राहायचे. त्यांचा हात दुखला तरी चालेल पण खाजव्याचे थांबवता कामा नये. हे त्यांचे कर्तव्य आहे असा लोकांचा समज होता. या लोकांचे काही धार्मिक सण असेल तर गावात दवंडी पेटवली जाते. त्यांना आपल्या सणासाठी गावातील पाटलाची परवानगी घ्यावी लागते. त्यांनी जर परवानगी दिली तरच त्यांना त्यांचा सण साजरा करता येतो. परवानगी दिली की पहिल्यांदा त्यांना गावात दवंडी पेटवावी लागते. पाटलांनी सणासाठी परवानगी देण्यात आली आहे तेव्हा तुम्ही सर्वांनी आपल्या घरात कड्या लावून राहावे. एवढी कडक अस्पृश्यता पाळण्यात येते. त्या दिवशी संपूर्ण गाव ओसाडपडल्या सारखा वाटतो. अस्पश्यतेच्या भीतीने एकही व्यक्ती घराबाहेर पडत नाही. मुलांना लहानपणापासून हे अस्पृश्यतेचे चटके भोगावे लागते.

### ४.२.५ आंबेडकरी विचार

या आत्मकथनांतून जिथे तिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारा दिसून येतात. त्यांच्या प्रेरणेने हा समाज हळू हळू सुधारू लागला. आंबेडकरांनी त्यांना त्यांच्या ‘स्व’ ची जाणीव करून दिली. त्यांच्यावर होणाऱ्या

अन्यायाविरुद्ध आवाज करायला शिकवला. त्यांना शिक्षणाचे महत्तव पटवून दिले. त्यांनी त्यांना हिंदू धर्माची चाकारी करायचे बंद केले. त्यांना जागृत करून त्यांना माणूस बनवल. १९३० पासून या समाजाला भीम वाऱ्याची सुरुवात झाली. समाजावर या भीम वाऱ्याचा परिणाम होऊ लागला. त्यांना त्याचा देव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपात भेटला. आपल्या समाजातील माणूस ऐवढ्या उंचावर पोहचू शकतो याचा त्यांना विश्वास बसेना. त्यांना पाहून आपणही सामान्य माणसांप्रमाणे जीवन जगू शकतो याचा अनुभव आला.

त्यांच्या भाषणाने हा समाज सुधारण्याचा दिशेने जाऊ लागला. त्यांनी समाजाला आपल्या विचारांनी जागृत केले.समाजाला त्यांनी विचार करायला लावले. आपण हिंदू धर्म जीवापाड धरतो, देवाच्या दर्शनासाठी कुठून कुठून चालत अनवाणी येतो पण तिथे पोहोचल्यावर धड त्यांचे दर्शन पण घेता येत नाही. दूर कुठून त्याला नमस्कार करावे लागते. मंदिरात आत प्रवेश देण्यात येत नाही.  हाल अपेष्टा करूनही जर देव तुमची विचारपूस करत नाही तर तुम्ही तरी का ही यातना सहन करतात. आमच्या अनेक पिढ्यांनी देवाची सेवा केली पण त्यांच्या नशिबी कधीच सुख आले नाही की केव्हा देव प्रसन्न झाला नाही. त्यांच्या नशिबी आले ते फक्त दुःख, या पलीकडे काहीच नाही. तेव्हा तुम्ही जागृत व्हा, तुमच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड करा, हिंदू धर्म सोडा, त्यांची चाकारी, गुलामगिरी करणे बंद करा, जनावरचे मास खाणे बंद करा आणि मुलांना शाळेत पाठवा, त्यांना सुशिक्षित बनवा, लहान मुलावर चांगले संस्कार करा. नवीन पिढी घडवा, शिक्षणाने माणूस सुधारतो. ही मुले तुम्हाला सुधारतील, या नरकातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतील.[1] (पृ.६३) मुले तुम्हाला माणूस बावतील. आपल्याला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे याची जाणीव करून देतील. या त्याच्या विचारांचा समाजावर परिणाम होवू लागला. ते मुलांना शाळेत पाठवू लेगले. त्यांनी त्यांच्या सांगण्यावरून मास खाण्याचे बंद केले आणि जर कोणी चोरून खल्ले तर त्यांचे घर वाळीत टाकण्यात येत असे.

समाजाने आंबेडकरांच्या तत्वांचा कठोर रित्या पालन केले. हळू हळू समाज सुधारू लागला. मुलांच्या पालकांनी मुलांचे पेहराव बदलले आपण जे जीवन जगलो ते आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून त्यांची धडपड सुरु झाली. मुलांना चांगले संस्कार देऊ लागले, त्यांच्या अंगावर चांगले कपडे चडवण्यात आले. जिथे तिथे भीम वारे दिसून येत होते. त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांनी हिंदू धर्माचे सण साजरा करायचे

बंद केले. त्याचा एकच देव आणि एकच सण होता .त्यांनी १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती हाच त्यांचा सण समजून त्यांनी तो सण मोठ्या उत्साहाने साजरा केला. बाबाच त्याचे सर्वेस्व बनले.

## ४.२.६ दारिद्र्य

दलित लोकांची घरे दरिद्र्यांने भरलेली होती. त्यांना स्वच्छता काय असते याची जाणीव नव्हती. जाणीव नसल्याकारणाने ती लोक ज्या ठिकाणावर आपल खोपट बांधून राहत होते ती जागा चिखला, मातीने लपटून गेलेली होती. त्याच्या अंगावर घालायला नीट वस्त्र नसायचे. लहान मुले कपडे नसल्या कारणाने तशित हिंडत असे. पुरुष धोती नेसत असे. तर स्त्रिया एखाद्या गोधडी प्रमाणे लांब दोन – तीन कापड एकत्र करून नेसत असे. त्यांना खायला धड मिळत नसे त्यात ही स्वच्छता, वस्त्र परिधान कुठून करणार. अंग धापण्या ऐवढे ते वस्त्र परिधान करत असे. वर्षातून एक महिना त्यांच्या आंघोळीचा असे. दररोज अंघोळ करायला या समाजातील लोकांना परवडणार नसे. कारण त्यांना प्यालाच दोन गाडगी पाणी मिळणे मुश्किल होत असे. त्यात आंघोळीला जास्त पाणी लागत असल्याकरणने ते वर्षातून एकदाच आषाढ महिन्यात ते आंघोळ करत असे.

त्यांची झोपडी हेच त्याचे विश्व होते. झोपडी म्हणजे काय तर सावली येण्यापुरती लाकड लावून उभी केलेली. त्या झोपडीत एक दगडांनी केलेली चूल. त्याच्याजवळ जेवण करायला एकच भांड असे आणि ढवळायला एकच लाकडाने केलेला चमचा हेच त्याचे विश्व होते. खायला धड अन्न मिळत नसे, गावात जाऊन राहिलेलं शीळ, उष्ट अन्न गोळा करून आपल्या कुटुंबाचे पोट भरत असे. ज्या दिवशी गावातून अन्न मिळाले नाही त्या दिवशी पाणी पिवून उपाशी पोटी झोपावे लागत असे हेच त्याचे विश्व होते, हेच त्याचे जीवन होते. सुख काय असत याची या माणसांना जाणीव नव्हती. मिळेल त्या परिस्थितीत जगायचे हाच त्यांच्या जगण्याप्रती उद्देश होता. गावातील लोकांची घाण लोट काडूनसुद्धा समाज त्यांना एका वेळेच चांगले जेवण देत नसे. त्यानी कधी चांगले जेवण कशाला म्हणतात याचा अनुभव कधी घेतला नाही. या प्रसंगांतून यांचे दारिद्र्य जीवन स्पष्ट दिसून येत असे. गणपतदादांनी गूळ समंजून मातीचा गोळा पिठात माळवला आणि भाकरी भाजून खाल्ले. जेव्हा त्यांची पत्नी येऊन त्या मातीच्या गुळयाला शोधायला लागली तर तिचा हाती गुळच लागे. हा सर्व प्रकार लक्षात आल्यावर तो म्हणतो, तेव्हाच पोळया गोड लागत नव्हत्या. या लोकांना माती आणि गुळ यातील फरक कळत नाही असा हा समाज होता. त्यांना काहीच कळत

नव्हते, जनावरांप्रमाणेच ते वागत असे. त्यांना माणूस म्हण्याइतपत त्याच्याजवळ माणसांप्रमाणे हाथ- पाय, बोलू चालू शकतात म्हणून माणूस नाहीतर निव्वळ जनावर. त्या जनावरांना खायला तरी मिळते पण याच्या नशिबी तेही नाही.[२](पृ.४६) मेलेली जनावर पोटाची भूक थांबवण्यासाठी खाता असे.

लग्न समारंभ असल की या लोकांकडून भरपूर कामे करून घेत असे. घामा, कष्टाची सर्व कामे ही माणसे करत असे. लोकांची घाण ते काडत असे या सर्वच्या बदलेत त्यांना राहिलेलं लोकांचं उष्ट अन्न मिळत असे. ते मोठ्या आनंदाने ते सर्व गोळा करून लोकांना त्या उष्ट्या अन्नाचे वाटे घालत असे. असे दारिद्र्यभरे जीवन ते जगत असत. या लोकांना एका वेळेच्या जेवणासाठी खूप धडपड करावी लागत असे. त्याच्या नशिबी फक्त दुःखच होते.

गावात कोणाचं निधन झाल्यावर त्या निधनावेळी जे सामन वापरत असे त्या गोष्टीवर या समाजातील लोकांचा हक्क असे. लोक स्मशान भूमीतून गेले की त्या राहिलेल्या सामानावर ताव मारायचा. बांबू, काफनाचा कपडा ही त्याची हक्काची जयदाता होती. बांबू घरासाठी वापरावे आणि कपडा मुलांसाठी. अशा तरेहन ते आपले जीवन जागत असे. पोट भरण्यासाठी  वाटेल ते खात असे. भूक थांबवण्यासाठी ते बोंड खात असे.त्या क्षणी त्यांना भूक थांबल्यामुळे शांत झोप येत असे पण दुसऱ्या दिवशी या लोकांना खूप त्रास होत असे. या सर्वाला काहीच उपाय नव्हता पोट तर भरायला पाहिजे म्हणून ही माणसे बोंड खात असे. काहीच नसेल तर लोकं जाणून बुजून जनावरांना मारत असे. आणि ते मेलेल्या जनावरं ताव मारत आपले पोट भरत असे. ज्याला जीवन म्हणे कठीण असे जीवन ते रोज जगत असे.

## ४.३ 'माज्या जल्माची चित्तरकथा'  या आत्मकथनांतील दलित जाणिवा

'माज्या जल्माची चित्तरकथा' हे शांताबाई कांबळे यांचे आत्मकथन आहे. या आत्मकथनांच्या  माध्यमातून त्यांनी स्वतःचे जीवन, दलित समाज याचे चित्रण केलेले आहे.सवर्ण समाजाकडून त्यांना वारंवार अस्पृश्यतेचे चटके भोगावे लागले. पती सोडून गेल्यावर एका स्त्रीची कशी दशा होते याचेही चित्रण त्यांनी त्यांच्या आत्मकथनांतून  दर्शवलेले आहे. एक स्त्री कष्ट करून, शिकून एका मोठ्या पदावर पोहोचते;पण अस्पृश्यता पाठ सोडत नाही. याचे उत्तम दर्शन या आत्मकथनांतून  दिसून येते. हे संपूर्ण आत्मकथन स्त्रीवर भाष्य करताना दिसून येते.

### ४.३.१ व्यवसाय

या समजातील लोकांचा ठराविक व्यवसाय होता. गावात जर कोणाचे जनावर मेले तर या समाजातील लोकांनी त्या मेलेल्या जनावराला ओढून काडावे. त्यांना गावात जनावर मेले की आनंद होत असे कारण त्यांना ते मेलेले जनावर खायला मिळत असे. त्यांना हे काम करायला काशाचीच लाज वाटत नव्हती. आनंदात ते काम करत असत. त्यांना लोकांची गुलामी करायची सवय झाली होती. गुलामी करायला त्यांना काहीच वाईट वाटत नसे. हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे या भावनेने वा विचाराने ते हे काम करत असत. समाज त्यांना जनावरांप्रमाणे वागवतो याचे या समाजातील लोकांना वाईट वाटत नसे. त्यांना या सर्व गोष्टींची सवय झालेली होती आणि या लोकांना हे सर्व बरोबर वाटत असे. त्यांना नेमून दिलेला व्यवसाय ती माणसे मन लावून करत असे.

या लोकांनी प्रत्येक घराला एक एक दिवस कामाचे वाटून घेतले होते.आपल्या येणेवारी प्रमाणे त्या त्या दिवशी जावून ही माणसे काम करत असे. बाजारच्या दिवशी ज्या ठिकाणावर बाजार भरतो, त्या ठिकाणी जावून ते झाडलोट करत असे. लोकांनी करून ठेवलेली घाण ते साफ करत असे. हे करायला त्यांना वाईट वाटत नसे या उलट आनंद होत होता. कारण त्यांना राहिलेले सर्व सामान मिळत असे. कुजलेली भाजी, सांडलेली फळे इत्यादी बाजाराच्या दिवशी त्यांना मिळत असे. त्याचप्रमाणे प्रत्येक घराला तराळकी नेमून दिली होती. ज्याचा दिवस त्यांनी गावात जावून अन्न गोळा करायचे. शिळी भाकरी, पोळी, भात गावातून मागून आणायचे आणि नंतर ते आपल्या मुला – बाळांना घरी आणून खायला द्यायचे. त्यांना ते अन्न शीळ आहे, वाईट आहे याची पर्वा नसे. भुकेमुळे मिळेल ते अन्न गपचूप खात असे. त्यांना कोणतेही काम वाईट आहे किंवा आपल्यालाच का सांगतात असे त्यांच्या मनामध्ये कधी येत नसे.

गावात कोणाचे निधन झाले तर ही दुःखाची खबर नातेवाईकांना जावून सांगायचे काम करत असे. स्त्रिया पोट भरण्यासाठी रानात जावून लाकडे, गवत गावात नेऊन विकत असे. त्यांच्या कष्टाला त्यांना हवे तसे भाव मिळत नसे शेवटी आपल्या मुलाचे पोट भरण्यासाठी गिऱ्हाईकांना हव्या त्या भावात विकत असे. पूर्ण गावाला चूल पेटवण्यासाठी लाकडे, गवत पुरवणारी तिच्या स्वतः च्या घरात जेवण करण्यासाठी, चूल पेटवण्यासाठी लाकडे नसत. एवढ्या दारिद्र्यात ते जीवन जगत असतात. समाजाला त्याच्या या जगण्यावर दया आली नाही. त्यांच्यावर सतत अन्याय अत्याचार केला.

## ४.३.२ वर्णव्यवस्था

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार व्यवस्थेने ही वर्णमाला बनलेली आहे. ही व्यवस्था बनवणारा माणूसच त्यांची ही व्यवस्था बनवून त्या व्यवस्थेत इतर माणसांना नेमून दिले आहे. शूद्र हा या वर्णमालेचा शेवटचा क्षेत्र आहे. माणसाची सेवा, गुलामगिरी करणे हाच त्यांचा जन्माला येण्याचा उद्देश आहे असे उच्चवर्गीय लोक समजतात. त्यांच्याकडून आपली सर्व कामे करून घेतात. आपले गुलाम असल्याप्रमाणे त्यांना वागवतात.

या समाजातील लोकांना मंदिरात प्रवेश देण्यात येत नाही. त्याचप्रमाणे त्यांना विहिरीवरील पाणी घेता येत नाही. शाळेत व्यवस्थेमुळे त्यांना इतरांहून वेगळे बसावे लागते. त्यांना वर्गात बाकावर बसायला दिले जात नाही.एका कोपऱ्यात वर्ग सुटेपर्यंत बसून राहावे लागते. समाज या लोकांना आपल्यात शिवत नसे. या लोकांप्रती वागणूक खूप वाईट होती. समाज सतत त्यांच्या मागे लागत असे. समाज त्यांचे जगणे मुश्किल करून सोडत असे.

## ४.३.३ अस्पृश्यता

लेखिकेला बाल वयातच अस्पृश्यतेचे चटके भोगावे लागले. अस्पृश्यता कशाला म्हणतात हे समजत नाही अशा वयातच अस्पृश्यतेची जाणीव करून दिली. दलित  समाजात जन्माला आल्याकारणाने त्यांच्या पदरी अस्पृश्यता आली. समाजात त्यांचे स्थान इतराहून वेगळे होते. कोणीही त्यांच्या जवळ आदराने बोलत नसे सतत तोडून बोलत असे. ते इतरांप्रमाणे समाजाचा एक भाग होते याचा सर्वांना विसर पडला होता. तेही त्यांच्याप्रमाणे माणूस आहे याचा समाजाला विसर पडला आहे. त्यांच्याप्रती समाजाची वागणूक खूप वाईट, हीन दर्जाची आहे.

अस्पृश्यतेचा परीणाम लेखिकेच्या बाल मनावर झालेला दिसून येतो. लेखिका जेव्हा शाळेत जात होती तेव्हापासून तिच्या वाट्याला ही अस्पृश्यता आलेली आढळते. चांभारवाड्यात शाळा भरत होती तेव्हा कधीही अस्पृश्यता त्यांच्या वाट्याला आली नाही. तेव्हा कांबळे मास्तर हे त्याच्या जातीतले असल्या कारणाने त्यांना कधी यांची जाणीव झाली नाही. पण जेव्हा कांबळे मास्तरांची बदली होते आणि त्याच्या जागेवर पाटीलमास्तर यांची नेमणूक होते तेव्हा त्यांना याची जाणीव होते. पाटील मास्तर कुलवाड्याचे असल्याकारणाने ते अस्पृश्यता मानत असे. ते या समाजातील मुलांना शिवत नसे आणि त्यांना पण शिवू देत नसे. ते या सर्वांना शिवा – शिवीच्या भीतीने वर्गाबाहेर बसवत असे. त्यांची पाटी जर तपासायची असेल तर पहिल्यांदा त्यांना खाली ठेवायला सांगत नंतर ते ती पाटी

तपासत आणि तसेच परत खाली ठेवत. त्यांनी खाली ठेवल्यावरच ते ती घेत असत. त्याचप्रमाणे त्यांचे काही चुकले असेल तर ते दुरूनच त्यांना छडीने मारत असे. या सर्वांचा परिणाम लेखिकेच्या मनावर झाला. त्या आपल्या आईशी बोलताना म्हणते मास्तरपण माणूस आहे आणि आपणसुद्धा त्यांच्या प्रमाणे माणूस आहोत मग ते आम्हाला का शिवून घेत नाही.?[3](पृ.६) या त्यांच्या संवादातून स्पष्ट दिसते  की या सर्वांचा परिणाम खोल कुठेतरी तिच्या मनावर झाला आहे. तिसरीत शिकणाऱ्या एवद्ध्या मुलीला  या मास्तराच्या वागण्याने अस्वस्थ करून ठेवले होते. तिला सतत यांची जाणीव होत असे.

उच्चवर्गीय समजातील लोक काळजीपूर्वक वागत असे. त्यांना आपला विटाळा होणार याची भीती वाटत असे. ते या समाजातील लोकांशी जपून वागत असे. जिजा साबळीन पाण्याची घागर घेऊन जाताना वाटेत तिला लेखिका भेटते. तेव्हा या बाईची वागणूक खूप हीन दर्जची असते. या समाजातील लोकांशी संवाद साधताना सतत ते त्यांना त्यांच्या जातीवरून हाक मारत असे. त्याचप्रमाणे लेखिकेला 'ये म्हाराचे पोरी ! चल, बाजूला हो.'[4]( पृ.७) आपल्याला शिवशील बाजूला हो असे म्हटले. याचा परिणाम लेखिकेच्या मनावर झाला. शूद्र असल्याची जाणीव तिला झाली. तीची काहीही चूक नसताना केवळ या समाजाचा भाग असल्याकारणाने तिला या सर्व प्रकारातून जावे लागते.

समाजात  काहीच सहजपणे मिळत नाही. ते मिळवण्यासाठी त्यांना खूप परिश्रम घ्यावे लागते. त्यांना पाण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागते. जेव्हा लेखिका आपल्या आईबरोबर पंढरपूरला कार्तिकी वारीला जाते तिथे त्यांना ही अस्पृश्यता दिसून येते.जेव्हा लेखिकेला आई विहिरीवर पाणी आणण्यासाठी पाठवते,तेव्हा विहिरीवरील बायका तिला तू कुठच्या जातीची आहे असे विचारतात. त्यांना उत्तर मिळते तेव्हा त्या तिला लांब राहण्यास सांगतात. वरून ते तिच्या तांब्यात पाणी घालतात. तांब्यात पाणी घेतल्यावर ती स्वतः पिण्यासाठी आपल्या हातचा वापर करते. तेव्हा पित असताना पाण्याचे थेंब त्यांचावर पडणार या भीतीने त्या तिला जपून पाणी पी नाहीतर माझ्यावर पडणार आणि माझा विटाळा होणार असे सांगते. त्यांना धड समाजात उठताही येईना आणि बसताही येईना. समाज त्यांना सतत अस्पृश्यतेची जाणीव करून देतो. लेखिका लहान असल्याकारणाने या सर्व गोष्टीकडे  बारीक निरीक्षण करते.

शूद्र असल्या कारणाने त्यांना मंदिरात प्रवेश दिला जात नाही. पंढरपूरला चालत विठोबाच्या दर्शनाला जातात आणि त्यांना आत जायला मिळत नाही त्यांना बाहेरून दर्शन घ्यावे लागते. एवढे पायी चालत येऊन, धड खायला अन्न नाही, राहायला जागा नाही अशा परिस्थितीत चालत दर्शनाला ही लोकं येतात. एवढी यातना सहन करून शेवटी त्याना काहीच मिळत नाही त्यांना देवाचे दर्शन बाहेरून घ्यावे लागते. हेच त्यांचे भाग्य ते समजतात. देवाची  रात्रं दिवस आराधना करूनही देव त्यांना या नरकातून बाहेर काढत नाही. त्याला त्यांचे हे दुःख दिसत नाही. त्यांच्या केवळ दर्शनासाठी पायी चालत ही लोकं येतात पण त्यांना या विठोबाचे दर्शनही होत नाही. हे केवळ या समाजात जन्माला आल्या कारणाने त्यांना भोगावे लागते. समाज त्यांना यांची सतत जाणीव करून देतो.

या समाजात जगत असताना या समाजाचे काही रीती आहेत. त्या रीती या समाजातील लोकांनी काठेखोरपणे पाळावे लागते. जर त्यांनी त्यांचे पालन केले नाही तर त्यांना त्यांची शिक्षा मिळते. भर चावडीत त्यांना त्याची लायकी दाखवण्यात येते. या समाजातील लोकांनी पाटलांना जोहर म्हणजेच त्यानं वाकून नमस्कार करायचा असतो. लेखिकेच्या गावातील लग्नाची वरात जात होती. ज्या गावात ही वरात जात होती त्या गावात पाटलांना जोहर करण्याची प्रथा आहे. या लोकांनी केले नाही म्हणून त्यांची वरात वाटेत अडवण्यास येते. कोणाच्या घरी ही वरात जाणार आहे त्या परिचयाच्या व्यक्तीला बोलवण्यात येते. ती व्यक्ती आल्यावर हे सर्व प्रकरण स्पष्ट होते. त्यांनी पाटलांना जोहर केला नाही म्हणून त्यांनी त्यांची गाडी वाटेत अडवली, जो पर्यंत ही लोक जोहर घालणार नाही, गाडीला गावात प्रवेश दिला जाणार नाही. गाडीतील लोक त्याची माफी मागतात आणि त्यांना जोहर घालतात तेव्हा कुठे त्यांना लग्नाला जायला परवानगी दिली जाते. असे वेगवगळे प्रकार या समाजातील लोकांना खाली पाडण्यासाठी केले जाते.

या लोकांना खूप वाईट नको नको ते बोलण्यात येते. त्यांना कधीच सवर्ण समाजाकडून आदराची, माणुसकीची वागणूक मिळाली नाही. लोकं त्यांना त्याच्या जातीवरून हाक मारतात. अशा या वागणुकीचा खूप तिरस्कार येत असे पण त्याच्याजवळ सहन करण्यापलीकडे काहीच पर्याय नव्हता. लेखिका जेव्हा सहावीत गेली तेव्हा तिच्याबरोबर भटाची शकू होती. ती शाळेत येत नसल्याकारणाने लेखिका तिला बोलवायला तिच्या घरी जाते.तेव्हा शकुच्या आईची लेखिके प्रती वागणूक खूप वाईट होती. त्या लेखिकेला 'ए म्हाराच्या पोरी' म्हणून हाक मारते.

समाज कधीच त्यांना इजत देत नाही, त्यांना माणूस म्हणून पाहत नाही, सतत त्यांचा द्वेष केला जातो. ती आपल्या मुलीला जपून राहायला सांगते. समाज त्यांना त्यांची ही अस्पृश्यता विसरायला देत नाही.

हिंदू धर्माप्रमाणे इतर धर्मातील लोकांनाही ही अस्पृश्यता लागते. लेखिकेच्या गावात मुसलमान जमातीतील लोकांची वस्ती होती. वस्ती असल्या कारणाने त्या गावात मशीद होती.गावात राहणाऱ्या लोकांचे विशेषता या जमातीलील लोक हिंदू धर्माप्रमाणे गावातील इतर धर्मातील लोकांचे उत्सव साजरा करत होते. हे या जमातीतील लोकांचे वैशिष्ट्य होते. पण या लोकांना समाज महत्त्व देत नसे. लेखिका जेव्हा देवाला प्रसाद दाखवण्यासाठी मशिदीत जाते, तेव्हा तिथे उपस्थीत असलेली माणसे त्यांना आत घेत नाही. या जमातीतील असल्याकारणाने त्यांना मशिदीत आत प्रवेश दिला जात नाही. त्यांची कोणतीही चूक नसताना केवळ या समाजात जन्माला आल्याकारणाने त्यांना या सर्वांमधून जावे लागते. समाज त्यांनी गुन्हा केल्याप्रमाणे त्याच्या मागे लागतो. या लोकांना कशाचीच पर्वा नाही, एखादी व्यक्ती देवाला श्रद्धेने काही तरी अर्पण करायला येते. तर त्या व्यक्तीला क्रूरपणे हाकलून दिले जाते.

शाळेची जागा कमी असल्याकारणाने त्यांना त्या अपुऱ्या जागेत वर्ग घेता येत नाही. जवळच देऊळ होते त्या देवळात १ ते ४ वर्ग घेण्यात येत होते.कांबळे मास्तर हे या समाजातील असल्या कारणाने त्यांचा एकमेव वर्ग देवळाबाहेर व्हरांड्यात घेण्यात येत असे. जी व्यक्ती इतरांना ज्ञान देते, ज्या व्यक्तीकडे ज्ञानाचा भंडार आहे, त्यांच्या मुलांना आपले ज्ञान, विचार जी व्यक्ती पोहोचवते अशा व्यक्तीकडे या लोकांचा सलू खूप वाईट आहे. त्यांच्याप्रती आदर असायला हवा पण तसा आदर मिळत नसे. या उलट वाईट वागणूक देत असे.

सुशिक्षित समाजातही अस्पृश्यता होती याचे खूप वाईट वाटते. पुरातन पिढी जे शिकलेले नाही त्यांना ही अस्पृश्यता लागतेच पण जे शिकून मोठ्या पदावर जावून पोहोचतात त्यांना पण ही अस्पृश्यता लागत असते. स्वतः एक शिक्षिका असून ही अस्पृश्यता मनात असते. जेव्हा लेखिका ट्रेनिंगसाठी पुण्यात विमेन्स कॉलेजमध्ये जाते. तेव्हा तिथे लेखिकेची भेट बडवे नावाच्या मुलीशी होते. ती स्वतः एक शिक्षिका असून तिला ही अस्पृश्यता लागत होती. ती अस्पृश्य मुलींनी वाढलेले जेवण घेत नसे. ती त्यांचा अपमान करत असे, जेव्हा ही माणसे वाढायला येत असे तेव्हा नको नको म्हणायची. आणि नंतर इतर मुलीकडून वाढून घेत असे. जी व्यक्ती इतरांना विद्या देते,तिची मानसिकता जर अशी असेल तर ती व्यक्ती मुलांपर्यंत हेच विचार पोहोचविणार हे सहाजिक आहे. माणसांना कोणताही अधिकार

नाही की त्यांनी समोरच्या व्यक्तीचा अपमान करावा. समाजाने कधी या लोकांच्या भावनांची कदर केली नाही. हा समाज गप्प असल्याकारणाने त्याचा वाटेल त्या बाजूने छळ केला गेला.

या समाजातील लोकांचे सर्वात जास्त हाल कशाचे झाले तर ते पाण्याचे. त्यांना पिण्यासाठी एक घोट पाणी मिळणे मुश्किल होत असे. ती ज्या गोसाव्याच्या विहिरीवरन पाणी आणत होती त्यांनी त्यांच्या पाण्याची सोय बंद केली. त्याचा विटाळा होणार या भीतीने त्यांनी या लोकांना त्याच्या विहिरीवर येणे थांबवले. पाणी हा आमच्या शरीराचा महत्वाचा भाग असल्याकारणाने ही माणसे लपून विहिरीवर जावू लागली. ही माणसे येतात हे समजल्यावर विहिरीत शेण, माती टाकून पाणी दूषित केलं. एवढ्या खालच्या दर्जाची वागणूक या समाजातील लोकांना देण्यात येत होती. ‘सीता कासारीन’ ही या समाजातील स्त्रियांना घोंगडी नेसून बांगड्या भरत असे. त्याना आपला विटाळा होणार याची भीती वाटते त्यामुळे ती हा पोशाख करते. समाज या अस्पृश्यतेवर पडदा घालू शकत नाही. विसरायचा प्रयत्न केला तरीही त्यांची मानसिकता त्यांना विसरायला देत नव्हती.

ही अस्पृश्यता कधीच नष्ट होणार नाही याचा पुरावाही या आत्मकथनांतून लेखिकेने समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. लेखिकेच्या मुलीलाही या अस्पृश्यतेच्या जाळयाने घेरलेले आहे. जेव्हा मंगल आपल्या मैत्रिणीबरोबर त्याच्या घरी जाते, तेव्हा ती मंगलाने भांड्यातून पाणी घेतले म्हणून रडायला लागते. या समाजाचा भाग असल्या कारणाने तिच्या नशिबी ही अस्पृश्यता येते. तिच्या आईने तिला बजावून सांगितले होते की मंगलाच्या घरातील कोणत्याच गोष्टीला हात लावायचा नाही. असे अस्पृश्यतेचे अनेक प्रसंग या आत्मकथनांत आलेले आहे. लेखिकेच्या वाट्याला जी अस्पृश्यता आली तीच पुढे जाऊन तिच्या मुलीच्या वाट्याला आली. काळ बदलला पण लोकांची मानसिकता बदलली नाही.

## ४.३.४ आंबेडकरी विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने हा समाज आपल्या अस्तित्वासाठी लढू लागला. त्यांनी त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला सांगितला. त्यांना ‘स्व’ ची जाणीव करून दिली. शिक्षणाचे महत्व पटवून दिले. आंबेडकरांनी त्यांना त्यांचे पारंपरिक व्यवसाय बंद करायला लावले. सवर्ण समाज यांची चाकरी, गुलामगिरी करणे बंद करायला लावले. त्यांना माणूस म्हणून नाही तर एखाद्या जनावरांप्रमाणे वागणूक दिली जात

होती. या वागणकीविरुद्ध बंड करायला लावले. आंबेडकरांनी या समाजाला मेलेली जनावर खाणे बंद करायला लावले. त्याचप्रमाणे दुःखाची खबर त्यांच्या नातेवाईकांना पोहोचवणे बंद करायला लावले. डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली या लोकांनी जनावरे खाणे बंद केले. सवर्ण समाजातील लोकांच्या कामांना नकार दिला. त्यांनी सर्व घाण कामे करणे बंद केले.

या सर्व गोष्टींचा असा परिणाम झाला की संपूर्ण गाव खळबळून उठला. कामाला नकार दिल्या कारणाने गावातील लोक त्यांना त्रास देवू लागले. त्यांना गावात हिंडता फिरता येईना, सर्व दुकाने या लोकांना बंद केली, त्यांना मळयात जाता देत नव्हते, त्यांचे व्यवसाय बंद करून टाकले.[5](पृ.१२३) पण या लोकांनी आपले विचार बदलले नाही. आपल्या निर्णयावर ठामपणे उभे राहिले. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची त्यांना जाणीव झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने त्यांना आत्मभान आले. त्यांनी त्यांना विचार करायला लावला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना नवी दिशा दाखवून दिली. संपुर्ण समाज या अन्यायाविरुद्ध पेटून उठला. याचा परिणाम सवर्ण समाजावर झालेला दिसून येऊ लागला. पोलिसांच्या सांगण्यावर त्यांना सर्व काही खुल झाल. ते पुन्हा गावात हिंडू-फिरू लागले. बौद्ध धर्माचा स्वीकार करून पुन्हा ते माणूस म्हणून जगू लागले.

## ४.३.५ दारिद्र्य

या लोकांनी जीवन जगत असताना खूप त्रास सहन केला आहे. त्यांचे संपुर्ण जीवन या दारिद्र्यात गेलेले आहे. आयुष्यात त्यांना सुख काय असत याची जाणीवच झालेली नाही. आयुष्यात दुःखाची संख्या एवढी असते की त्यांना सुख म्हणजे काय असत हेच या लोकांना माहीत नसत. पोटाची खळगी भरण्यासाठी वाटेल ते काम करण्यास हा समाज तयार असतो. त्यांना पोटासमोर लाज, शरम काहीच वाटत नाही. या लोकांना एक वेळेच जेवण मिळणे अवघड असा हा समाज आहे. ते मिळवण्यासाठी गावात लोकांचे शीळे अन्न गोळा करत असतात. अन्न मिळालं तर ठीक नाहीतर उपाशी पाणी पिवून झोपतात. राहायला धड छप्पर नाही आणि खायला अन्न नाही असे दारिद्र्याचे जीवन ते जगत असतात. ज्वारीच्या पिकाच्या मळणीच्या वेळी त्यांना राहिलेली, सांडलेली ज्वारी मिळवण्यासाठी धडपड करावी लागते. मळणीच्या वेळी मातीत सडलेली ज्वारी ते गोळा करत असत. मळणीचे बैल मळणी करत

असताना ज्वारीची कणसं खात होते आणि पोटात गेलेली कणसं शेणाच्या रूपात बाहेर पडत असत. या लोकांकडे खायला काही नसल्या कारणाने त्यांना पोटासाठी शेणात असलेली ज्वारी धूवून खावी लागत असे. पोट भरण्यासाठी मिळेल ते खात असे. त्यांना बर वाईट काही समजत नसे त्याचा एकच उद्देश असे काहीही का असेना भूक मिटली पाहिजे.

## ४.४ 'अंतः स्फोट' या आत्मकथनांतील दलित जाणिवा

'अंतः स्फोट' हे कुमुद पावडे यांचे आत्मकथन आहे. या आत्मकथनांतून लेखिकेने समाजासमोर एक वेगळेच वास्तव दर्शविलेले आहे. या आत्मकथनांतून लेखिका आपल्या हक्कासाठी लढताना दिसून येते. तिची ही लढाई जातीव्यवस्थेविरुद्ध आहे पण त्याचबरोबर ही लढाई तिच्या स्वतःच्या समाजातील लोकांशी आहे. एकाच समाजातील असून लोकं समोरील माणसाची पिळवणूक करतात. आपल्याच माणसांची वृत्ती कशा पद्धतीची आहे याचे चित्रण केले आहे.

## ४.४.१ वर्णव्यवस्था

समाज म्हटले की वर्णव्यवस्था असलीच. समजाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून या वर्णव्यवस्थेकडे पाहिले जाते. ही व्यवस्था माणसाच्या जगण्या आड येत असते. या व्यवस्थेने माणसाचे जगणे मुश्कील करून सोडले आहे. या व्यवस्थेमुळे माणसांमध्ये भेद निर्माण झाले आहे. एक दलित स्त्री संस्कृत शिकते या वरून समाज पेटून उठतो. संस्कृत हा दलित लोकांनी शिकण्यासारखा प्रकार नाही. ही देवाची भाषा आहे, दलित लोकांनी याचे शिक्षण घेता कामा नये. त्यांच्या स्पर्शाने पवित्र ग्रंथ भ्रष्ट झालेले आहेत.[६] ( पृ.२९) शूद्र स्त्रिने पवित्र देवाची भाषा शिकावी हे समाजाला पटत नसे. भाषा निर्माण करणारा माणूसच, आणि आपल्याला हवी ती भाषा शिकण्याचा हक्क सर्वांना आहे. पण देवाच्या नावाने समाज एका स्त्रीला ज्याला खरीच त्या भाषेची आवड असते अशा व्यक्तीला केवळ जातीमुळे तिच्या शिकण्यात अडथळे निर्माण करतात.

या समाजात जन्माला आल्याकारणाने त्यांना जातीवरून छळले जाते. लहान मुलांना बाल वयात अस्पृश्यतेचे धडे शिकवतात. समाजात जगत असताना त्यांना या जातीयतेचे चटके भोगावे लागतात. समाज त्यांना वेगळयाच नजरेने पाहतो. लग्नाच्या वेळी ही जात आडवी येत हे लेखिकेचा अंतर जातीय विवाह झाल्या कारणाने समजेल. सतत

जातीवरून टोमणे सहन करावे लागते. पाटलाच्या मुलाने दलित मुलीशी लग्न केल्यामुळे कुटुंबाने रक्ताचे नाते तोडले. स्वतः च्या मुलाची खुशी, त्याचे प्रेम, भावना याचा त्यांना फरक पडत नसे. आपल्या जमाती विरुद्ध जाऊन विवाह केल्यामुळे त्यांनी स्वतः च्या मुलाशी नाते संपवले. समाज या लोकांशी कितीही झाले तरी आदराने वागत नसतो. सतत त्यांचा तिरस्कार केला जातो. त्यांना सरकारकडून मिळालेली आरक्षणे, मुलांना स्कॉलरशिप याचे या समाजाला तिरस्कार वाटतो. दलित लोकांच्या शिक्षणामुळे या लोकांना भारी राग येतो. हे लोकं शिकणार आणि आरक्षणाने नोकरी मिळवणार. या भीतीने ते जाणून बुजून या समाजातील लोकांना नापास करण्याचा प्रयत्न करतात.[7]( पृ.४५) आपल्याला मोठा समजणारा हा समाज मनाने, बुध्दीने किती खालच्या पातळीचा आहे हे स्पष्ट दिसून येते.

जातीयतेचे भेद केवळ सवर्ण समाजातील लोकांनकडूनच आलेले आहे अशातला भाग नाही. हे भेद त्याच्या स्वतःच्या समाजातील लोकांकडून त्यांना मिळालेला आहे. जेव्हा त्याच्याच जमातीतील मुलगी खालच्या जातीतल्या मुलाशी लग्न करते तेव्हा संपुर्ण समाज पेटून उठतो. जेव्हा कौसल्या धोब्याच्या मुलाशी लग्न करते तेव्हा हाच समाज त्यांच्या विरुद्ध जातो. नवऱ्या मुलाचे स्वागत खूप वाईट पद्धतीनें करण्यात येते. सवर्ण समाजातील लोक त्रास देतातच पण आपल्याच समाजातील लोकं कसे त्रास देतात, छळतात याचे दर्शन आपल्याला या कौसल्याच्या लग्नाच्या रूपाने दिसून येते. जात हा असा शब्द आहे जिथे सवर्णच नव्हे तर शूद्र लोकांच्या मध्ये ही येत असते. समाजाने नको त्या गोष्टीला चडून ठेवल्या कारणाने याचे परिणाम आपल्या स्पष्ट दिसून येतात.

## ४.४.२ अस्पृश्यता

समाजात त्यांना माणसाप्रमाणे वागणूक दिली जात नाही तर जनावराप्रमाणे वागवले जाते. या सर्वाचा अनुभव लेखिकेला बाल वायापासन यायला लागला. समाज या लोकांना कोणत्याच कार्यात सहभागी करत नाही. त्यांची उपस्थिती अशुभ मानतो. चुकूनही कोणत्या कार्यात त्यांची उपस्थिती लागली तर त्यांना शिव्याचा प्रसाद दिला जातो. त्यांना व त्याच्या कुटुंबातील लोकांना अपशब्द दिले जातात. असाच एक अनुभव लेखिकेच्या वाट्याला आला. लेखिकेच्या ब्राह्मण मैत्रिणीच्या घरी त्याच्या भाऊचे मुंडण चालू होते. त्या वेळेला लेखिका तिथे पोहोचते आणि बाहेरून ही विधी पाहत असते. तिला ही विधी आणि मंत्र जे कानी ऐकू येते त्याचे आकर्षण होते आणि तिथेच एक टक पाहत उभी राहते. तिला उभी पाहून घरातून एक बाई हाक्क मारते 'ए म्हारणीच्या पोरी'[8](पृ.३२) तिच्या या

हाकेने लेखिका भारावून जाते. समाज त्यांना कधी सन्मानाने वागवत नाही. सतत त्यांना त्याच्या जाती – जमातीवरून हाक मारणे, त्यांना माणसां प्रमाणे न वागवता जनवराप्रमाणे वागवले जाते. जनावरांना ज्याप्रमाणे हाक घालण्यात येते त्याचप्रमाणे या लोकांना हाक मारली जाते.

शाळेत लेखिकेबरोबर ब्राह्मण आणि इतर जातीतील मुले शिकत असे. शाळेत जाताना सोबत हवी म्हणून लेखिका सहज त्याच्यासाठी थांबत असे. त्या मुलांची आई त्यांना लेखिकेसमोर बजावत असे. ‘बघ हं शिवू नकोस, हीच्यापासून दूर राहा, हिच्याबरोबर खेळू नकोस नाही तर घरात घेणार नाही’ असे सांगत. समाज विसरून गेला आहे की तेही त्याच्या प्रमाणे माणूस आहे. ते या समाजाचा एक भाग आहे याचा विसर लोकांना पडला आहे. त्यांना अपशकुनी, पाप याच नजरेने त्यांना पाहिले जाते. लेखिकेला संस्कृत विषयाची आवड असते. या आवडी पोटी ती संस्कृत विषय घेते तेव्हा अस्पृश्यता तिच्या वाट्याला येते. शिक्षकाकडून त्याचबरोबर समाजाकडून नको नको ते ऐकून घ्यावे लागते. एका दलित स्त्रिने संस्कृत शिकणे त्यांना पटत नाही. लोक या गोष्टींवरन खूप टोमणे मारतात. त्यांच्या मते संस्कृत दलितांनी शिकण्याची भाषा नव्हे, संस्कृत ही देवाची भाषा आहे.[९] ( पृ.२९) सवर्ण समाजाला तिच्या संस्कृत शिकण्यावरून खूप टोमणे मारले. पण लेखिका जिद्दीने संस्कृत भाषेतून एम. ए. पर्यंतचे शिक्षण घेते. एवढे शिकुनही तिला नोकरी मिळत नाही. जातीवरुन त्याचबरोबर संस्कृत भाषेतून शिक्षण घेतल्यामुळे तिला खूप वेळा पर्यंत नोकरी मिळत नाही. ‘आता ह्यांनी ही शिकवावं हं.’[10](पृ.३६) त्यांना ऐकू येते अशा स्वरात ते म्हणत असे. खूप संघर्ष करून एका महाविद्यालयात नोकरी मिळते. या नोकरीवरून त्यांना समाजाचे ऐकावे लागते. ते तिच्या तोंडावर नाराजी व्यक्त करताना दिसून येतात. ‘आमचं कुठल्या जन्माचे पाप आहे की, आम्हाला तुमच्याही हातून आम्हाला संस्कृत शिकावे लागते, सर्वच आमचे पवित्र ग्रंथ भ्रष्ट झालेले आहेत.’[11](पृ.२९) सवर्ण समाजाला एका दलित स्त्रीने संस्कृत शिकलेले आवडत नसे. आपली नाराजी समाज तिला तोंडावर पाडून सुनावत असे.

अस्पृश्यता जिथे तिथे त्याच्या वाट्याला येत असे. समाजा असा आहे जिथे अस्पृश्य माणूस दिसला की त्याला चिरडल्या शिवाय त्यांना राहवत नाही. जाती जमातीवरून त्यांना छळल जात. कुठेही गेले की सर्वात अगोदर जात विचारली जात असे. असाच अनुभव तिलाही आला जेव्हा लेखिका आपल्या जिवलग मैत्रिणीच्या घरी जाते तेव्हा तिची आई हाच प्रश्न विचारते. जर खरे सांगितले तर तिला आत प्रवेश दिला जाणार नाही या संकोचाने लेखिकेची मैत्रीण ‘कुणबी’ म्हणून सांगते. आपले खरे वास्तव लपवण्यात आले या प्रसंगाने तिचे मन भारावून जाते. समाज हा

एवढा तुष्ट आहे की लोकांचे मन, स्वभाव, गुण यांची कोणाला गरज भासत नाही. त्यांना कशाची आवश्यकता वाटते तर जातीची – जमातीची.

लेखिकेचा विवाह अंतर जातीय झाल्याकारणाने त्यांना लोकांचे बोलणे ऐकून घ्यावे लागत असे. लेखिकेच्या दिराचे लग्न ठरत नाही त्याला कारण लेखिका आहे असे मानून तिला अपशब्द दिले जातात. लोकांना आपल्या भावाने म्हाराच्या मुलीशी लग्न केले म्हणून माझे लग्न ठरत नाही असे  समाजाला सांगत सुटतो. लेखिकेला इतरांशी सोडून आपल्या स्वतः च्या माणसाशी संघर्ष करावा लागतो. लेखिकेला एक वेगळा अनुभव रेल्वेत मुंबईला जात असताना आला. रेल्वेत त्याच्या शेजारी एक वृद्ध जोडप बसले होते. त्याच्या बोलण्या, वागण्यातून त्यांना अस्पृश्यता केवढी लागते याचा अनुभव आला. ते जोडपं इंग्लंडला आपल्या मुलांकडे गेले होते. तिथे अस्पृष्यतेच्या भीतीने त्यांनी पक्त फळं, आईस्क्रिम खाली. कशा कशा पद्धतीची माणसे या जगात असतात यांचा वेगळा अनुभव लेखिकेला आला.

समाजात सुधारणा झाली असली तरी अजूनही समाज सुधारलेला नाही. माणसे शिकून मोठ्या पदावर जरी  पोहोचली तरी समाजातील अस्पृश्यता गेली नाही. आंतर जातीय विवाह केल्यामुळे लेखिकेच्या सासरच्या माणसांनी त्याच्याशी संबंध तोडला. स्वतःच्या रक्ताच्या मुलाशी त्यांनी संबंध तोडला. त्यांना बाहेरून, समोरून त्यांची खूप पिळवणूक केली. त्यांना सतत त्रात देत राहिले. पण लग्नाला दोन वर्ष होतात, मुलाचा जन्म होतो, आणि अचानक एक दिवस त्यांचे सासरे घरी येतात. जरी ते बाहेरून आपुलकी, जिव्हाळा दाखवत असले तरी ही आपुलकी, जिव्हाळा फक्त त्याच्या मुलापूर्ती मर्यादित होता. हा जिव्हाळा लेखिकेला किव्हा तिचा मुलाला नव्हता. जाते समयी मुलगा आजोबांच्या पाया पडायला जातो तेव्हा ते सरकून मागे सरतात. आपल्या खिशातून पैसे काडतो आणि मुलांकडे फेकून दितो. या गोष्टीवरून स्पष्ट दिसून येते की अजूनही जात आडवी येत होती. समाज सोडून द्या स्वतःची माणसे त्यांच्याशी वाईट वागत होती. रक्ताचे नाते असूनही विटाळा होणार या भीतीने स्पर्श करत नव्हते. शिकून कितीही पुढारलेला असला तरी त्याच्या वाट्याला अस्पृश्यता येत होती.

### ४.४.३ फुले आणि आंबेडकर यांचे विचार

या महान व्यक्तिमत्वामुळे हा समाज सुधारण्याच्या दिशेने जावू लागला. त्यांच्या प्रेरणेने या समाजात खूप मोठे बदल झालेले दिसून येते. डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या नेृत्वाखाली हा समाज योग्य दिशेने जावू लागला. माणसा प्रमाणे

जीवन जगू लागले. त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करून त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. या समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शिक्षणानेच आपला समाज सुधारेल याची त्यांना जाणीव झाली. याच जाणिवेने त्यांनी मुलांना शिक्षण दिले. या थोर माणसांनी समाज सुधारण्यासाठी मनापासून प्रयत्न केले. या प्रयत्नांचे फळही त्यांना मिळाले.पण याच थोर विचारवंताच्या विचारांना हाच समाज पायदळी तुडवतो. ज्या जतियतेशी त्यांनी लढा दिला, बंड केले विचारांचे पालन करायला पाहिजे होते. तेच ते स्वप्न साकार होऊ नये म्हणून प्रयत्न करतात. आंबेडकरांच्या प्रेरणेने बौद्ध धर्माचा स्वीकार करतात पण हिंदू धर्माप्रमाणेच जातीमधले भेद पाळू लागतात. त्याच्याच पोटजातीतीतल लोकांना त्रास देऊ लागतात. त्याच्या कार्यात अडथळा आण्याचा प्रयत्न करतात.

## ४.५. ‘मिटलेली कवाडे’ या आत्मकथनांतील दलित जाणिवा

‘मिटलेली कवाडे’ हे मुक्ता सर्वगोड यांचे आत्मकथन आहे. समाजाच्या हितासाठी लढणारी, समाज परिवर्तन व्हावे यासाठी स्वतःला झिजवणारी, या समाजातील लोकांच्या मदतीला धावणारी. त्या एक समाज कार्यकर्त्या आहेत. आपल्या समाजाचे परिवर्तन व्हावे यासाठी त्या अनेक कार्य करीत असतात. पण समाज त्यांच्या या कार्यात अनेक अडथळे आणताना दिसून येतो. त्यांना त्यांची सतत जात दाखवून दिली जाते. समाज सुधारक असल्याकारणाने त्यांच्यावर टिंगल, टोमण्याची बरसात होते. या अशा परिस्थितीतसुद्धा त्या आपल्या समाजाच्या हितासाठी लढताना दिसून येतात. आपले कार्य न थांबवता सतत लढत राहतात. आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवतात. याच सर्वाचे चित्रण या आत्मकथनांतून दिसून येते.

### ४.५.१ व्यवसाय

गावातील पाटील या समाजातील लोकांकडून आपली सर्व कामे त्यांच्याकडून मरेपर्यंत करून घेतात. जर एखादय वेळी पुरुष कामासाठी बाहेर गेला असेल तर घरातील नुकतीच आई झालेल्या स्त्रियांना काम करण्यासाठी जावे लागत असे . पण कामाच एकही दिवस चुकवत नसे. या समाजातील लोकांचे काही पारंपरिक व्यवसाय होते. गावात जर कोणी मेल तर त्याच्या नातेवाईकांना जावून खबर देणे. गावात डॉक्टर आला तर घरो घरी जावून मुलांना टोचायचा निरोप पोहोचवणे. त्यांची ही खबर ऐकून मुले रडत असे त्यामुळे घरातील मंडळी त्यांना श्व्या देत असे. त्याचा

अपमान करत असे. स्त्रिया रानात जावून गावत, लकड गोळा करून गावात जावून विकत असे.[12](पृ.११) गावात जावून शीळ अन्न ते गोळा करत असे. याच अन्नावर त्याचा संपुर्ण कुटूंब जगत असे.

स्त्रिया पहाटे उठून आपल्या घरातील सर्व कामे उरखून त्या देशमुखच्या नाय तर तलीवाराच्या वाड्यावर कामे करायला जात असे. त्याच्या गोठ्यातील सर्व कामे ती करत असे. हा त्याचा रोजचा दिनक्रम होता. स्त्रिया या लोकांची बाहेरील सर्व कामे करत असे. पण या बदलेत त्यांना शव्याची बरसात मिळत असे. त्याच्यावर हे काम लादल्याप्रमाणे रोज सकाळी त्यांना हे करावे लागत असे. गावात जर कोणाचे लग्न असेल तर महिना दीड महिना अगोदर त्यांच्याकडून सर्व कामे करून घेतली जात असे. काम करूनही त्यांना जेवण मात्र सर्वाचे झाल्यावर राहिले उष्ट, उखिरड्यावर पडलेल सर्व त्याच्या नशीब. गावात जर चोरी झाली तर या लोकांनी चोराचा शोध घ्यावा. चोराच्या पावलांचे ठसे शोधावे, ठसायाचा शोध लागल्यावर बाहेर गावाहून पोलीस येई पर्यंत त्या ठासायचे रक्षण करावे जर त्यांनी तसे केले नाही तर लोकं त्यांना मारत असे. काम करूनही त्यांना लोकांकडून खूप वाईट वागणूक मिळत असे. समाज त्याची कधी स्तूथी करत नसे उलट त्यांना शिव्या देत असे. समाज कधी या लोकांशी चांगल, प्रेमळ वागलाच नाही. त्याचा नशिबी फक्त शिव्या आणि उष्ट अन्न ऐवडत होत.

## ४.५.२ वर्णव्यवस्था

वर्णव्यवस्थेच्या नावाने हा समाज भरडला गेला. त्यांची उपस्थिती समाजात अपशकुन मानली जावू लागली. समाज त्यांना कोणत्याच कार्यात शामिल करत नसे. या समाजातील लोकांना पापी म्हणून संबोधले जात असे. समाज त्यांना आपले गुलाम असल्यासारखे वागवत असे. त्यांच्याकडून सर्व कामे करून घेत असे. या व्यवस्थेचा भाग असल्याकारणाने त्यांनी लोकांची सेवा करणे हे त्यांचे कर्तव्य असे. समाज कधीच त्यांना आदराने वागवत नसे. त्यांची सावली सुद्धा शाप मानली जात असे. गावाबाहेर त्यांची घरे असतात जिथे माणसाची येजा होत नाही. अशा उकिरड्या जागेवर या समाजातील लोकांची वस्ती असे. समाज त्यांना सतत जाती वरून हाक मारत असे. माणूस कुठेही गेला तरी प्रथम त्याला त्याची जात विचारली जाते. माणूस समाजात जातीवरून ओळखला जातो.या जातीवरून त्याचे भविष्य ठरले जाते. जातीवरूनच त्याला वागणूक दिली जाते. या व्यवस्थेमुळेच शाळेत मुलांना खाली कोपऱ्यात बसावे लागते. मुले त्यांना आपल्यामध्ये मिसळून घेत नसे. या व्यवस्थेचा भाग असल्याकारणाने

त्यांना नेमून दिलेली ठराविक कामे करावी लागत असे. समाजात त्यांना मान ताठ करून चालता येत नसे, सतत मान वाकून चालावे लागत असे.

### ४.५.३ अस्पृश्यता

अस्पृश्यता ही मानसिकतेच्या रूपाने समाजासमोर उभी राहिली. माणसानेच अस्पृश्यतेचे बीज पसरवलेले आहे. शूद्र समाजाचा एक घटक म्हणून ही अस्पृश्यता मानली जाते. या अस्पृश्यतेचे चटके या समाजात जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला होत असते. त्याचप्रमाणे लेखिकाही या समाजाचा एक घटक असल्याकारणाने तिच्याही वाट्याला हे अस्पृश्यतेचे चटके अगदी लहान वयापासून आले होते. जेव्हा लेखिका शाळेत जात होती त्यावेळी तिला या अस्पृश्यतेची जाणीव प्रथमता झाली. या समाजाशी तिची नाळ जुळलेली असल्या कारणाने वर्गात बाई तिला खाली एका कोपऱ्यात बसवत असे. 'फक्त हातभर अंतर ठेवून बस'[13](पृ.१३) बाई तिला सांगत असे आणि संकोच न करता ती बसत असे. त्या ५ वर्षाच्या मुलीला अस्पृश्यता काय असते, आपल्या सोबत असे का वागतात याची जरासुद्धा कल्पना नव्हती. इतराप्रमाणे तिला वागणूक मिळत नसे. बाई ज्या प्रमाणे इतरांची पाटी तपासे, त्याच्यासोबत प्रेमाने वागे अशा प्रकारची वागणूक लेखिकेला कधी मिळाली नाही.

पाटी तपासताना हा भेदभाव तिच्या लक्षात येत असे. इतरांची पाटी बाई त्यांना टेबलापाशी बोलवून त्यांना तिथे बसून तपासत असे पण लेखिकेच्या बाबतीत अगदी उलट होताना दिसून येई. लेखिकेला कधी टेबलाला धरून, टेबलावर पाटी ठेवण्याची परवानगी नसे. 'तू थोडी लांबून आणि उंचावरून टेबलावर पाटी टाक.'[14](पृ.१४)पाटी तपासून झाल्यावर ती परत येताना जमिनीवरून सरपटून तिच्याकडे परत लोटली जात असे. अशातऱ्हेच टोचक वागणे लेखिकेला बाईकडून मिळत असे. स्वतः शिक्षिका असून ज्या शिक्षिकेला सर्व मुले समान असायला पाहिजे, अशा व्यक्तीकडून ही अस्पृश्यता पाळली जात होती. ज्या व्यक्तीकडून विद्यार्थी शिकत असतात, त्यांना आदर मानून त्याच्या प्रेरणेने चालत असतात. तीच व्यक्ती ही अस्पृश्यता पाळते. या सर्वाचा परिणाम विद्यार्थ्यांवरही झालेला दिसून येतो. बाईला पाहून विद्यार्थी शिकत असतो, त्या ज्या प्रकारे वागतात तशाच पद्धतीने इतर मुलंही लेखिकेशी वागत असे. पाट्या पुसण्यासाठी वर्गात एका मातीच्या भांड्यात पाणी ठेवलेले असे. त्या पाण्याला लेखिकेला स्पर्श करता येत नसे त्यामुळे एखादी मुलगी दुरूनच लेखिकेच्या पाटीवर पाणी शिंपडत असे. जिथे विद्येसाठी, ज्ञान

मिळवण्यासाठी नवीन पिढीला पवित्र स्थानी पाठवले जातात, त्याच पवित्र जागेवर ही अस्पृश्यता शिकवण्यात येत होती.

समाजाच्या विचित्र परंपरेचे दर्शन आपल्याला होते. ज्या प्रथेचा काहीच अर्थ नाही अशी प्रथा या समजावर लादल्या जातात. जिथे अस्पृश्यता विचित्र रूप धारण करताना दिसून येते. काही बोलत नाही मुकाट्याने ऐकून घेतात म्हणून त्यांना जनावरांप्रमाणे वागवताता. आषाढ महिना हा या सामजाचा महिना समजला जातो. ‘आषाढात फक्त म्हारापोरांची लग्न उरकतात, आकाढ भरभरी आन म्हार लग्न करी’.[15]( पृ.१८) गावातली लोकांची भयानक मानसिकता इथे दिसून येते. आषाढ महिन्यात गावातील लोकांची कुणाचीच लग्न होत नसे. म्हणून या जमतीतील लोकांची लग्न या महिन्यात करण्यात येत असे. याच महिन्यात करण्याचे कारण म्हणजे त्याच्या अन्नावरील माशे गावातील सवर्ण समाजातील लोकांच्या अन्नावार बसणार नाही आणि त्याचे अन्न बाटणार नाही. म्हणून या समाजातील लोकांची लग्न गावातील लोकांची लग्ने होत नाही त्या महिन्यात केली जाते. अशी विचित्र अस्पृश्यता समाज पाळताना दिसून येतो.

या लोकांचा आनंद समाजाला पाहवत नसे. त्याच्या प्रती जरासुद्धा माणुसकीने वागत नाही. तिही माणूस आहेत, त्यांना सुद्धा समाजात जगण्याचा अधिकार आहे. पण हा समाज त्यांचे हे अस्तित्व ओरबाडून घेतो. एक वेळ जनावरांना ते मायेने, आपुलकीने जवळ करतील पण या लोकांना नाही. त्यांना जनावरांहूनही हीन दर्जाची वागणूक दिली जाते. त्याच्या आनंदात समाज अडथळे निर्माण करतो. त्याच्याकडून समाजाने माणसांप्रमाणे जगण्याचा हक्क काडून घेतला आहे. त्यांच्या लग्नात नवर देवाने घोड्यावर बसायचं नाही, वाजत गाजत वारत न्यायची नाही, तसेच गावात आत या लोकांना प्रवेश नसायचा. गावा बाहेरून त्यांनी जायचे. अशी विचित्र प्रथा त्याच्यावर लादण्यात आली होती.

लेखिका शिकायला खूप हुशार होती. शिक्षणातच नव्हे तर इतर सर्व गोष्टीत ती माहीर होती. या सर्व गोष्टींची इतरांना चीड यायची. एकदा गॅदरिंगच्या समारंभात ती अस्पृश्य समाजातील असल्याकरणने जेवणाच्या पंगतीत बसायला दिले नाही. समाज या लोकांना शांत जगू देत नाही. वारंवार त्याचा अपमान करणे, त्यांच्याशी तोडून बोलणे असेल प्रकार चालूत असे. माणूस कितीही विकसित झाला तरी समाज त्यांना अस्पृश्यता विसरू देत नाही. पिढ्यान् पिढ्य

ही अस्पृश्यता चालूच असते. समाज जरी परिवर्तन झाला तरी माणसाची मानसिकता बदलणार नाही. ही अस्पृश्यता लेखिकेच्या मुलीच्या वाट्याला आली होती. शाळेत मुले तिला 'म्हार' म्हणून चिडवत असे. तिला तिच्या जमातीवरन हाक मारत असे.  शाळेतील लहान मुलांना ही अस्पृश्यता लागत होती.

या लोकांच्या नशिबी फक्त यातना होती. त्यांना कोणतीही गोष्ट सहज मिळत नसे. ती मिळवण्यासाठी त्यांना खूप परिश्रम घ्यावे लागतात. पिण्याच्या पाण्याचा त्रास सर्व अस्पृश्य लोकांना होत असे. त्यांना प्यायला पाणी मिळत नसे. गावातील सर्व विहिरींवर लिहिलेलं असे ' ही विहीर सर्वांना खुली आहे '. पण या उलट होताना दिसून येते. त्यांना एक गाडगी पाण्यासाठी तासनतास उभे राहून सवर्ण समाजातील लोकांची वाट बघत बसावे लागत असे. ती येणार तेव्हा त्यांना प्यायला पाणी मिळत असे. ऐवढ्या वाईट दशेतून त्यांना जावे लागत असे. त्यांना कुठेच मोकळा श्वास घेता येत नसे. जिथे तिथे अस्पृश्यतेच्या नावाने त्यांची पिळवणूक केली जाते.

वाण्याच्या दुकानात गेल्यावर पहिल्यांदा जात विचारली जात असे. जात विचरूनच त्यांना सामान दिले जाते असे. लोकांना कुठेच स्वतंत्र नव्हते. जाती जमाती वरून सतत टोमणे ऐकून घ्यावे लागत असे. समाज भावनाहीन असल्याप्रमाणे या लोकांशी वागत असे. बोलताना त्याच्या जिभेवर माणुसकी नावाचे एक अक्षर नसे. लेखिका या समाजाचा भाग असल्याकारणाने तिला लोक राहायला जागा देत नसे. घर मिळवण्यासाठी त्यांना वण वण भटकावे लागत असे. घर मिळे पण जेव्हा जात समजली जायची तेव्हा त्यांना जायला सांगत असे. अस्पृश्यतेचे भूत त्याच्या मांगुटावर बसत असे. समाज त्यांना ह्दय नसल्याप्रमाणे वाटेल ते बोलत असे.

## ४.५.४ दारिद्र्य

दारिद्र्याने नटलेले त्यांचे जीवन होते. जिथे तिथे दारिद्र्याचे दृश्य दिसून येते होते. त्याच्या जीवनाचा एक घटक म्हणून या दारिद्र्याकडे पाहिले गेले. त्यांना राहायला धड झोपडी नाही आणि खायला अन्न नाही. अशा परिस्थितिचे जीवन ते जगत होते. त्याच्या जीवनावर प्रकाश टाकला तर भयानक दृश्य समोर येत असे. त्याच्या आुष्यात त्यांनी फक्त दुःखच पाहिले होते त्याचे संपुर्ण आयुष्य याच दारिद्र्यात गेले पण त्याच्या चेहेरेवर किंवा मनावर याचा परिणाम झालेला दिसून येत नाही. अशा दारिद्र्याभऱ्या जीवन जगत असतानाही त्याचे मन अगदी साफ होते.

या लोकांची वस्ती गावाबाहेर जिथे माणसाची ये जा होत नाही अशा ठिकाणावर. साधारणपणे बैलगाडीच्या आत जेवढी जागा असते तेवढ्यात जागेत ते आपली झोपडी उभारत असे. झोपडी हेच त्यांचे विश्व होते. झोपडीला भिंती नसायच्या पुठ्ठे लावून झोपडी उभारलेली असायची. छप्पर म्हणून भोगले पडलेल्या पात्र्यांचा वापर करत असे. झोपडीला दार ऐवजी एखादा कपडा लावला जातो. खायला अन्न नसायचे गावात भीक मागून, शिळ, उखिरडा अन्न ते गोळा करून आपल्या कुटुंबाचे पोट भरत असे. पोट भरण्यासाठी रानात जावून लाकडे, गवत गोळा करून गावात ते विकायचे. अख्या दुनियेला लाकडं विकणारी तिच्या स्वतःच्या चुलीसाठी तिच्याजवळ लाकडे नसायची. घरी जाऊन आपल्यालाही चूल पेटवायची आहे याचा तिला विसर पडायचा की जाणून बुजून विसरायची असे दारिद्र्यने भरलेले जीवन ही लोक जगत होती.

समाज या त्यांच्या दारिद्र्य जीवनाचा फायदा घेत असे. शेतकामासाठी त्यांना मजुरी म्हणून किडली ज्वारी, जाळी लागलेली ज्वारी मजुरी म्हणून देत असे. त्यांच्या पोटाला भुकेने आग लागलेली असते त्यामुळे त्यांना कसलेही अन्न चांगलेच वाटते. घरचा पुरुष जर कामासाठी बाहेर गेलेला असेल तर, पोट भरण्यासाठी नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री झाडलोट करायला जात असे. अशा हिंदर्जाच्या समाजात ही लोक जगत असे. गावातील सर्व लोकांची घाण या समाजातील लोकांनी काढली पण त्यांच्या नशिबी फक्त शिळं अन्न आले. त्यांना चांगले अन्न कशाला म्हणतात हेच माहीत नव्हते. त्यांना अन्न म्हणजे फक्त शिळ उखिरड्यावरील अन्न एवढेच माहीत होते

## ४.६ स्त्री जीवन

दलित स्त्रियांचे जीवन दुःखाने, वेदनेने, दारिद्र्याने भरलेले आहे. त्यांनी कधी सुख पाहीले नाही त्यांचे पूर्ण आयुष्य दुःखाच्या डोंगराने भरलेले आहे. समाजाने तिला दुय्यम लेखलेले आहे. त्यांच्या विचारांना भावनांना समाजात स्थान नाही. तिचे सर्व अंगाने शोषण झाले आहे. सर्वात जास्त छळ कोणाचा झाला असेल तर तो दलित स्त्रियांचा आहे. याचे कारण म्हणजे तिला सवर्ण समाजही छळतो आणि तिची स्वतः ची मणिसे छळतात. भारतीय समाज पुरुष प्रधान असल्या कारणाने स्त्रिया त्याच्या गुलाम आहेत असा त्याचा समज आहे. त्याच्यावर आपला मालकीचा हक्क दाखवताना दिसून येतात.

या स्त्रिया आपल्या कुटुंबासाठी रात्र दिवस कष्ट करताना दिसून येतात.आपले कुटुंब उपाशी राहू नये म्हणून त्या जिवाच्या आकांताने कष्ट करताना दिसून येतात. गावात लोकांची मिळेल ती कामे करून त्या कामाचा मोबदला म्हणून उष्ट, शीळ अन्न आपल्या कुटुंबासाठी गोळा करून येतात. स्त्री आपल्या कुटुंबासाठी राब राबणारी आहे. सासरच्या माणसांकडून कितीही छळ झाला तरी गप्प मुक्या प्राण्यांप्रमाणे सहन करणारी आहे. आपल्याला कितीही त्रास झाला तरी चालेल पण माहेरच्या माणसांना त्रास होता कामा नये. सासरचे नाव खराब होता कामा नये म्हणून ती सर्व वेदना, दुःख, शोषित असते. त्यांचे संपूर्ण जीवन हे दारिद्र्याने भरलेले आहे. माहेरी दुःख आणि सासरी दुःख हेच त्यांचे जीवन होते. सासरी माया करणारा कोणी नसे. ज्याच्यावर विश्वास ठेवून ती त्या घरी पाऊल ठेवी तोच तिचा छळ करे. घरात कामवाली बाई असल्याप्रमाणे दिवस आणि रात्र काम करत रहावे लागत असे. आवाज न करता त्या सर्व यातना सहन करत असे.बाईचे जीवन हे शोषण्यासाठी असते यांचे उत्तम उदाहरण म्हणजे ही ४ आत्मकथने. या आत्मकथनांतून स्त्रियांच्या शोषित जीवनाचे दर्शन घडते.

## ४.७ 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतील स्त्री जाणिवा

बेबी कांबळे यांनी 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतून तत्कालीन समाजातील स्त्रीयांची अवस्था दर्शवलेली आहे. त्यांचे दुःख, वेदना,यातना, पिळवणूक इत्यादीच दर्शन या आत्मकथनांतून दिसून येते. समाजात एक स्त्री म्हणून जन्माला आल्याकारणाने तिच्या वाट्याला आलेले बईपणाचं दुःख, त्यात विशेषता या समाजात जन्माला आल्या कारणाने अस्पृश्यतेची जाणीव अशा असंख्य वेदनेतून जाणाऱ्या स्त्रियांचे दर्शन या आत्मकथनांतून घडते. कोणत्याही जातीतील स्त्री असो समाज तिची पिळवणूक सर्व अंगाने करतो.

### ४.७.१ कौटुंबिक जीवन

स्त्री जातीला समाजाबरोबर कुटुंबाची यातनाही सहन कराव्या लागतात. कुटुंबात कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांची पिळवणूक केली जाते. स्त्रियांच्या यातनामय जीवनाचे दर्शन घडते. सुख कशाला म्हणतात यांची जाणीव त्यांना कधी झाली नाही. त्यांच्या आयुष्यात फक्त दुःखाचा डोंगर आहे. जन्माला आल्यापासून ते उतार वयापर्यंत आयुष्यात फक्त दुःख. ज्या वयात त्यांना शिक्षण मिळायला पाहिजे त्या वयात त्यांची लग्न केली जाते. बालविवाहाची प्रथा मोठ्या प्रमाणात त्यांच्यात दिसून येते. त्यांना विवाह म्हणजे काय, नवरा कोणाला म्हणतात हेच माहीत नाही

त्या वयात त्यांना संसाराच्या प्रपंचात बांधून ठेवतात. जे वय त्यांचे खेळण्या बागळण्याचे असते त्या वयात त्यांना विवाहाच्या बंधनात बांधून ठेवले जाते. या कोवळ्या वयातील मुलीकडून त्यांचे बालपण हिरावून घेतले जाते आणि त्यांना या दुःखाच्या खाणीत धकलले जाते. ती या शोषण व्यवस्थेची शिकार बनते. त्या लहान कोवळ्या मुलीवर सासरची माणसे अन्याय अत्याचार करतात.  एक स्त्री दुसऱ्या स्त्रीचे शोषण करते. या शोषणामागे त्यांची मानसिकता दडलेली आहे. भारतीय संस्कृती ही पुरुष प्रधान संस्कृती आहे त्यामुळे स्त्रिया पुरुषांवर वर्चस्व दाखवू शकत नाही. सवर्ण समाजही त्यांच्यावर वर्चस्व दाखवतो. आपलाही कोणावर तरी वर्चस्व असावा म्हणून या स्त्रिया आपल्या सुनीवर वर्चस्व दाखवतात. त्यांना आपला गुलाम असल्या प्रमाणे वागणूक दिली जाते. घरातील सर्व मंडळी तिचे शोषण करतात. त्या लहान मुली कडून सर्व घामा कष्टाची कामे करून घेतली जाते. जर तिने वेळेवर किंवा बरोबर केली नाही तर तिची चार चौघात अब्रू कडली जाते. तिला नको नको ते बोलून तिचा वाटोळा केला जातो. घरातील मंडळीकडून शिव्यांची बरसात होते.

दलित स्त्रीच्या दुःखाला कोवळ्या वयात सुरुवात होते. त्या लहान मुलीला झोपायला पण सवड नसे काम करून ती बिचारी थकून जात असे. सर्वाची जेवण झाली की तिने जेवायचे, भांडी उकरायची आणि नंतर झोपायला जायचे. सकाळी तीनला कोंबड्यांना बांग दिली की सासू त्या बिचाऱ्या मुलीच्या झिंजिला धरून उठवायची आणि कामाला बसवायची. त्या बिचाऱ्या मुलीला सकाळ ते रात्र होईपर्यंत काम करून घ्यायची. तिला खायला पुरेपूर अन्न द्याच नाही. वयात आलेल्या सूनीचे सासू वेगळ्या प्रकारे छळ करायची.सूनेविरुद्ध मुलाच्या मनात वाईट भाव निर्माण करायची, सुनेला व मुलाल भेटू द्यायचे नाही, शेजाऱ्यांना सून आपला छळ करते आपल्याला मारायचे कटकारस्थान रचत असे . कुटुंबातील माणसे सुनेचे एवढे शोषण करतात की तिला बिचारीला घर सोडून पळून जाण्याशिवाय पर्याय राहत नाही. घर सोडून कुठे जाणार त्यांना माहेरी पण हाकलून दिले जाते. त्यांना ना सासरी सुख ना माहेरी दोन्ही बाजूने त्यांची पिळवणूक केली जाते. पळून गेलेल्या सुनेचे अधिक छळ केले जात असे. त्यांचे नाक कापण्यात येत असे जेणे करून तिला इतरांनी पाहू नये. तिच्या पायाला लाखडाचा खोड बांधण्यात येत असे. जेणे करून तिला घरातून बाहेर पडता येत नसे. त्या खोडामुळे त्याच्या पायातून रक्त येत असे. तिला शारीरिक त्याचबरोबर मानसिक त्रास देण्यात येत असे.तिला या अशा भयानक छळातून जावे लागत असे. तिला आपल्याच कुटुंबातील माणसाचा मार खावा लागत असे.

आपला मुलगा आपलाच रहावा यासाठी ती त्या बिचाऱ्या मुलीचे शोषण करते. सासूचा छळ तिच्या सासुने केलेला असतो. तो राग तिच्या मनात असतो आणि याचं वेळेची वाट पाहत ती आपल्या सुनेचा छळ करते. घरात सून आल्यावर तिच्यातील सासू जागी होते. तिला आपल्या सुनेला छळण्यात आनंद मिळतो. या अशा मानसिकतेची लोक या समाजात होती. एक  स्त्रीचे आपले दुःख हलके होण्यासाठी दुसऱ्या स्त्रीचे शोषण करते. या अशा स्त्रियांचे चित्रण बेबीताईने आत्मकथनांतून समाजासमोर मांडले आहे.

या समाजात सतत दारिद्र्य,भुकेने व्याकूळ झालेला समाज, गरिबी, उपासमारी इत्यादी कायमचे सोबती. घरात खायला अन्न नसे, नुकत्याच आई झालेल्या बाईला खायला अन्न मिळत नसे. साधी तिला तांदळाची पेज पण मिळत नसे. ती भुकेने व्याकूळ होऊन, त्रासून आपल्या पोटाला घट कपडा बांधून पडून राही. खायला घरात अन्न नसल्या कारणाने अनेक स्त्रियांचे भुकेने व्याकूळ होऊन प्राण गेले आहेत. या समाजाला त्या बाईचे मुळीत कौतुक केले जात नाही. ती मुत्यूला सामोरे जावून आलेली असते त्यांची या समाजातील लोकांना पर्वा नसते. त्यांना खायला अन्न मिळत नाही तर हा समाज त्या बाळंतणीचे लाड कसे करणार हे या समाजातील लोकांचे दुर्दैव आहे.

## ४.७.२ समाज आणि दलित स्त्री

भारतीय समाज हा पुरुषसत्ता मानणारा आहे. समाज स्त्रियांना दुय्यम मानतो.त्यांना आपले विचार,आपली भावना व्यक्त करण्यासाठी, आपल्या हक्कासाठी लढता येत नाही. समाजात त्यांच्या विचारांना वावा दिला जात नाही. त्यांना मुक्तपणे बोलता, फिरता येत नाही. त्यांचे जगणे हे गुलामगिरीचे जगणे असते. सतत कोणाच्या छाये खाली जगावे लागते. समाज त्यांचावर आपले विचार लादतो. हे जगणे समाजातील सर्व स्त्रियांचे जगणे आहे. त्यात दलित स्त्रियांचे जगणे हे अधिक त्रासदायक आहे. समाजात त्यांचा संघर्ष हा एक स्त्री म्हणून आणि दुसरे म्हणजे एक दलित स्त्री म्हणून चाललेला असतो. दलित असल्याकारणाने त्यांना अनेक दुःखातून, वेदनेतून, जावे लागते. या समाजाचा भाग असल्याकारणाने तिच्याकडे पाहण्याची दृष्टी, तिला मिळालेली वागणूक ही खूप हीन दर्जाची असते.

ही स्त्री खूप कष्टी असते. आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी ती रात्र दिवस राबताना दिसून येते. रानात जावून लाखडे, गवत गोळा करून गावात मराठ्यांच्या घरी जावून विकते. त्या मिळालेल्या पैशातून घरासाठी लागणाऱ्या वस्तू विकत घेत. असा जास्तीत जास्त स्त्रियांचा दिनक्रम असतो. पण समाज त्याच्या या कष्टाला वाव देत नाही. जेव्हा त्या

विक्रीसाठी जातात तेव्हा त्यांच्या वस्तूंना कमी भावात घेण्याच्या नादात ते त्यांना वाटेल ते बोलतात. त्याच्या या कार्यात ते सफल पण होताना दिसून येतात. जोपर्यंत त्याचा माल संपत नाही तोपर्यंत त्याच्या पोटाची खळगी भरणार नाही म्हणून त्या वाटेल त्या किंमतीला वस्तू विकतात. समाज त्याच्या या जगण्याचा फायदा घेताना दिसून येतो. त्यांना मिळालेली वागणूक ही जनावराहूनही खूप हीन दर्जाची असते. अस्पृश्यतेच्या भीतीने समाज त्यांना माणूस म्हणून पाहत नाही. त्यांनी या समाजात जन्माला येऊन खूप मोठे पाप केले यांची जाणीव ते वारंवार त्यांना करून देतात. त्याच्या हातातल्या वस्तु त्यांना चालतात पण त्या वस्तूंवर चुकून तिचा केस किंवा एखादी दोरा जरी आली तर त्यांचे घर विटाळायाचे. या भीतीने तिच्याकडून त्या वस्तूचे बारीक निरीक्षण करून तपासून घेतले जाते. समाजाची मानसिकता या अशा वाईट विचाराने भरलेली दिसून येते. विटाळाच्या भीतीने त्याची ही वागणूक असते पण त्यांना या गोष्टीचा विसर पडतो की रानात हे सर्व गोळा करत असताना त्याचा घाम, काही लागून आलेले रक्त त्याच्या त्या वस्तूवर पडलेले असते. त्यांना हे चालते पण त्याचा एखादा केस किंवा कपड्याचा धागा या गोष्टीने त्याचा विटाळा होतो. या सर्व प्रकणातून एकाच गोष्टीचा बोध होतो तो म्हणजे समाज त्यांना छळण्यासाठी वाटेल त्या स्थरावर जावू शकतो. त्यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठीचा हा प्रयत्न असतो.

दलित स्त्रियांचे जगणे हे खूप त्रासदायक असते. समाज त्यांना छळण्याचा, त्यांची पिळवणूक करण्याचा एकही क्षण सोडत नाही. त्यांची पिळवणूक ही सर्व अंगाने केली जाते. वाटेत जाताना जर त्यांना सवर्ण समाजातील लोक मिळाले तर त्या स्वतः काट्या खुट्यातून जातात आणि त्यांना चांगल्या वाटेने जायला मार्ग मोकळा करतात.आपली सावली देखील त्याच्यावर पडणार नाही याची दक्षता त्या घेतना आपल्याला दिसून येतात. समाजात त्यांना सन्मान नाही. त्यांनी पाप केल्याप्रमाणे जीवन जगावे लागते. या समाजातील स्त्रिया त्यांची सर्व कामे करतात पण त्यांना आधाराने कधी वागवले जात नाही.

या स्त्रियांना आपल्या मनाप्रमाणे वागता येत नाही. समाजातील सर्व बंधनाचे पालन त्यांना करावे लागते. त्यांना पटलिनीप्रमाणे  काश्टी न्हेस्ता येत नाही. समाज त्याच्या भावनांची कदर करत नाही. एखादी स्त्री दुकानांत समान आण्यासाठी गेली तर पहिल्यांदा तिला शिवी दिली जाते. तिला हव्या त्या वस्तू लांबून तिच्या ओटीत टाकत असे. लोक आपल्या मुलांना लहान वायातत दरात त्या स्त्रीला पाहून अस्पृश्यतेचे धडे शिकवत असे. त्यांना आपला वर्चस्व दाखव्याचा असतो म्हणून त्या या समाजातील स्त्रियांशी अशा रित्या वागताना दिसून येतात. समाज कितीही सुधारला

तरी त्याची मानसिकता बदलणार नाही. त्याची वागणूक ही खूप वाईट स्वरूपाची असते. समाजातील लोक त्याच्याकडून सर्व कामे करून घेतात आणि या मोबदल्यात त्यांना शीळ अन्न दिले जाते. सर्व काम करूनही त्यांना चांगले अन्न मिळत नाही. समाज त्यांना सतत घालून पाडून बोलतो.

### ४.७.३ भाव – भावना

समाजात स्त्रियांच्या भावनांची कदर केली जात नाही. ती आपल्या कुटुंबासाठी रात्र न दिवस कष्ट घेताना दिसून येते पण तिच्या मनाचा विचार कोणी करत नाही. यंत्रणाप्रमाणे ती काम करत असते. यंत्रणाला कसे मन, हृदय नसत त्याचप्रमाणे समाज स्त्रियांना याचं नजरेने पहात असतो. तिच्याविषियी कोणाला आपुलकी नाही. जन्माला आल्यापासून ते मृत्यूपर्यंत त्यांच्या आयुष्यात फक्त दुःखच असते. त्यांना ना माहेरी सुख असते ना सासरी. त्यांचे संपूर्ण आयुष्य हे लोकांची सेवा करण्यातच गेले. घरातील सर्व कामे करून त्यांना खायला अन्न मिळत नाही. एका अन्नाच्या घासासाठी त्यांना आपल्याच माणसाशी गायावाया करावी लागते. त्यांना आपले विचार, भावना व्यक्त करण्यास वावा नव्हता.

घरात त्याचप्रमाणे समाजात त्यांना मिळणारी वागणूक ही अत्यंत हीन स्वारुपाची होती. या जगण्यातून थोडा तरी सन्मान मिळावा यासाठी या स्त्रिया अंगात येण्याचे दर्शवतात. हे सर्व करण्यामागे त्यांचा एकच प्रामाणिक उद्देश असतो तो म्हणजे थोडा वेळ का असेना समाजाने त्यांना आदराने वागवावे. अंगात येणे हे देवाचे रूप समजून त्यांना समाज आदराने देवाप्रमाणे वागवत असे. थोडा वेळ का असेना त्यांना सन्मानाने, आदराने वागवले जात असे, त्यांना या जगण्याचा थोडा तरी लाभ मिळावा याच मानसिकतेतून या स्त्रिया अंगात येण्याचे दाखवत असे. या अशा प्रकारे त्या आपल्या मनातील भावना व्यक्त करून दाखवत असे. स्त्रियांरसाठी व्यक्त होण्याचा हा एक मार्ग असल्याप्रमाणे सर्व स्त्रिया या अंगात येण्याचे दाखवून आपले मन हलके करत असे.

घरात तिला खायला न मिळाल्याने ती जेवणाकडे पाहत बसायची तेव्हा सासू तिच्या पुढ्यात थोडे टाकून म्हणत असे 'पोराच्या घासाकड सारखी बघत बसलिया त्याच्या नरड्यात घास तरी उतरू देत जा'. तिच्याशी भावनाहीन प्रमाणे वागले जात असे. स्त्री म्हणून जन्माला येऊन पाप केल्याप्रमाणे तिला वागणूक दिली जात असे.मुलीचे बाल वयात लग्न करून तिला या दुःखच्या खाणीत ढकले जात असे. लहान वयातच सासुरवाशीनीचे दुःख भोगावे लागत असे.

त्या लहान मुलांकडून सर्व कामे करून घेतली जात असे. वयात आल्यावर वेगळ्या प्रकारे छळ केला जात असे. तिला खायला धड देत नसे तिची परिस्तिथी ही जनवराहूनही खूप वाईट होत असे. तिच्या मनाचा कोणी विचार करत नाही. या अशा यातनेतून तिला जावे लागते. आपली काहीही चूक नसताना केवळ २ वेळेच्या अन्नासाठी तिला या यातनेतून जावे लागते. तिच्या वेदनेची, दुःखाची कोणाला दया येत नाही. हा समाज भावना शून्य आहे. त्यांचे हृदय हे दगडाचे आहे.

समाजात स्त्रियांच्या भावनांना किंमत नाही. त्यांचे मन कोणी जाणलेच नाही. त्यांना काय हवं, काय नको याकडे समाजाने कधी लक्ष दिले नाही. या स्त्रिया हिंदू धर्म, संस्कृती जीवापाड जपतात. या स्त्रियांनी त्यांच्याप्रमाणे वागायचे, बोलायचं नाही. दोघेही शेवटी माणूसच म्हणून जन्माला आली तरी समाजाने त्यांचावर अशा प्रकारे बहिष्कृत केले आहे. त्यांच्या मनाची कोणाला पर्वा नाही. या स्त्रिया कुंकुची प्राणापलीकडे जपणूक करतात. हा कुंकू जरी दुःखाने भरलेला असला, त्रास देणारा, छळ करणारा जरी असला तरी त्याची देवा समान पूजा केली जाते. स्त्रीचे मन हे हळवे असते पण याच हळव्या मनाचा कोणी विचार करत नाही. ज्या कुंकूची त्या प्रणापलीकडे जपणूक करतात तोच कुंकू तिच्या भावनांची कदर करत नाही. आपल्या कुटुंबाच पोट भरण्यासाठी ती कष्ट करताना दिसून येते. पण तिच्या कष्टांना किंमत दिली जात नाही. असा हा संवेदन शून्य समाज आहे जो आपल्या स्वार्थासाठी समोरच्या व्यक्तीची भावना दिसत नाही.

### ४.७.४ स्त्री शिक्षणासाठी केलेला संघर्ष

हा कालखंड स्वातंत्रपूर्व असल्या कारणाने त्या काळात या समाजात शिक्षणाचे महत्तव माहीत नव्हते. त्यांना माहीत होते ते फक्त लोकांची सवर्ण समाजाची गुलामी करणे एवढेच. हेच त्यांचे विश्व होते. या समाजापर्यंत शिक्षण पोहोचले नव्हते. शिक्षणाने काय भले होणार आम्हाला लोकांची चाकरीच करायला पाहिजे हेच आमचे जगणे आहे. या समाजातील लोकांची हीच मानसिकता होती. त्यांना आपला समाज सुधारावा या गोष्टीकडे त्याचा लक्ष नव्हत. १९३० मध्ये आंबेडकर वार झळकताना आपल्याला दिसून येऊ लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली या समाजाचे आत्मभान जागृत झाले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजले. केवळ शिक्षणाने त्यांना चांगले दिवस येणार यांची त्यांना जाणीव झाली. या समाजातील लोकांनी आपल्या मुलांना शाळेत घातले. सवर्ण समाजाला

हे पटले नाही ते या मुलांना म्हणत असे 'पोरंबाळ शिकून काय त्याला मास्तरबिस्तर करायच है व्हय?''[16]( पृ.६३) या प्रकारे ते या लोकांना ठोमणे मारत असे. या लोकांना त्यांची झालेली प्रगती पहावत नसे. मुली शिकून काय करणार त्यांना पुढे घरच सांभाळावे लागणार. त्यांना शिक्षणाचा काय उपयोग होणार.याच मानसिकतेची लोक समाजात वावरत होती. पण त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून मुली मोठ्या प्रमाणत शाळेत जावू लागली. शाळेत काय आणि समाजात काय तेच ऐकायला येत असे. याचे कारण म्हणजे त्याचीच मुले ज्यांना जन्मापासून या जातीयतेचे बीज त्याच्या मनात रुजवले जात असे. त्याचा परिणाम त्या मुलावर झालेला दिसून येतो. शाळेत मुलांचा वेगळा छळ होत असे. वर्गात त्यांना खाली बसवत असे. त्यांची पाटी दुरून तपासली जात असे. वर्गातील मुलाची, बाईची या मुलानं प्रती वागणूक खूप वाईट असे. त्यांना सतत घालून पडून बोलणे, त्यांची छेड कडणे सतत चालू असे. त्यांच्या शिक्षणात अनेक अडथळे निर्माण करण्यात येत असे. त्या अडथळयांना सामोरे जावून जिद्दीने त्या शिक्षण घेतात आणि नवी सुशिक्षित पिढींचा उगम होतो.

### ४.७.५ दलित स्त्रियांचे जगणे

दलित स्त्रियांचे जगणे हे खूप भयानक स्वरूपाचे असते. तिची लढायी ही सर्वांत प्रथम एक स्त्री म्हणून आणि दुसरी म्हणजे एक दलित स्त्री म्हणून. त्यांनी कधी सुख कशाला म्हणतात हे पहिलंच नाही. त्यांचे आयुष्य हे दुःख, दारिद्र्य, वेदना यांनी सतत भरलेलं असे. याचं जगण्याला त्यांनी आपले विश्व संबोधलेले आहे. या स्त्रिया कष्टी आहे. आपल्याला कुटुंबासाठी रात्र दिवस कष्ट करताना दिसून येतात. आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी रानातील वस्तू गावात विकून त्या मिळालेल्या पैशातून घरासाठी लागणाऱ्या वस्तू विकत घेते. नवरा दारुडा असला, मारपीट करीत असला तरी सहन करते न संसाराचा गाढा ओढते. आपल्या कुंकूवाला प्राणापलीकडे जपणाऱ्या या स्त्रिया आहे. त्यांना खायला अन्न नाही घालायला वस्त्र नाही अशी त्यांची दशा आहे. त्याच्याजवळ एकच साडी जी अनेक साड्या मिळून बनलेली असते. तिला साडी न म्हणता आपण गोदडी म्हणू शकतो. एकच वस्त्र असल्या कारणाने महिन्याची पाळीवेळी तिला थेट नदीकाठी जावे लागते. तिच्याजवळ बदलायला दुसरे लुघड नसे. अर्दे वस्त्र उन्हात वाळवायला ठेवत आणि वाळलेले परिधान करीत असे. तिचा सारखी पिळवणूक होत असे. असे दारिद्र्याने भरलेले जीवन ती जगत होती.

एका घासासाठी त्या वन वन भटक्यांच्या. गावात जावून लोकांच राहिलेले शीळ, उष्ट, उकिरड्यावर पडलेले अन्न त्या गोळा करून आणत असे. त्या उष्ट्या अन्नावर त्यांचे कुटुंब जगत असे. त्या गावात जावून ते अन्न गोळा करून रानात जात असे घरी आल्यावर त्याच्या नशिबी ते शीळ अन्नपण राहत नाही. घरातील मंडळी ते सार फस्त करून टाकत असे.उपासमारीचे जीवन त्या जगत असे. अशा परिस्थितीत त्या जीवन जगत असे. पोटाची भूक थांबवण्यासाठी ही माणस बोंड खाताना दिसून येतात. त्यांच्या तात्पुरत्या भुकेचा बंदोबस्त होतो पण दुसऱ्या दिवशी त्यांचे हाल हाल होतात. त्याच्याजवळ पर्याय नसतो पोटाची आग थांबवण्यासाठी त्यांना हे करावे लागते. असे भयानक दृश्य आपल्याला दिसून येते.

दलित स्त्रियांचा पेहराव हा अतिशय सादा. कोणीही पाहिलं तर लगेच लक्षात येणार असा त्याचा पेहरावा असतो. डोकीवर पदर, त्या पदराने संपूर्ण कपाळ झाकलेला. गावठी कासोटा घातलेला. त्या कसोट्याला किनारीची पट्टी द्यायची नाही. कारण तशी कास पटलिनींनी घालायची असते.असा या स्त्रियांचा पेहरावा असतो. समाज व्यवस्थेने या स्त्रियांवर नियम घालण्यात आले होते की त्यांनी कथालाचे दागिने परिधान करावे.[17]( पृ.५३) त्याच्यावर हे बंधन लादण्यात आले होते. दलित स्त्री म्हणून समजायला समाजाने त्याच्यावर हे बंधन घातले होते. बळतीणीच्या वेळी या स्त्रियांचे हाल हाल होतात. त्या मृत्युला सामोरे जावून आलेल्या असतात पण यांची कोणाला पर्वा नसते. असे या . स्त्रियांचे जीवन होते. दुःखाने, यातनेने, नेवेदनेने भरलेले जीवन त्या जगत असतात. त्यांचे माहेरी हाल आणि सासरी हाल इथून तिथून त्यांचे जीवन सारखेच. सासरी काम करून त्यांना खायला अन्न मिळत नसे. घरातील सर्व मंडळी त्यांचे शोषण करत असे. अनेक स्त्रिया त्या शोषणाने आपले जीवन त्रासून संपून टाके.

## ४.८ 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील स्त्री जाणिवा

'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतून शांताबाई कांबळे यांनी आपल्या संपूर्ण जीवनाचे चित्रण केले आहे. जीवन जगत असताना तिला भोगाव्या लागलेल्या वेदना, दुःख, यांचे दर्शन या आत्मकथनांतून घडते. आयुष्यात प्रथमच स्त्री शिक्षणाची संधी मिळालेल्या दलित स्त्रीच्या संघर्षमय जीवनाची कहाणी आहे. दलित असल्याकारणाने तिला आलेले अनुभव, दुःख यांचे दर्शन या आत्मकथनांतून घडतो.

## ४.८.१ कौटुंबिक जीवन

स्त्री म्हटले की तिचा संबंध कुटुंबाशी आलाच.आपले कुटुंब राखण्यासाठी ही स्त्री खूप काबाड कष्ट करते. आपल्या कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी ती तयार असते. पण हेच कुटुंब तिच्या जीवावर उठताना दिसून येतात. अक्काची मुलगी गोमी तिचे शारीरिक मानसिक सर्व अंगाने शोषण केले जाते. ज्याचा विश्वासाने ती आपले माहेरच घर सोडून सासरी नांदायला येते तोच जीवनसाथी तिला त्रास देता. आपल्या आईच्या मुठीत राहून आपल्या पत्नीचे तो शोषण करतो. गोमीकडून सर्व घाम कष्टाची कामे करून घेतली जाते. या कामाच्या मोबदल्यात त्यांना खायला अन्न पण दिले जात नाही. जनावरांप्रमाणे तिच्याकडून कामे करून घेतली जाते. तिला विश्रांतीला पण वेळ दिला जात नाही. येवढे करूनही गोमीला सासरच्या माणसाकडून आपुलकी, जवळकी भासली नाही. या उलट जरा कामाची गती कमी झाली किंवा थोडा वेळ मोकळ होण्यासाठी बसली तर शिव्यांची बरसात सुरू होते. गुरां ढोरांप्रमाणे काम करूनही तिला खायला अन्न मिळत नाही. त्या जनावराना पण काम झाल्यावर मायेने त्यांचावर हाथ फिरून त्यांना खायला चार दिली जाते पण गोमीला काम करूनही सासू घरातील मंडळी खायला देत नाही. तिची दशा ही सुकलेल्या मरकडलेल्या लाकडाप्रमाणे झाली होती. या अशा अत्याचाराला त्रासून ती माहेरी पळून जाते. स्त्रियांचे जीवन हे कळसूत्री बाहुल्याप्रमाणे झालेले आहे. या बाहुलिंची दोर त्याच्या कुटुंबाकडे असते. त्यांना हव्या त्या पद्धतीने त्यांना वागवले जाते.

लेखिकेच्या आईला ३ मुलीचं झाल्या म्हणून कुटुंबातील माणसे उदास दिसून येतात. या उदासीचे रूप राग क्रोध घेतना दिसून येतो. या निराशेच्या भारत लेखिकेचे वडील त्या जन्मलेल्या मुलीला म्हणजेच लेखिकेला जीवंत पुराण्याचा प्रयत्न करतात. त्यांना मुलगा हवा असतो आणि मुलगी जन्माला आल्याकारणाने ते हे पाऊल उठवताना दिसून येतात . मुलगा म्हणजे वंशाचा दिवा आणि मुलगी म्हणजे धनाची पेटी अशा मानसिकतेची माणसे आपल्याला समाजात दिसून येतात. स्त्रियांना आपल्या मनाप्रमाणे वागता बोलता येईना. लेखिकेला आपला सवंगडी चुन्याचा पण हक्क नव्हता. ज्या मुलाबरोबर आपल्याला अख्ख आयुष्य घालव्याचे आहे त्या साथीदाराची निवड करणे हा हक्क लेखिकेजवळ नव्हता. तिला धड विचारण्यात पण आले नाही. वडील जो निर्णय घेणार तोच त्याच्यासाठी लागू पडत असे. तिचे भाग्य अशा रित्या जोडले गेले. तो साथीदार चांगला निघाला तर बर नाही तर तिचे पूर्ण आयुष्य

बरबाद. स्त्रियांना आपला गुलाम असल्याप्रमाणे त्याच्यावर आपले विचार थोपण्यात येत असे. तीचे बरे वाईट पाहण्यात येत नसे.

आमची संस्कृती पुरुषप्रधान असल्या कारणाने पुरुष स्त्रियांना आपले गुलाम असल्याप्रमाणे वागवत असे. पती परमेश्वर असल्याप्रमाणे स्त्रिया कितीही अपमान त्रास झाला तरी त्या सहन करताना दिसून येतात. पुरुष आपला वर्चस्व दाखवण्यासाठी कुठल्याही स्तरावर जावून पोहोचतात. पुरुष कितीही लग्न करू शकतो कारण तो पुरुष आहे. त्याला आपणच श्रेष्ठ असल्यासारखे वाटत असते आणि या असल्या मानसिकतेत स्त्रियांचे बळी जातात. त्यांना या नको त्या मानसिकतेतून जावे लागते. लेखिकेची चुलत सासू लग्नाच्या वेळी रडली म्हणून तिला सासऱ्यानी कायमची माहेरी पाठवून दिली. त्यांनी दुसरे लग्न केले तिलाही खूप त्रास देवू लागले. तिला कुलूप लावून कोंडून ठेवू लागले. घरी आल्यावर तिच्यावर उगाच संशय घेऊन तिला मार मार मारायचे. पुरुषप्रधान संस्कृती असल्याकारणाने त्यांना वाटत आपण कसेही वागू शकतो. आपल्याला कोणी विचारणार नाही. आपणच आपले मालक आहोत या अशा मानसिकतेतून ते स्त्रियांचे शोषण करत असतात. त्यांचावर आपला मालकी हक्क दाखवत असतात. स्त्रियांना छळण्यासाठी सतत त्यांचे प्रयत्न चालू असतात. बारीक बारीक करणे शोधून तिला त्रास देण्यात येतो.

लेखिका नविन लग्न करून सासरी जाते तेव्हा सासरची माणसे नव्या सुनिला त्रास देतात. घरातील दळण चांगले येत नाही म्हणून शेजारच्या घरी दळायला जाते . या कारणाने तिला नको नको ते बोलण्यात येते. तिच्यावर कौटुंबिक हिंसा केला जातो. घरात लेखिका असताना कांबळे मास्तर आपल्या फायद्यासाठी मास्तर मामाच्या मुलीशी लग्न करतो . या त्यांच्या अशा कार्याने आपल्या कुटुंबाचे वाटोळे होणार याकडे त्याचे लक्ष नसते. त्यांना फक्त आपला फायदा दिसतो. त्या फायद्यापोटी ते दोन मुलीचे आयुष्य बरबाद करून टाकतात. पुढे त्या मुलीशी जमले नाही म्हणून परत पहिल्या बायकोकडे म्हणजे लेखिकेकडे वळतात. याचा अर्थ एकच होत तो म्हणजे स्त्री ही एका खेळण्याप्रमाणे आहे आपल्याला हवे तेव्हा त्या खेळण्याबरोबर खेळू शकतो. याच मानसिकतेतून पुरुष स्त्रियांवर आपला मालकी हकक दाखवताना दिसून येतात.

## ४.८.२ समाज आणि दलित स्त्री

समाज हा जीवनाचा एक घटक आहे. आपण जे जीवन जगत असतो ते जीवन समाजाच्या धाग्याने जोडलेले असते. या समाजात स्त्रियांच्या कार्याला अधिक महत्व दिला जात नाही. त्यांच्या विचारांना, भावनांना समाजात स्थान नाही. त्यांनी फक्त चूल आणि मुल एवढ्या पुरतीच त्यांचे जीवन आहे. हेच कार्य करायला त्याचा जन्म झाला आहे. समाज त्यांना आपल्या मनाप्रमाणे जीवन जगायला देत नाही. त्यांना सतत कोणत्या ना कोणत्या बंधनात बांधून ठेवले जाते. त्यांचावर आपला मालकी हक्क दाखवण्यात येतो. स्त्री ही  सवर्ण समाजाची असो किंवा दलित स्त्री असो ती या समाजव्यवस्थेत गुलामीचे जीवन जगत आली आहे. ही व्यवस्था जन्माला आणारा समाजच आणि हा समाज पुरुषप्रधान असल्या कारणाने स्त्रियांना आपले गुलाम असल्याप्रमाणे वागवले जाते.

त्या रात्रंदिवस आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी झिजताना दिसून येतात. रानात जावून गवत, बिंड गोळा करून गावात विकून आपल्या कुटुंबाचे पोट भरते. पण समाजाचे ध्यान त्याच्या या कष्टावर जात नाही. त्यांची वस्तू कमीत कमी दरात ते विकत घेतात. त्याच्या कष्टांना समाज काहीच किंमत देत नाही. आपला फायदा कसा होणार याच विचारात ते एका गरिबाच पोट कापतात. सर्वजण जन्माला येताना माणूस म्हणूनच या पृथ्वीवर आलो पण नंतर याचं लोकांनी वर्णव्यवस्थेच्या नांवाने लोकांची विभागणी केली. ज्या देवाची आराधना अगदी मन लावून केली त्याच देवाचे दर्शन घेण्यास समाजाने त्यांना दिले नाही. लेखिका पायी पांढरपुरला जाताना त्यांना हा अनुभव आला. एक दलित स्त्री असल्या कारणाने त्यांना विहिरीवर घेतल नाही. तिथल्या लोकांनी सर्वात प्रथम लेखिकेची जात विचारली. समाजाचा सलु हा असा आहे जात विचारून त्यांचे स्वागत केले जाते. त्यांच्यावर उपकार केल्याप्रमाणे तिथली माणसे वागत असतात. पाणी हा सर्व सामान्य माणसाचा हक्क आहे पण त्याच हक्कासाठी त्यांना यातना करावी लागते. त्याचे टोचक बोलणे ऐकावे लागते. समाजातील लोकांचा स्वभाव या विशिष्ट लोकांना प्रती खूप वाईट होता. जाणून बुजन त्या या लोकांना आपला वर्चस्व दाखवण्याचा प्रयत्न करतात.

लेखिकेला शाळेत घातले म्हणून तिच्याविषयी गावभर बोंबील उठे. तिला सतत टोमणे मारले जात असे. समाजाची मुळी मानसिकता या लोकांप्रती खूप वाईट आहे. त्यांना या लोकांचे चांगले झालेले पाहावत नाही. मुलींना शाळा शिकून काय करायचे आहे पुढे जावून त्यांना घराचं सांभाळायचे आहे. अशा मानसिकतेची लोक या लोकांना त्रास

देताना दिसून येतात. समाजात एकट्या स्त्रीला पाहून तिचा फायदा कसा घेता येणार म्हणून लोक वाट पाहत असतात. लेखिका मास्ताराने दूसरे लग्न केले म्हणून त्या कायमच्या माहेरी आल्या . एकट्या स्त्रिला पाहून समाज तिचे जगणे मुशकिल सोडतो. त्यात जर एखादीचा नवरा तिला टाकून दुसरे लग्न करतो तर त्या स्त्रीचे समाज धिंडोर उडवतो. पुरुष आपला मालकी हक्क असल्या प्रमाणे लेखिकेशी वाटेल तसे वागताना दिसून येतात. लेखिकेला सतत मागणी घालणे, तिची रस्त्यातून येता जाता वाट थांबवणे असले प्रकार चालूच असतात. अबला स्त्री पाहून समाज तिच्याविषयी वाटेल ते बोलताना दिसून येतो. तिच्या दुःखात अजून खत पाणी घालताना दिसून येतो.

या आत्मकथनांत  असे ही काही प्रसंग आले आहे जिथे एखादी स्त्री शाळा शिकवू शकते हे समाजाला पटत नाही. स्त्रियांनी केवळ घरात राहावे, घर सांभाळावे येवढेच स्त्रीचे विश्व आहे. या पलीकडे तिने काही करायचे नाही तिला मापून दिलेल्या लक्ष्मण रेखातून बाहेर पडायचे नाही. अशी समाजाची मानसिकता आहे. त्या स्त्रियांना दुय्यम मानतात. त्यात जर ती दलित असली तर तिचा अधिक छळ केला जातो. स्त्रीने समाजातील लोकांचे म्हणे एकले नाही तर त्या शाळेतील बाईंना जीवंत मारून टाकत असते. पुरुष स्त्रियांवर आपला मालकी हक्क दाखवण्याच्या नादात त्या कोवळ्या मुलीची हत्या केली जाते. या हतेचे कारण केवळ एकच असते ते म्हणजे तिने गावातील दोन्ही बाजूचे म्हणे ऐकले होते. खरे कारण म्हणजे त्यांना स्त्रियांना आपला दंम दाखव्याचा असतो. या आत्मकथनांत  समाज स्त्रियांच्या शोषणाबरोबर त्यांची हत्या पण करतो. कारण नसताना एखाद्या कोवळ्या मुलीचे प्राण घेतले जाते.

समाजातील सुशिक्षित लोकांना पण ही अस्पृश्यता मोठ्या प्रमाणत लागताना दिसून येते. बडवे या स्वतः एक शिक्षिका असून त्यांना ही जात पात लागताना दिसून येते. लेखिका दलित असल्याकारणे त्यांच्या हातचे जेवण बडवेना चालत नाही. त्यांचा तोंडावर अपमान केला जातो. अशी माणसं जी स्वतः एक शिक्षिका असून या असपृश्यतेवर त्याचा जीवापाड विश्वास आहे. अशी माणसे देशाचा विकास कसा करणार? ज्याचा मनात खोड आहे ती व्यक्ती मुलाचे भवितव्य कसे घडवणार?. समाजाने कोवळ्या मुलाचा मनात या अस्पृश्यतेचे बीज रोवलेले आहे. लहान वयातत त्यांना अस्पृश्य लोकांशी कसे वागायचे, बोलायचे याचे धडे शिकवले जाते. लेखिकेची मुलगी छाया तहान लागली म्हणून मैत्रिणिच्या घरी आपल्या हाताने पाणी पिते तर त्या पाण्याला तिचा स्पर्श झाला म्हणून ती मैत्रीण पूर्ण पाण्याचा गाडगा खाली करते. लहान कोवळ्या मुलांची ही अशी मानसिकता आहे. समजाच्या या

जाणिवेतून या लोकांना सुटका नाही. माणूस जरी पातळावर पोहोचला तरी त्याचा समाज पाठलाग सोडणार नाही. आपण श्रेष्ठ दाखवण्यासाठी गरिबाला चिरडून टाकण्याचा त्याचा प्रयत्न संपणार नाही.

### ४.८.३ भाव भावना

पुरुषांप्रमाणे स्त्रियांना ही मन असते याचा समाजाला विसर पडला आहे. त्याच्या भवनाची कोणाला फिकीर नसते. तिला कस वाटणार, तिला काय हवं याकडे कोणाचे लक्ष जात नाही. स्त्री म्हणजे एक महान व्यक्ती जिला दुःख, वेदना, यातना होत नाही. त्यामुळे तिच्यावर कोणीही येऊन आपला क्रोध काडू शकतो. ती सर्व मुकाट्याने एक शब्द न उच्चारता सहन करणार. तिच्या या गुणांचा समाज फायदा घेतना दिसून येतो. तिच्या विचारांना, भावनांना समाजात स्थान नाही. तिने फक्त सहन करावे ना की आपल्याला व्यक्त करावे. समाज हा अशाच मानसिकतेतून स्त्रियांवर अन्याय करत आला आहे. त्याच्या भावनांशी खेळत आला आहे. तिलाही मन आहे, ती पण माणूस आहे जिला वेदना दुःख होतात याचा समाजाला विसर पडला आहे.

एखादीला जर शिक्षणाची आवड आहे आणि ती जर मुलगी असेल तर हे लोकांना पाहवत नाही. त्याच्या मते शिक्षण हे केवळ मुलांनी घ्यायचे असते. समाजाच्या या मानसिकतेत खोड आहे या अशा बोलण्याचा त्या मुलीवर काय परिणाम होणार यांची कोणाला चिंता भासत नाही. त्या मुलीची भावना दुखावणार याकडे कोणाचा लक्ष जात नाही. शाळेत पण या मुलांना दलित असल्या कारणाने अनेक संकटातून जावे लागते. त्याच्याशी घालून पाडून बोले जाते, त्यांना खाली बसवले जाते, इतरांहून खूप वेगळ्या पद्धतीची वागणूक त्यांना दिली जाते. मुले ही देवकडची फुले असतात असे संबोधले जाते पण या मुलाच्या बाबतीत हे होताना दिसून येत नाही. कोणत्याही जमातीतील का असे ना शेवटी ती माणूस आहे आणि विशेषता ती लहान मुले आहे. या अशा हाकेने तिच्या कोवळ्या मनावर काय परिणाम होणार याकडे त्यांचे लक्ष जात नाही. लेखिका सवर्ण समाजाच्या मुलीशी खेळताना तिला पाहून जाणून बुजून लेखिकेला ऐकू येईल या आवाजात आपल्या मुलीला तिच्या सोबत खेळू नको, लांब राहा म्हणून सांगणे. या अशा वागण्याने तिला काय वाटणार, तिची भावना दुखावली जाणाऱ्याकडे कोणाचे लक्ष नसते. ती आपल्या मुलीसाठी आहे तिच्या सोबत मायेने आपुलकीने वागणे यांचे भान समाजाला राहत नाही. लहान बाल मनावर याचा

परिणाम काय होणार याकडे समाजाचे लक्ष नसते. मुलाशी कसे वागायचे, तिच्या भावना दुखावल्या जाणार नाही याची दखल कोणी घेतना दिसून येत नाही.

माणूस हा दिवसेन दिवस संवेदन शुन्य बनत चालला आहे. त्याचे ह्रदय हे दगडाचे बनत चालले आहे. समोरच्याचे दुःख समजण्याची क्षमता त्यांच्याजवळ राहिलेली नाही. एक स्त्री असून दुसऱ्या स्त्रीच्या भावनेशी खेळताना दिसून येते. गोमीकडून दिवस रात्र काम करून तिला खायला पोटभर अन्न दिले जात नाही. गोमीशी मायेने आपुलकीने बोलले जात नाही. तिला केवळ काम करण्यासाठी लग्न करून आणले आहे अशा विचाराने तिच्याशी घरातील मंडळी वागताना दिसून येतात. तिच्या मनाची कोणाला पर्वा नसते तिला काय हवं नको याची कोणी विचारपूस करत नाही. ती एक काम करण्याचे यंत्रण आहे याच मानसिकतेने घरातील मंडळी तिच्याशी वागतात. समाज सोडाच आपलीच माणसे संवेदनशील होत चाललेली आहे. हे या स्त्रियांचे दुर्दैव आहे.

पुरुषप्रधान संस्कृती असल्याकारणाने ते त्याच्या भावनेशी खेळताना दिसून येतात. स्त्रीचे मन हे एक खेळण आहे एक पसंत नाही म्हणून दुसरे आणले तिच्याशी थोडा वेळ खेळून परत पहिल्याकडे वळले अशा प्रकारे तिच्या भावनेशी, मनाशी समाजातील माणसे खेळताना दिसून येतात. इथे तिच्या विचारांना, भावनांना काहीच किंमत नाही तीन फक्त त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागायचे. आपल्या आनंदासाठी २ जीवाच्या भावनेशी खेळले जाते. पुरुषाना आपण पुरुष असल्याचा अभिमान वाटतो. आपण वाटेल ते करू शकतो अशी त्यांच्या मनाची समज असते. एकट्या स्त्रीला पाहून तिचा आपल्याला कसा फायदा होणार याकडे त्यांचे लक्ष असते. तिचे दुःख समजून न घेता तिच्या दुःखात अजून भर घातली जाते. समाज सुशिक्षित असून एखाद्याचे दुःख समजून घेण्याइतपत समाजाजवळ सुशिक्षित्ता नाही. एखाद्या स्त्रीशी कसे बोलावे, वागावे या सारख्या भावना नाही. स्त्री ही आपल्या उपभोगाची वस्तू आहे याच नजरेने तिच्याजवळ पाहिले जाते. ती एक माणूस आहे याचा सर्वांना विसर पडतो.

### ४.८.४ स्त्री शिक्षणासाठी केलेला संघर्ष

समाजात स्त्री म्हटले की तिने केवळ आपल्या कुटुंबासाठी झिजाव. या व्यतिरिक्त तिने काहीही करायचे नाही. आपली मुले आणि आपला संसार येवढ्या पुरतीच तिचे विश्व आहे. हेच कार्य करायला देवाने स्त्री जन्म केला आहे अशा मानसिकतेची लोक या समाजात राहताना दिसून येतात. या उलट जर तिने काही केले तर समाज तिच्या विरोधात

जाताना दिसून येतो. समाजात स्त्री शिक्षणाला मोठ्या प्रमाणात विरोध केला जातो. लेखिकेने या समाज व्यावस्थेविरुद्ध जावून शिक्षण घेतले. या व्यावस्थेविरुद्ध जाणे येवढे सोपे नव्हते. शिक्षण घेताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यात लेखिका दलित समाजातील असल्या कारणाने तिच्या वाट्याला अनेक अडचणी आल्या. या सर्व अडचणींना सामोरे जावून तिने आपले शिक्षण पूर्ण करून त्या शिक्षिका झाली. पुढे जाऊन त्या शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून रुजू झाल्या.

इथे पोहोचण्याचा मार्ग सोपा नव्हता. वाटेत अनेक अडचणीला सामोरे जावून त्या इथवर पोहोचल्या होत्या. मुलीला शाळेत घातले म्हणून लोक तिच्या आई वाडीलाना सुनावत होती. मुलीची कसली शाळा तिला शिकून काय करायचे आहे अशा मानसिकतेची लोक या समाजात होती. या असल्या बोलण्याकडे लक्ष न देता लेखिका शिक्षण पूर्ण करून चांगल्या पदावर पोहोचल्या. या सर्वाचे श्रेय जाते ते केवळ त्याच्या आई वडीलांना. त्याच्या आशीर्वादाने, त्यांच्या शिक्षणाच्या आवडीने, त्यांना शिक्षणाचे महत्त्व माहीत असल्यामुळे त्या शिक्षण विस्तार अधिकारी या पदावर पोहोचू शकल्या. शाळेत मास्तरांचा स्वभाव हा खूप वाईट होता. त्यांना इतर मुलाहून खूप वाईट वागणूक मिळत असे. खाली कोपऱ्यात बसून शिकावे लागतं होते अशा ना ना अडचणींना सामोरे जावे लागायचे.

शाळेत चांगले मास्तर नाही ते मरतात त्यांना वर्गात घेत नाही म्हणून तिने शिक्षण थांबवले नाही. शाळेत घालायला कपडे नसायचे आहे तसे फाडके कपडे परिधान करून लेखिकेने शिक्षण पूर्ण केले. वर्गात आपण एकटीच मुलगी आहोत म्हणून शाळेत जायचे थांबवले नाही.शिक्षण घेत असताना त्यांना खूप संघर्ष करावा लागला. या संघर्षाच्या फळांनी तिला या पदावर आणून पोहोचवले होते. शाळेतील सर्वच मास्तर हे वाईट होते अशातला भाग नाही. चांभार मास्तर, पाटील मास्तर यांच्या चागल्या स्वभावामुळे तिला शिक्षणाची गोडी लागली. पाटील मास्तर हे खरे मुलाचे भवितव्य घडवणारे मास्तर आहे. त्यांना जात-पात काही लागत नव्हत. त्यांनी केवळ शिक्षणालाच महत्त्व देऊन मुलांना शिकवले. क्षेत्रीय शाळा आहे म्हणून एका शिक्षकाने लेखिकेला घरीच थांबायला सांगितले होते. मुलीला क्षेत्रीय काम जमणार नाही तू मुलींच्या शाळेत पंढरपूरला जा म्हणून सांगण्यात आले होते. पंढरपूर हे खूप दूर असल्याकारणाने लेखिकेचे थोडा काळ का असेना शिक्षण थांबले होते. पाटील मास्तर हे त्यांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका निभावताना दिसून येतात. त्यांच्या पुन्हा आगमनाने लेखिकेची शाळा पुन्हा सुरू झाली. त्यांच्या कृपेने त्या शिक्षण विस्तार अधिकारी या पदावर जावून पोहोचल्या होत्या. एका मागासलेल्या समाजातील स्त्री एवढ्या

उच्च पदावर जावून पोहोचली होती. या सर्व गोष्टीचे श्रेय तिला स्वतःला, तिच्या आई-वडिलांना आणि पाटील मास्तरांना जात. त्यांच्या आशीर्वादामुळे त्या सर्व संघर्षांना सामोरे जावू शकल्या.

### ४.८.५ दलित स्त्रियांचे जगणे

दलित स्त्रियांचे जगणे हे कष्टाचे जगणे असते. आपल्या कोवळया मुलांना घरी साणून त्या रानात जाता. पोटाला काही नाही तहान भूक सर्व विसरून त्या आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी काम करताना दिसून येतात. कुठे कुणी कामाला बोलावले तर आहे तिथून सरळ त्या जागेवर पोहोचतात. मळणीच्या वेळी लेखिकेची आई केव्हा मालक जाणार आणि मातीत सांडलेली ज्वारी मिळणार याची वाट पाहा असते. बैलांनी मळणीच्या वेळी ज्वारी खाल्लेल्या असतात त्या ज्वारी शेणाच्या रूपात बाहेर पडायच्या त्या गोळा करण्यासाठी त्या एक टक वाट पहात बसे. दोन्ही ज्वारी मिसळायच्या नाही वेगळया वेगळया ठेवायच्या आणि मातीतल्या ज्वारीच्या भाकरी पुरुषांना द्यायच्या आणि शेणात सांडलेल्या ज्वारीच्या भाकऱ्या आपण स्वतः खायच्या आणि मुलीना द्यायच्या. पोटाच्या भुकेसाठी त्या वन वन भटकायच्या. त्यांचे जीवन हे असेच लोकांचे मागून खावून गेले आहे. त्यांना एकच प्रश्न भिडवायचा तो म्हणजे पोटाचा. त्यांना खायला अन्न मिळत नसे त्यांचे हाल हे जनावराहून्ही खूप वाईट होते.

घरात नुकत्याच आई झालेल्या बाईला खायला घरात काहीच नसे. ती भुकेने व्याकुळ होत असे. आपण सर्व सहन करू शकतो पण पोटाची आग थांबवू शकत नाही. घरात खायला काहीच नसल्याकारणाने ती बाई शेतात जावून भूक थांबवण्यासाठी बाजरीची कणसे खात बसते. असे दारिद्र्य भरे जीवन त्या जगत असतात. पोट भरण्यासाठी त्यांना घरात बसून चालत नाही. नुकत्याच आई झाल्या म्हणून त्यांना घरात बसता येत नाही. त्यांना पोट भरण्यासाठी काम करावे लागते तेव्हा कुठे त्यांच्या पोटात अन्नाचा निवाळा जाणार. असे हाल हालपिष्टेचे जीवन त्या जगत होत्या. बाजारच्या दिवशी लेखिकेला व त्याच्या कुटुंबाला लोकांची घाण काढायला जावे लागते. स्त्री जन्म म्हणून आणि विशेषता या समाजात जन्माला आल्याकारणाने त्यांच्या नशिबी हे दुःख भरे जीवन आले होते. त्यांना ना माहेरी सुख न सासरी सुख जिथे तिथे हाच वनवास त्यांच्या नशिबी होता.

### ४.९.१ 'अंतःस्फोट' या आत्मकथनांतील स्त्री जाणिवा

'अंतःस्फोट' हे कुमुद पावडे यांचे आत्मकथन आहे. या आत्मकथनांतून त्यांना आलेले अनुभव, वेदना यांचे दर्शन या आत्मकथनांतून घडते. आपल्याच लोकांकडून मिळालेली वागणूक यांचे दर्शन हे आत्मकथन करते.एका मागासलेल्या वर्गातील स्त्रीने एम. ए. संस्कृत भाषेतून केले म्हणून समाज तिला छळताना दिसतो. नोकरीसाठी, जाग्यासाठी झालेला संघर्ष या आत्मकथनांतून दिसून येते.

### ४.९.१ कौटुंबिक जीवन

स्त्रियांचे नाते हे कुटुंबाशी जोडलेले असते. ती आपल्या कुटुंबासाठी अनेक यातना सहन करत असते. आपला समाज हा पुरुष प्रधान असल्या कारणाने पुरुष त्यांना गुलामाप्रमाणे वागतो.स्त्री ही मुक्या प्राण्यांप्रमाणे सर्व सहन करत असते. स्त्रियांचा जन्म हा मोठ्या उत्साहाने साजरा केला जात नाही याचे कारण म्हणजे हुंडा. हुंडा देण्याची मोठी प्रथा आहे.या हुंड्यामुळे अनेक कुटुंबांना आणि स्त्रियांना त्रास होताना दिसून येतो. लेखिकेची मावशी मायबाई यांचेही आयुष्य यांच हूंड्यामुळे उदवस्थ झाले. हुंडा देऊनही मायबाईचा छळ कमी झाला नाही. त्यांना सासरची माणसे आणि तिचा नवरा खूप त्रास देवू लागला. त्यांना हवा तसा हुंडा देऊनही लागणाऱ्या सर्व वस्तू मायबाईला माहेरून आणाव्या लागत असे. एवढे करूनही तिला सुख मिळत नसे. सतत सासरच्या माणसांकडून ऐकून घ्यावे लागत असे. ज्याच्या विश्वासावर मायबाईने त्या घरात पाऊल ठेवले होते तोच तिच्याकडून जनावरांप्रमाणे काम करून घेत असे. तिची कोणाला दया माया येत नसे.

घरात लागणाऱ्या सर्व वस्तू संदुकात कुलूपकरून ठेवण्यात येत असे. आपल्यात घरात एक कामवाली म्हणून मायबाई जीवन जगत होती. घरात मायबाई असताना त्यांच्या नवऱ्याने दुसरे लग्न करून मायबाईचा खूप छळ केला. स्त्री ही हळवी असल्याकारणाने आणि केवळ माहेरच्या मायेपोटी मायबाई सर्व सहन करत असते. सासरी पायातील चपल याला सुद्धा मान होता पण मायबाईला काही मान नव्हता. पहिल्या पत्नीकडून म्हणजेच मायबाईकडून त्यांची केवळ अपेक्षा असते ती म्हणजे आपली सेवा करणे, आपल गुलाम म्हणून जीवन जगणे येवड्यापूर्तीच तिचे जीवन असते. अशा या दुष्ट पतीसाठी मायबाई वटसावित्रीचा व्रत धरतात. आपल्यावर हे दिवस येण्याचे कारण तोच असतो आणि याच दृष्ट माणसासाठी त्या व्रत धरताना दिसून येतात. पुढच्या जन्मी हाच नवरा मिळो म्हणून त्याच्या दिर्ग

आयुष्यासाठी त्या व्रत धरतात. तिला हे माहीत नाही की याच व्रताने त्यांच्या आयुष्यात त्या पुन्हा या दुःखाला आमंत्रण देत आहे. स्त्री ही पतीव्रता असल्याकारणाने हे वेदनेचे जीवन ती मुकाट्याने सहन करत असते. आपल्या सासरची आणि माहेरची अब्रू जाता कामा नये म्हणून त्या सर्व यातना सहन करत असते. पण तीच सासरची मंडळी तिचा नवरा तिची अब्रू रस्त्यावर काढायला मागे पुढे पाहत नाही. असे जीवन त्या जगत असतात. तिला कुटुंबाकडून आनंदाचे क्षण कधी पाहायला मिळाले नाही सतत त्रास, दुःख एवढंच तिच्या नशिबी होत.

लेखिकेने आंतरजातीय विवाह केला म्हणून सासरच्या माणसांनी पोटच्या पोराशी संबंध तोडले. जात कोणतीही असो शेवटी काय तर माणूसच पण समाजाला सोडाच स्वतः च्या माणसांनी संबंध ठेवला नाही. उलट मागासलेल्या जातीच्या मुलीशी लग्न केले म्हणून त्यांच्या कुटुंबाचे बरे झाले नाही. लेखिकने त्यांच्या  घराची अब्रू काडली आता कोणी त्यांच्या घरात मुलगी देत नाही म्हणून लेखेकेच्या नावाने शिव्या घातल्या जातात. माणसाच्या मानसिकतेत हे घट बसले आहे जेणे करून त्याची विचार शक्ती बंद झाली आहे. त्यांना जात दिसते पण आपल्या मुलाचा आनंद दिसत नाही. त्यांचा सुखी संसार दिसत नाही. स्वतःची माणसे संवेदनशील बनत चालली आहे. त्यांना आपला सन्मान मोठा या सन्मानपुढे आपल्या मुलाचे सुख त्यांना दिसत नाही. संकटाच्या वेळी सुद्धा कुटुंबातील माणसे पावत नाही. जेव्हा खरी गरज असते आणि त्या गरजेपोटी त्याच्याजवळ मदत मागायला पाठवले जाते तेव्हा पोटच्या पोराला मदत देण्यास नकार दिला जातो. दरवाजातून हाकलून दिले जाते एवढा माणूस संवेदनशील बनत चालला आहे. आपली अब्रू जाता कामा नये म्हणून माणूस येवढ्या खालच्या पातळीवर येऊन पोहोचला आहे.

या अशा लोकांमुळेच समाजाची मानसिकता बदलत नाही. बाहेरून जरी दाखवल आपल्या काही फरक पडत नाही तरी आतून फरक पडत असतो. या अशा लोकांची मने कधीच बदलणार नाही. त्यांना होटेलातल घामाच कोणाच्या हातचे चालत पण घरातील आपल्या सूनेच चालत नाही कारण ती मागासलेल्या वर्गातील आहे. मुलाला दाखव्याला आपण बदलो पण हा बदल त्याच्या स्वभावात दिसत नाही. मुलाच्या पुढ्यात चांगले वागायचे आणि नंतर आपण ओळखत नसल्याप्रमाणे वागयचे. टोचक बोलणे, घालून पाडून बोलणे या सारखा प्रकार चालूच असतो. स्त्रियांना सन्मानाने आदराने वागवत नसे. आपण देव असल्या सारखे सतत तिच्याकडून सेवा करून घेतली जात असे. लेखिकेची सासू आपल्या पतीच्या पायाचे तीर्थ पिण्यास भाग पाडत असे. अशा मानसिकतेची लोक या समाजात आहे आणि मोठ्या ताठ मानेने फिरताना दिसून येतात.

## ४.९.२ समाज आणि दलित स्त्री

लेखिकेला मोकळ्यापणे काही करता येत नाही तिच्यावर सतत पहारा चालू असतो. त्याच्या विचाराना समाजात काही स्थान नाही. त्या जर मुक्त पणे आपले विचार, भावना व्यक्त करू लागल्या तर समाज तिला नावे ठेवतो. तिच्या विचारांना समाजात मान्यता देण्यात येत नाही. तिच्या प्रत्येक गोष्टीला समाज नावे ठेवतो. लेखिकेने संस्कृत सारख्या भाषेतून एम. ए. केली म्हणून समाज तिला वाटेल ते बोलताना दिसून येतो. त्याच्या मते संस्कृत ही भाषा देवाची आहे आणि अशी देवाची भाषा या मगासल्याल्या स्त्रीने शिकावी म्हणजे आमचा देव भ्रष्ट झाला. अशा मानसिकतेची लोक या समाजात आहे. ज्यांना हे कठोर सत्य पटत नाही. त्याच्या मनात केवळ त्या स्त्रिप्रती राग,द्वेष असतो. समाज लेखिकेला अभिवादन करण्याऐवजी तोडून बोलताना दिसून येतो. त्यांच्या स्तुती पण रागाची भावना दिसून येते.

शाळेत संस्कृत शिकताना लेखिकेला या समाजाची असल्याकारणाने सतत घालून पाडून बोलले जात होते. स्वतः एक शिक्षक असून ज्या विद्यार्थ्याला एखाद्या विषयात गोडी आहे तो विषय शिकू नये म्हणून अनेक प्रयत्न केले जाते. शिक्षक असून अशी मानसिकता असलेली आपल्याला दिसून येते. त्याच्या मानसिकतेत संस्कृत भाषा दलित स्त्रीने शिकणे म्हणजे पाप आहे. त्यांचे सर्व पवित्र ग्रंथ भ्रष्ट झाले कारण शूद्र समाजातील स्त्रीने त्यांच्या ग्रंथांना स्पर्श केले. ही अशी मानसिकता घेऊन समाज जगताना दिसून येतो. एखाद्या व्यक्तीला समाजातील सर्व भाषा शिकण्याचा अधिकार आहे पण हा अधिकार समाज लेखिकेकडून हिरावून घेताना दिसून येतो. त्याच्या बुध्दीला हे पटत नाही. संस्कृत ही फक्त सवर्ण समाजातील व्यक्तीने शिकावी याच मानसिकतेत ते जगत असतात. समाज कितीही सुधारला तरी त्यांची मानसिकता जाणार नाही. लेखिकेला नोकरीच्या वेळी केवळ या समाजातील असल्या कारणाने नाकारले जात असे. एवढेच नव्हे तर इतर उमेदवारांहून लेखिका त्या जागेसाठी योग्य असते पण केवळ या समाजातील असल्या कारणाने तिला नाकारले जाते. बाहेर जाताना तिला ऐकू येईल याचं स्वरात टोमणे मारले जाते. 'आता यांनीही संस्कृत शिकावावां हं' असे बोलण्यात येत असे. समाजाला त्यांचे चांगले होताना पहावत नसे. त्याच्या मनातील क्रोध त्या टोमण्याच्या रूपात बाहेर काढत असे. असा हा संवेदनशुन्य समाज त्या स्त्रीची अवहेलना करत असे.

### ४.९.३ भाव भावना

स्त्रीने फक्त आपल्या पतीची सेवा करावी येवढ्यासाठीच तिचा जन्म झाला आहे. आपल्याच घरात एका कामवाली बाईप्रमाणे काम करावे. त्या बाईला ना इजत ना मान सन्मान फक्त काम करत राहावे. तिच्या भावनांची कोणाला कदर नसते. तिला सुद्धा इतरांप्रमाणे हृदय आहे याचा त्यांना विसर पडला आहे. स्त्री ही संवेदनशील असते तिला दुःख होत नाही अशी समाजाची मानसिकता असते. मायबाईच्या लग्नाच्या वेळी भरमसाट हुंडा घेवूनही तिला लागणाऱ्या सर्व वस्तू माहेरून आणाव्या लागत असे. आपल्याच घरात परक असल्याप्रमाणे तिच्याशी वागले जात असे. मायबाईला सतत घालून पडून बोलणे, तिच्या माहेरच्या माणसाविषयी वाईट बोलणे असेल प्रकार चालूच असत. तिच्या मुकेपणाचा फायदा घेतना दिसून येतात. घरात मायबाई असताना दुसरे लग्न करणे आणि मायबाई समोर त्या पत्नीशी चांगले वागणे जेणे करून तिच्या भावना दुखावल्या जाणार. घरात मायबाईला ठेवण्याचे कारण म्हणजे त्याची सेवा करण्यासाठी. मायबाईच्या मनाची कोणाला चिंता नसे. तिला काय वाटणार, तिला काय हवे याकडे कोणाचे लक्ष जात नाही त्यांना पाहिजे असते ते म्हणजे आपली चाकरी करणे. जो तो तिच्या भावनांशी खेळताना दिसून येतो. स्त्री झाली म्हणून काय झाले तिला पण हृदय आहे. इतरांप्रमाणे तिला पण वेदना होतात याचा विसर पडला आहे. पुरुषप्रधान संस्कृती असली म्हणून काय झाले तिच्या भावनांशी खेळण्याचा हक्क कोणाला नाही. पण या उलट होताना दिसून येते त्याच्या मानसिकतेत आपण पुरुष आपण काहीही करू शकतो हेच त्यांच्या डोक्यात घर करून बसले आहे.

लेखिका मागासलेल्या वर्गात जन्माला येवून संस्कृत सारख्या पवित्र देवाच्या भाषेतून शिक्षण घेतल म्हणून तिचा छळ करण्यात आला. तिला नको नको ते बोलून तिच्या भावनेशी खेळताना दिसून येते. कोणत्याही भाषेत शिक्षण घेणे हा सर्व माणसाचा हक्क आहे. आपल्याला ज्या गोष्टीत आवड असते त्या गोष्टीला विरोध करणे म्हणजे तिच्या भावनेशी खेळणे. याचा परिणाम तिच्या मनावर काय होणार याची कोणाला फिकिर नव्हती .

लहान वयात जेव्हा जात म्हणजे काय हेच माहीत नसते त्या लेखिकेला तिला अस्पृश्यतेचा सामना करावा लागला. तिच्या कोवळ्या मनाची कोणाला चींत नसे सतत तिला जतीवरन हाक मारण, आपल्या मुलांना तिच्या पासून दूर राहण्याचा उपदेश देणे चालूच असते. या अशा वागण्याचा तिच्या मानसिकतेवर काय परिणाम होणार याकडे त्याचा

लक्ष नसे. आपल्या मुला प्रमाणे ते पण कोणाचे मुल आहे याची जाणीव त्यांना राहत नाही. त्या कोवळ्या मनाशी कठोर रित्या वागताना दिसून येतात. मुलाने लेखिकेशी लग्न केले म्हणून समाजात त्यांना तोंड दाखवायला जागा राहिली नाही. जात कोणतीही असो ती पण त्याच्या सारखीच माणूस आहे. त्याच्या प्रमाणे तिला पण मन आहे जे दुःखत, त्याला वेदना होतात याचा त्यांना विसर पडला आहे. आपल्या प्रतिष्ठेसाठी पोटच्या पोराचा आनंद दिसत नाही असा हा संवेदन शून्य समाज आहे. आपल्या स्वतः च्या मुलाचा आनंद दिसत नाही. त्यांच्या या आनंदत त्यांना द्वेष दिसून येतो.

आपल्याच मुलीच्या भावनेची त्यांना कदर नाही. सुनिताचे लग्न वयात तिच्याहून बऱ्याच मोठ्या माणसाशी लग्न करून दिले जात असे. सुनिताच्या मनाची, भावनेची दखल घेण्याची घरातील माणसांना गरज भासली नाही. सुनिताचा जर कोणी विचार करत नाही तर तिने त्याचा विचार का म्हणून करावा? ती जेव्हा तिच्या पसंतीच्या मुलाशी लग्न करते तर ती मूर्ख आहे, तिला अक्कल नाही म्हणून तिला घरी नेण्याचा प्रयत्न केला जातो. तिच्या भावना, तिचा आनंद याकडे कोणाचे लक्ष जात नाही. तिच्या भावनेशी खेळताना दिसून येतात. आपल्या आनंदासाठी, आपल्या सन्मानासाठी, तिच्या भावनेचा गळा दाबला जातो.

## ४.९.४ स्त्री शिक्षणासाठी केलेला संघर्ष

स्त्रिला शाळेत शिकवायला पाठवणे म्हणजे मोठ पापा असा लोकांचा समज होता. त्यात जर ती मागासलेल्या वर्गातील असेल तर पाहूच नका त्यांनी थोर मोठा गुन्हा केल्याप्रमाणे त्यांना पाहत असे. स्त्री शिक्षणाला त्याकाळी जास्त वाव दिला जात नसे. तिला शिकून काय करायचे आहे तिचे जीवन हे केवळ पतीला अर्पण असते अशा मानसिकतेत समजा जगत असतो. समाज आपल्या मुलांना शाळेत पाठवत नव्हतेच इतरच्या मुलांनाही पाठवू देत नसे. मागासलेल्या वर्गातील मुले शाळेत जाताना त्याच्यावर दगड, माती मारणे असला प्रकार चालू असतो. हा समाज सुधारावा अस त्या लोकांना मुळीच वाटत नसे. ते त्याच्या कार्यात अडथळे निर्माण करत असतात. तरीही मोठ्या जिद्दीने लेखिकेने आपले शिक्षण पूर्ण केले. एम.ए. संस्कृत भाषेत शिक्षण पूर्ण करून त्या प्राध्यापिका म्हणून शिकवत आहेत. या पदावर पोहोचण्याचा मार्ग सोपा नव्हता.

इथे पोहोचण्यासाठी अनेक संकटना सामोरे जावून त्या इथवर पोहोचल्या होत्या. संस्कृत भाषेतून शिक्षण घेवू नये म्हणून शिक्षकाने अनेक प्रयत्न केले. स्वतः एक शिक्षक असून त्याची मानसिकता ही अशा विचारांची होती. एखाद्याने कोणतीही भाषा शिकणे हा त्याचा मानवी हक्क आहे. पण लेखिकेने हा विषय शिकू नये म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले पण तिच्या जिद्दी पुढे आणि आत्मविश्वासा पुढे कोणी टिकू शकला नाही. तिने याच विषयात एम. ए. पर्यंतचे शिक्षण घेवून त्या संस्कृत विषयाची प्राध्यापिका म्हणून शिकवत आहे. एखाद्याने ठामपणे ठरवले तर ते पुर्ण केल्याशिव्या त्यांना शांतता मिळत नाही याचे उत्तम उदाहरण कुमुद पावडे आहे. कोणी काही म्हणो त्या गोष्टीकडे लक्ष न देता जिद्दीने आपल्या ध्येयाच्या मार्गाने चालत जायचे, त्या मेहनतीचे फळ मिळतेच. समाजाने लेखिकेला अनेक नावे ठेवली तिला नको नको ते बोलण्यात आले पण तिने याकडे लक्ष दिले नाही. त्याच्या स्तुतीत पण क्रोध दिसून येत असे. तिच्या स्पर्शाने त्यांचे पवित्र ग्रंथ भ्रष्ट झाले असा त्याचा समज होता. एका दलित स्त्रीने संस्कृत जिला ते देवाची भाषा म्हणत असे अशा भाषेतून शिक्षण पूर्ण करून त्या भाषेची प्राध्यापिका म्हणून शिकवतात याचा त्यांना राग येतो. हा राग त्याच्या बोलण्यात, वागण्यात स्पष्टपणे दिसून येतो. या अशा मानसिकतेच्या लोकांमध्ये राहून त्यांनी आपले शिकणं पूर्ण केले. लोकांचं न ऐकता आपल्या मनाचं एकल. त्याच्या या संघर्षाचे फळ त्यांना मिळाले.

## ४.९.५ नोकरीसाठी केलेला संघर्ष

दलित समजाचा भाग असल्या कारणाने त्यांना सहज कोणतीही गोष्ट मिळत नाही.ते मिळवण्यासाठी त्यांना खूप परिश्रम घ्यावे लागतात. लेखिकेला एम. ए करून लगेच नोकरी मिळणार अशातला भाग नव्हता. नोकरी मिळवण्यासाठी खूप यातनेतून जावे लागते. एक म्हणजे त्या दलित होत्या आणि त्यात त्यांनी अशा विषयात एम. ए. केली होती जी लोकांच्या मानसिकते बाहर होती. प्रत्येक इंटरव्ह्यूला याच कारणामुळे त्यांना नोकरी मिळत नव्हती. उपस्थित उमेदवाराहून लेखिका त्या जागेसाठी योग्य असत पण केवळ मागासलेल्या वर्गातील असल्यामुळे त्यांना ती नोकरी मिळत नसे. जे इंटरव्यू घेतात त्या अशा स्वरात बोलून दाखवतात की त्याच्या कानामध्ये पोहोचले पाहिजे. 'आता याच्या हातून शिकावं लागणार हां' त्यांना तिचे संस्कृत शिकणे आवडत नसे त्यामुळे त्या जाणून बुजून तोडून बोलताना दिसून येतात.

एम. ए. चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊनही त्यांना नोकरी मिळत नव्हती. त्या एम. ए. करून २ वर्ष घरीच राहिल्या त्यांना नोकरी कुठेच मिळेना. त्यांनी अनेक कागद पत्र करून कैफियत केंद्रीय मंत्रिमंडळात लेखी स्वरूप पत्रे पाठवली. अनेक पत्रा नंतर त्यांना त्या वेळेचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना भेटण्याची संधी मिळाली. त्या भेटीत तिने आपली कहाणी सांगून मदतीची अपेक्षा मागितली. मंत्र्यांनी तिला आश्वासन दिले पण तबोडतोब नोकरी मिळेल हे आश्वासन दिले नाही.

नोकरी मिळत नाही हे पाहून तिने इंग्रजी विषयात एम.ए. करायचा निर्णय घेतला. प्रथम वर्ष पूर्ण करून त्याचे लग्न झाले. अर्थात त्यांचे लग्न हे आंतरजातीय होते. तिचे लग्न हे पाटलाच्या मुलाशी झाले होते. लग्नाला २ महिने झाले होते आणि त्यांना सरकारी महाविद्यालयात प्राध्यापिकाची नोकरी मिळाली. नोकरी मिळूनही तिच्या मनात निरशी होती ती म्हणजे तिला कुमुद पावडे म्हणून नोकरी न मिळता कुमुद सोमकुवरच्या नावाने नोकरी मिळाली होती. तिला नोकरी ही सोमकुवरच्या नावाने मिळणे हे यश नव्हते, तर खर यश यात असत जर तिला पावडे या नावाने नोकरी मिळाली असती.[18](पृ.३७) एखाद्याच्या आयुष्यात जात कशी अडथळा निर्माण करते याचे उत्तम उदाहरण या आत्मकथनांतून कुमुदच्या संघर्षातून दिसून येते.

### ४.९.६ दलित स्त्रीचे जीवन

दलित स्त्रियांचे जीवन हे इतर स्त्रियाहून वेगळे असते. त्यांचे दुःख हे इतरांच्या तुलनेत खूप जास्त असते. त्यांना समाजात मोकळ फिरता येत नाही. सतत कोणाच्या ना कोणाच्या भीतीने जीवन जगावे लागते. समाज त्यांना सुरक्षित वाटत नाही. त्यांना आपल्या मालकीच्या असल्याप्रमाणे वागण्यात येत असे. त्याच्यावरच बलात्कार केला जातो समाजाला माहीत असते त्या आवाज उठवणार नाही आणि उठवला तरी त्याचे कोण ऐकणार. या मानसिकतेतून त्या कोवळया मनाचा जीव घेतला जातो. समाजाची एक विचित्र मानसिकता दिसून येते ती म्हणजे दलित स्त्री ही आमच्या मालकीची आहे. याच बुध्दीने समाज तिचे शोषण करतो, तिच्यावर आपला सुड घेतो.

या स्त्रीचे जीवन हे दुःखानी भरलेले आहे. त्यांना सुख काय असते, आनंद कशाला म्हणतात याची जाणीव नसलेल्या त्या स्त्रिया आहे. त्याचे दुःख हे इतरांच्या दुःखा हून खूप वेगळे आहे. त्यांना राहायला चांगली जागा नाही. गावाबाहेर घाणीत उकिरड्यावर त्याच्या झहोपड्या आहेत. त्यांचे जीवन हे त्या घाण पाण्यातील किड्याप्रमाणे आहे. या स्त्रियांना

अनेक प्रश्नाच्या सामोरे जावे लागते. त्यांची दशा ही जनावराहूनही बतर झाली आहे. त्या भितीत आपले जीवन जगत असतात. शेतमालक येणार नाही ना, त्यांना शिव्या घालणार नाही ना,ही सतत भीती त्याच्या मनात असते . या भीतीचा तोडगा म्हणजे त्या पहारा ठेवण्यासाठी एखादीला आपल्या सोबत घेवून जात असे आणि नंतर आपली विधी पार पाडत असे. असे दारिद्र्य भरे जीवन त्या जगत असत. खायला एक वेळेच अन्न नाही अंगावर परिधान करायला धड वस्त्र नाही. त्यांना आपल्या आयुष्याचा ध्येय काय हेच त्यांना माहित नसते  जिवंत आहे तोपर्यंत जगायचं. कोणाचं उष्ट नाष्ट मिळते त्यावर जगायचे येवढेच त्याचे जीवन होते. असे हाल अपेश्टेचे जीवन त्या जगत होती.

## ३.१० 'मिटलेली कवाडे' या आत्मकथनांतील स्त्री जाणिवा

'मिटलेली कवाडे' हे मुक्ता सर्वगोड याच आत्मकथन आहे. या आत्मकथनांच्या  माध्यमातून त्यांनी दलित जीवनाचे दर्शन घडविलेले आहे. समाजात जगत असताना तिला आलेले अनुभव, दुःख, वेदना यांचे चित्रण त्यांनी या आत्मकथनांच्या  माध्यमातून केले आहे. नोकरीच्या निमित्ताने वेगवेगळया ठिकाणी जावे लागे त्या वेळी केवळ दलित समाजातील असल्याकारणाने आलेले अनुभव यांचे दर्शन या आत्मकथनांतून  घडते. 'मिटलेली कवाडे' हे एका साच्या प्रांजळ समाजसेविकेची जीवन कहाणी आहे.

### ४.१०.१ कौटुंबिक जीवन

आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी त्या अनेक यातना सहन करताना दिसून येतात. तिला हातावर हात ठेवून बसता येत नाही. तिचे हात सतत कामात गुंतलेले असतात.कुटुंबाचे पोट भरण्यासाठी ती रानात जावून गवत, लाकडे गोळा करून गावात विकत असे. त्या कष्टातून मिळालेल्या पैशातून त्या घराठी लागणाऱ्या वस्तू विकत घेत असे. त्याचे नवरे हे घरात बसून राहत असे आणि या स्त्रिया कष्ट करून त्यांना पोसत असे. आपण आयात बसून खातो याचे त्यांना काहीच वाटत नाही त्याच्या मते हे तिचे कर्तव्य आहे. अशा मानसिकतेच्या लोकांमध्ये या स्त्रिया चिरडून जातात. त्याच्या  शरीराला एक क्षण सुद्धा विश्रांती मिळत नसे. सूर्योदय होण्या अगोदर त्या कामाला लागतात ते सूर्यास्त होई पर्यंत काम करत असतात.

घरी येवून सुद्धा त्यांना एक वाटी पाणी आयत मिळत नसे. त्या स्त्रिया सकाळी रस्त्यांची झाडलोट कराऱ्याला जायच्या, नंतर त्या पाटलाच्या घरी त्याचा गोठा, शेण कड्याला जात असे. त्याच्या बाहेरील परिसर झाडलोट करायला जात असे. ते काम वरून त्या रानात जात असे तिथून मिळालेल्या वस्तूची विकरी करून त्यांना घरी यायला सूर्यास्त होत असे. सकाळी उठून त्या जस घर साणून गेलेल्या असतात त्याच परिस्थितीत ते घर असते. ना अंगणात झाडलोट, ना घरात झाडलोट, सारी घाण अंगणातच, घरात झाडलोट नाही, मुलांना अंघोळ नाही. त्याचे पती हे फक्त आराम करतात, इकडे तिकडे हिंडत फिरत असतात. बायकोच्या पगारावर ते जगत असतात. आपल्या जीवाचा अकांत करून ती काम करते आणि यांना आयत जेवण मिळत म्हणून त्यांना सवय झाली आहे. बायकोच्या जीवावर जगायला त्यांना लाज वाटत नाही. घरी पोहोचते वेळी तिची अशी दशा होते के घरातला पसारा काढायला तिला जमत नाही. रस्ते साफ करणारी आपल्या घराला, अंगणाला पारखी दिसायची. तिच्यात ते आवरायला ताकत नसे. असे हला अपेश्टचे जीवन जगून, कष्ट करून त्या आपल्या कुटुंबाचे पोट भरत असे. एक दिवस तिला बर नाही म्हणून घरी थांबली तरी संपूर्ण घर उपाशी राहत असे. पुरुष मंडळीना उपास चालेल पण काम करणे त्यांना चालत नसे. दिवस भर त्या स्त्रिया एका तांब्यावर राहत असे. असे दारिद्र्य, हाल अपेष्टा करून त्या आपल्या कुटुंबाचे पोट भरत असे.

## ४.१०.२ समाज आणि दलित स्त्री

अस्पृश्यतेने कोणालाच सोडले नाही. समाजाने सतत त्यांना यांची जाणीव करून दिली. लेखिका मागासलेल्या वर्गातील असल्याकारणाने शाळेत तिला एका बाजूला बसवत असे. त्या बिचाऱ्या ५ वर्षांच्या मुलीला अस्पृश्यता काय कळणार बाई सांगत असते 'हातभर अंतर ठेवून बस'[9]( पृ.१३) ती बसायची तिला काय माहीत कशाला बसायला सांगतात. लहान वयापासूनच समाजाने तिला अस्पृश्यतेची जाणीव करून दिली. बाई इतरांप्रमाणे आपली पाटी लांबून तपासत असे. तिला टेबलाच्या कडेला धरून उभ राहू देत नसे, पाटीवर एक मुलगी वरून पाणी घालत असे इत्यादी अशा अनेक प्रसंगांतून तिला या अस्पृश्यतेची जाणीव करून दिली जात असे. स्वतः बाई असून तिच्याशी अस वागत असे. ज्या व्यक्तीच्या हातून पिढी घडते तीच व्यक्ती ही अस्पृश्यता पाळताना दिसून येते. समाजाच्या या अशा वागण्यामुळे आपण काही तरी पाप केले आहे ही भावना लेखिकेच्या मनात रुजू होत असे. याचा तिच्या मनावर परीणाम होत असे.

समाज आपल्या फायद्यासाठी गरिबाच्या पोटा आट येत असे. त्या सकाळी पोरांना उपाशी टाकून पाटलाच्या घरी कामाला जात असे. तिथले काम उरकून तिथे मिळालेले शिळे अन्न गोळा करून घरी मुलांना ते घेवून येत असे. त्या नंतर त्या तशात रानात जावून मिळेल ते गोळा करून विकायला घेवून येत असे. सकाळपासून त्या एक पाण्याच्या थेंबावर असे. निदान तिच्या कष्टाला योग्य दाम मिळो अशी तिची अपेक्षा असते. पण ती अपेक्षा भगं होताना दिसून येते. कोणाकडे पैसा असतो त्याला एक दोन पैशात फरक पडत नाही पण ज्याला खरी गरज असते त्याच्या पोटला चिमटा काडण्यात येतो. तिला खरी गरज असते हे गिऱ्हाईक गेले तर परत दुसरे मिळेल की नाही माहीत नसते म्हणून त्या मिळेल त्या भावात विकतात. तिच्या या जगण्याचा समाज फायदा घेताना दिसून येतो. समाज त्याच्या या अशा जगण्याचा फायदा घेतो. त्याच्याकडून सर्व कामे करून घेत आणि या बदलात त्यांना मोबदला म्हणून किडून पडलेली ज्वारी देत असे. त्याच्या गरिबीचा समाज वाटेल तसा फायदा घेत असे. एखाद्याला काम करून जर त्याच्या हक्काची चांगली मजुरी मिळत नसे तर माणूस हा कितीही श्रीमंत असला तरी तो मनाने दृष्ट, पापी, लोभस आहे. एखाद्याला त्याच्या कष्टाचे येणेकरी न देणे या सारखं दुःख काही नाही. श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातात आणि गरीब हे अजून गरीब होत जातात याचे कारण हेच आहे. गरिबाच्या कष्टाने ते श्रीमंत होत जातात.

लेखिका मागासलेल्या वर्गातील असल्याकारणाने जर ती जेवणाच्या पंगतीला बसली तर ती पंगत भ्रष्ट होणार अशा मानसिकतेची लोक या समाजात आहे. लेखिकेला जेवणाच्या पांगतीवरून उठविले जाते असा हा समाजाचा आहे. लेखिका या समाजाचा भाग असल्याकारणाने त्यांना राहायला कुठे जागा मिळत नाही. त्याच्या तोंडावर त्यांना सांगितले जातं आम्ही अस्पृश्यांना ठेवत नाही.असा हा समाज आहे जो एखादया गरजुला पावत नाही. या समाजातील स्त्रिया मिळून एक नवा पानाच्या द्रोणाचा उद्योग सुरू करतात. पण त्या केवळ या समाजातील असल्या कारणाने त्याचा माल खपवणारा माणूस आपल्या अंगावर पाप नको म्हणून द्रोण नेत नाही.समाजात या लोकांना काम करायला पण वाव नाही. आपल्या हिमतीवर त्या स्त्रिया काहीतरी करु पाहत होत्या त्याच्या या कामाला अस्पृश्यतेचा ठसा लागला. समाजाला या लोकांचे चांगले झालेले पाहवत नाही. या अशा मानसिकतेत एखाद्या स्त्रीला जीवन जगणे खूप खडतर आहे. समाज तिला जगू देत नाही तिच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. अशा या समाजात स्त्रिया आपले जीवनाचा गाडा जगत असतात.

### ४.१०.३ भाव भावना

माणूस हा कोणत्याही जातीत जन्माला आला असला तरी तो माणूस म्हणूनच जन्माला येतो. जात बनवणारा समाजच आणि हाच समाज त्यांना या जातीवरून छळताना दिसून येतो. लेखिका ५ वर्षांच्या असताना जातीवरून शाळेत तिच्या भावनांशी खेळले जाते. जे वय खेळण्याबागळण्याचे असते त्या वयात तिला या अस्पृश्यतेच्या छळातून जावे लागते. लहान वयापासून लेखिकेला दुःखाचा सामना करावा लागला. तिच्याशी कठोर वागताना समाजाचे काळीज दुःखले नाही.तिच्या या लहान मनाशी खेळताना त्यांना काहीच वाटले नाही. समाज हा स्त्रियांना दुय्यम लेखित असतो. तिचे कष्ट त्यांना दिसत नाही. त्यांना तिचे दारिद्र्य भरे जीवन दिसत नाही का मुद्दाम दिसत नसण्याचा भाव आणतात. तिच्या कष्टांना त्या काहीच मोल देत नाही. तिच्या या लाचारीच्या जीवनाचा लाभ घेतना त्या दिसतात.

एखाद्या गरजू माणसाच्या भावनांशी त्या खेळतात. समाज तिची अवहेलना करतोच पण घरात स्वतःचा पती छळताना दिसून येतो. ती दिवस रात्र काम करते आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी आणि हा तिच्या जिवावर आयता खात घरात बसतो. काहीच काम न करता घरात नुस्त बसून राहून बायकोच्या पगारावर जीवन जगत असतो. तिच्या मनाची कोणाला चिंता नसे. ती बाहेर काम करून घरी येवून तिला घोटभर पाणी कोण देणार म्हणून अशा नसते. जे नवऱ्याने करायला पाहिजे ते काम ती करते आणि तो घरात हातात काकण घालून बसला आहे. तिचे मन, तिची भावना समजून घेणारा कोणी नसतो. तिच्या नशिबी असते ते फक्त हे दारिद्र्य भरे जीवन. समाजाला तिचे चांगले झालेले पहावत नाही. तिच्या कामात अडथळे निर्माण करताना दिसून येतात. त्या आपल्या जिद्दीने काही करायला पाहतात तर समाजाला तिला त्रास देण्याशिव्या करमत नाही.त्या आपला छोटासा उद्योग करायला पाहतात त्याच्या या उद्योगाला समाज बंद करतो. त्याचा थोडा काळ आनंद समाजाला पहावले नाही लगेच त्याचा उद्योग बंद करून टाकला.समाज सतत त्याच्या भावनेशी खेळताना दिसून येतो. आपण काही करत नाही आणि दुसऱ्यांना काही करू देत नाही अशा मानसिकतेची लोक समाजात आहे.

### ४.१०.४ दलित स्त्रियांचे जगणे

जन्माला येताना एक जातीचा छाप घेवून त्या या पृथ्वीवर येतात. मागासलेल्या वर्गातील स्त्री म्हणून समाज तिच्या दारिद्र्य जीवनाचा फायदा घेताना दिसून येतो. ती आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी रानात जे मिळेल ते गोळा करून

विकायला बसते. तिला पैशाची गरज असते आणि गिऱ्हाईकाला वस्तूची.पण तिची गरज जास्त मौलाची असते आणि याच गोष्टीचा समाज फायदा घेतना दिसून येतो. या स्त्रिया घरच्या पुरुष आहे. पुरुषाने जे करायला पाहिजे त्या स्त्रिया करता. स्त्रिया आपण स्वतः काम करून आपल्या कुटुंबाच पोट भरतात आणि घरातील पुरुष हातात काकण घातल्याप्रमाणे घरी बसून राहतात. त्यांना बायकोच्या जीवनावर जगण्याची लाज वाटत नाही. त्या सकाळी जस घर सोडून गेल्या होत्या तसच ते घर असत. ना अंगणात झाडलोट, घाण सारी अंगणातच, घरात झाडलोट नाही, ना मुलांना अंघोळ नाही. त्याचे पती हे फक्त आराम करत, इकडे तिकडे हिंडत फिरत असे. गावाची घाण लोट करणाऱ्या स्त्रीचे घर मात्र तसेच असत. घरी पोहोचते वेळी तिची अशी दशा होते के घरातला पसारा काढायला तिच्यात शक्ती राहत नाही. रस्ते साफ करणारी आपल्या घराला, अंगणाला पारखी दिसायची. अनेक वेळा तर तिच्या घरात चूल पेटवायला लाकड नसे. अख्या गावाला जाळन विकणारी पण तिच्या घरात लाकडे नाही असे दारिद्र्य भरे जीवन ती जगत असे. त्यांनी कधी त्याच्या जीवनात सुख पाहिले नाही. त्याचे जीवन दुःखाच्या डोंगराने भरलेलं असे. या दुःखा पुढ त्यांना काही दिसत नाही. त्यांचे जीवन हे असच दरिद्रयच जीवन. त्याच्या दुःखाना कोणी लागत नाही पोट भरण्यासाठी लाकड दररोज कुठे मिळणार म्हणून जळण्यासाठी कुपाटीच्या काड्या उपासल्या म्हणून या बायकांना मारून मारून गावातून मिरवत नेल असा हा समाज होता. एखाद्याने जर गाय तिच्या अंगावर आली म्हणून एक काठी मारली तर त्या मालकाने तिच्यावर काठी मारली म्हणून तिचा बलात्कार केला. ती या समाजात सुरक्षित नव्हती तिला सतत मनात असुरक्षितता भासत असे. या स्त्रिया आपल्या मालकीच्या असल्या प्रमाणे समाज तिला वाटेल तस वागत होता. त्याच्या पाठी पुढे कोणी नाही म्हणून समाज त्याचा फायदा घेताना दिसून येतो. असे दारिद्र्याची जीवन ती जगत होती.

## ४.११ समारोप

प्रकरण ३ 'दलित स्त्री आत्मकथनांतून  दिसून येणाऱ्या दलित आणि स्त्री जाणिवा' या वर अभ्यास करत असताना सर्वात प्रथम दलित जाणिवा म्हणजे काय याविषयी जाणून घेतले. पुढे वेगवेगळया आत्मकथनातील दलित जाणिवा समजून घेतल्या. या समाजातील लोकांना सवर्ण समाज आपल्या मालकीचे असल्याप्रमाणे त्यांच्यावर शोषण, गुलामगिरी करतो. समाजाने त्यांना मंदिरातही प्रवेश दिला जात नाही. एवढेच नव्हे तर समाजाने त्यांना गावाच्या बाहेर एका कडेला राहायला सांगितले. त्यांना आपल्या कार्यात सहभागी करून घेतले नाही. त्याचा स्पर्शच नव्हे तर त्याची सावलीही अपवित्र मानली गेली. नंतर चारही आत्मकथनातील स्त्री जाणिवा समजून घेतल्या. दलित स्त्रियांचे दुःख, वेदना समजून घेतल्या.

## ४.१२ निष्कर्ष

१. या समाजातील लोकांना जनावराहूनही हिन दर्जाची वागणूक दिली जाते.त्यांना माणूस म्हणून पाहिले जात नाही तर त्यांनी या समाजात जन्माला येऊन तो मोठा गुन्हा केला अशीच त्यांची वृत्ती दिसते.
२. इतरांप्रमाणे माणूस म्हणूनच पृथ्वीवर जन्म घेतला, पण वर्णव्यवस्थेच्या नावाने हा समाज चिरडला गेला. समाजाने त्यांचे सामान्य हक्क त्यांच्याकडून हिरावून घेतले.
३. समाजात सर्वात जास्त छळ कोणाचा झाला असेल तर तो दलित स्त्रियांचा आहे कारण तिलासवर्णसमाजही छळतो आणि तिची स्वतः माणसे ही छळतात.
४. समाज तिच्या दारिद्र्य जीवनाचा फायदा घेतो. तिला कशाची गरज आहे याची जाणीव समाजाला नसते.

## संदर्भ ग्रंथ


१. गरुड, शामल. "दलित स्त्री आत्मकथनेयशश्री." प्रकशन, पुणे, २०१०


## आधार ग्रंथ


१. कांबळे, बेबी. "जिणं आमचं." मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९०

२. कांबळे, शांताबाई. "माझ्या जन्माची चित्तरकथा." सुगाव प्रकाशन, पुणे, १९९०

३. पावडे, कुमुद. "अंतः स्फोट." सुगाव प्रकाशन, पुणे, १९८१

४. सर्वगोड, मुक्ता. "मिटलेली कवाडे." सुगाव प्रकाशन, पुणे, १९८३


----------------------------------- xxxxxxxxxxxxxxxx ---------------------------------------

# प्रकरण ५

# निवडलेल्या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास

# प्रकरण ५ : निवडलेल्या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास


प्रास्ताविक........................................................................................................९५

५.१ तौलनिक साहित्याची संकल्पना ......................................................................९६

५.१.१ व्याख्या.........................................................................................................९७

५.२ स्वरूप..............................................................................................................९८

५.२.१ तुलनात्मक साहित्य अभ्यासाची तत्वे.............................................................९९

५.३ ‘जिणं आमुचं’, ‘माज्या जल्माची चित्तरकथा’, ‘अंतःस्फोट’, ‘मिटलेली कवाडे’ या आत्मकथनांची तुलना..............................................................................................१००

५.४ समारोप............................................................................................................१०७

५.५निष्कर्ष..............................................................................................................१०७

संदर्भ ग्रंथ ..........................................................................................................१०८

# प्रकरण ५ : निवडलेल्या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास

## प्रास्ताविक

मानवी जीवनात तुलनेला खूप महत्त्व आहे. तुलना ही आत्ताच नव्हे तर फार पूर्वीपासून केलेली आहे. एखादी व्यक्ती निर्णय घेते किंवा एखादी गोष्ट आपण चांगली म्हणतो तेव्हा आपण त्या गोष्टीची तुलनाच करत असतो.पण साहित्यकृतीची तुलना १९ व्या शतकात सुरू झाली. युरोप या देशातून या तौलनिक साहित्य अभ्यासाची सुरुवात झाली. एखाद्या सहित्यकृतीची जेव्हा आपण निवड करतो तेव्हा त्याचा विषय, भाषाशैली, मूल्यमापन, लेखक, त्या सहित्यकृतीवर इतरांनी केलेल्या प्रतिक्रिया या सगळ्यांचा विचार अभ्यासक करत असतो. तौलनिक साहित्याचा अभ्यास हा देश, भाषा आणि काळ यांच्या सीमा ओलांडणार आहे. तौलनिक साहित्यातून साम्य आणि भेद पडताळून पाहिले जाते.

बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं', शांताबाई कांबळे यांचे 'माज्या जल्माची चित्तरकथा', कुमुद पावडे यांचे 'अंतःस्फोट' आणि मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे' या आत्मकथनांची तुलना केलेली आहे. एकाच समाजातील असल्या तरी त्याच्या दुःखात भिन्नता जाणवून येते. त्यांच्यात दोन गोष्टी साम्य आहे ते म्हणजे त्या स्त्रिया आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्या दलित समाजातील आहे. या दोन गोष्टी सोडल्या तर त्यांचे जीवन, त्यांना आलेले अनुभव, वेदना, दुःख इत्यादी सारे भिन्न आहे. याच गोष्टीचा आधारे या आत्मकथनांची तुलना केलेली आहे.

## ५.१ तौलनिक साहित्याची संकल्पना

इंग्रजीतील ‘कम्पॅरिटीव्ह लिटरेचर’ या संज्ञेवरून मराठीत ‘तौलनिक साहित्य’ ही संज्ञा वापरली जाते. ‘तुलना’ या शब्दात मूळ धातू शब्द ‘तूळ’ असा आहे. ‘तूळ’ याचा अर्थ वजन करणे, मोजणे असा आहे. याच अर्थावरून तुलना असे नाव पडले. ‘तुलना’ या शब्दाचा अर्थ साम्य, सारखेपणा, वजन करणे असा आहे. इंग्रजीत ‘तुलना’ या शब्दाला प्रतिशब्द म्हणून ‘कम्पेअर’ शब्द वापरला जातो. कोणत्याही घटना, प्रसंग, व्यक्ती, कृती, वस्तू इत्यादी गोष्टीचे साम्य दाखवणे, मोजणे, संबंध दर्शवणे इत्यादी म्हणजे तुलना करणे.असा अर्थ गृहीत धरला जातो. माणूस हा आपल्या जीवन व्यवहारात नेहमीच तुलना करत असतो. कोणत्याही गोष्टीची तुलना करणे हा माणसाचा नैसर्गिक स्वभाव आहे. याच तुलने द्वारे माणूस जीवनातील विविध घटकांचा शोध घेत असतो. त्या शोधात माणूस त्या घटकांच्या गुण, मर्यादा, दोष निश्चित करत असतो. ज्ञान मिळवण्यासाठी तुलना आवश्यक असते. तुलना केल्याशिवाय माणूस एखादया निष्कर्षाकडे पोहोचू शकत नाही. तुलना केल्याशिवाय त्याला विचार करता येत नाही तो कोणत्याही निर्णयाकडे पोहोचू शकत नाही. त्यामुळे तुलनाकरणे खूप महत्त्वाचे आहे.

साहित्यक्षेत्रातही ‘तुलना’ या प्रकाराला खूप महत्त्व आहे. साहित्यकृतीबरोबर त्या लेखकाची तुलना केली जाते. साहित्यनिर्मितीमागे त्यांचे विचार, विषयाची निवड, आशयसूत्र, मांडणी, तंत्र, वाक्यरचना, शब्दप्रयोग, इत्यादीमध्ये तुलना केली जाते. साहित्याची तुलना करत असताना आकलन,आस्वाद, मूल्यमापन या गोष्टी आवश्यक असतात. तुलनेद्वारे एखाद्या साहित्यकृतीचे गुण वैशिष्ट्यांचा शोध घेता येतो. कोणत्याही सहित्यकृतीच्या खोल मुळापर्यंत जाण्याचा मार्ग तुलना देत असते. एखाद्या साहित्यकृतीची योग्य मूल्यमापन करण्यासाठी तुलना महत्त्वाची ठरते.

‘तौलनिक साहित्याची’ सुरुवात ही युरोप देशापासून झाली. १८४८ मध्ये मॅथ्यू आर्नोल्ड यांनी आपल्या बहिणीला लिहिलेल्या एका पत्रात सहज ‘तौलनिक साहित्य’ ही संज्ञा वापरली होती.[1] प्रबोधन युगात रोमन आणि ग्रीक, फार्सी आणि अरबी, जपानी आणि चिनी, इंग्लिश आणि भारतीय भाषा यांच्यामधे अनेक कारणांमुळे संपर्क वाढत गेला. त्यांना त्याचे साहित्य जाणून त्यांच्या साहित्याचा तौलनिक अभ्यास करणे गरजेचे होऊन बसले. १८ व्या शतकात जॉन ड्रायडन यांनी आपल्या ‘ऐसे ऑन ड्रॅमेटीक पोएसी’ या निबंधातू तौलनिक साहित्यक्षेत्राचा पाया घातला. या

निबंधात त्यांनी फ्रेंच आणि इंग्लिश रंगभूमीच्या अभिजात आणि सौंदर्यवादी नाटकाच्या गुण व गुणांची चर्चा करून तुलनात्मक साहित्याची सुरुवात केली. जॉन ड्रायडन यांना 'तौलनिक समिक्षेचे जनक' असे म्हटले जाते.[2]

'रवींद्रनाथ टागोर'09opयांनी तौलनिक साहित्याला 'विश्वसाहित्य' हा शब्द वापरला आहे. भारतामध्ये २० व्या शतकात बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आपल्या 'शकुंतला, मीरांडा आणि डेस्डिमोना' हे लेख लिहून तौलनिक साहित्याची सुरुवात केली.[3]

## ५.१.१ व्याख्या

### १. मित्शेल

"काही बाबींचे साम्य जोखणे व फरक करणे, त्यांना एकीकडे सारखे किंवा एकच समजणे आणि दुसरीकडे व्यवच्छेदक व निराळया पाहणे."[4]

मित्शेलच्या मते तौलनिक साहित्यात आपण ज्या दोन गोष्टी तुलनेसाठी घेतलेल्या असतात त्यात आपण साम्य आणि भेद शोधत असतो.

### २. एस. एस. प्रावर

"एकापेक्षा अधिक भाषांतील साहित्यकृतींची (साहित्यशास्त्र आणि समीक्षा यांवरील ग्रंथांसह) वैधर्म्य, साधर्म्य, मूलस्रोत किंवा प्रभाव यांचा शोध घेत केलेली समीक्षा म्हणजेच तौलनिक साहित्याभ्यास होय; तसेच दोन किंवा अधिक भिन्नभाषिक समाजांमधील वाङ्मयीन संबंध आणि आदानप्रदान यांचाही अभ्यास त्यात अंतर्भूत आहे."[5]

एस. एस. प्रावर याच्या मते एखाद्या साहित्यकृतीची, साहित्यशास्त्राची व समीक्षाग्रंथाची समीक्षा केली जाते. परस्परभेदा द्वारे त्या समीक्षेचा शोध घेतला जातो त्यालाच त्यांनी तौलनिक साहित्य असे म्हटले आहे. दोन भाषेमध्ये वाङ्मयीन संबंध पडताळून पाहत असतो.

### ३. पॉल वॅन टिघेम

“तौलनिक साहित्याचा अत्यावश्यक हेतू म्हणजे निरनिराळ्या साहित्यांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधांचा अभ्यास हाच होय.”[6]

पॉल वॅन टिघेम याच्या मते तौलनिक साहित्याचा हेतू हा वेगवेगळ्या साहित्यातून दिसून आलेले साम्य भेद पडताळून पाहणे.

### ४. हेन्री एच. एच. रेमाक

“तौलनिक साहित्य म्हणजे विशिष्ट देशाच्या बंदिस्त सीमेपलीकडचा अभ्यास होय. त्यात एकीकडे साहित्यामधील परस्परसंबंधांचा, तर दुसऱ्या बाजूला कला (म्हणजेच चित्र,शिल्प, वास्तुरचना, संगीत), तत्त्वज्ञान, इतिहास, सामाजिक शास्त्रे (म्हणजे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र), विज्ञान, धर्म वगैरे अशा ज्ञान व श्रद्धाक्षेत्रांचा अभ्यास असतो. थोडक्यात, ही एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्यांशी आणि वाङ्मयाची इतर मानवी आविष्कारक्षेत्रांशी केलेली तुलना असते.”[7]

तौलनिक साहित्याभ्यास हा स्वतःची भाषा, प्रांत वा देश यांच्या सीमा ओलांडून केला जात असतो. विविध मानवी समूहांना आपल्याच साहित्यिक व सांस्कृतिक कोशातून बाहेर पडण्यास लावणारा असतो आणि तौलनिक साहित्याभ्यास हा केवळ साहित्याशीच संबंधित नसतो तर विविध कला आणि अनेकविध ज्ञानशाखांशी संबंधित असतो, याचीही नोंद रेमाक यांनी केलेली दिसते.

## ५.२ स्वरूप

तौलनिक साहित्य म्हणजे दोन किंवा दोनाहून अधिक साहित्यामधील साम्य भेदाचा किंवा परस्पर संबंधाचा अभ्यास करणे. १९ व्या शतकात ही अभ्यासपद्धती उदयाला आली आणि २० व्या शतकात ती अधिक समृध्द झाली. तौलनिक साहित्याद्वारे वेगवेगळ्या देशातील साहित्यातील आदान प्रदान आणि त्यांचे परस्पर संबंध शोधले जाते. तौलनिक साहित्य हा अत्यंत महत्त्वाचा प्रकार आहे. यातून एखाद्या सहित्यकृतीची, लेखक, प्रवाह किंवा चळवळी

इत्यादींची तुलना दुसऱ्या देशातील साहित्यकृती, लेखक, प्रवाह किंवा चळवळी यांच्याशी केली जाते. तौलनिक साहित्याचा अभ्यास हा देश, भाषा आणि काळ यांच्या सीमा ओलांडणारा आहे.

तुलनात्मक साहित्य अभ्यास हे एक साधन आहे. काही तरी सिद्ध करायचे आहे म्हणून त्याचा उपयोग केला जात नाही. केवळ साम्य आणि भेद दाखवून देणे म्हणजे तुलना नाही. तर त्या भेदाची योग्य अशी करणे देवून शेवटी निष्कर्ष काढणे अपेक्षित असते. तुलना ही कधीही कोण श्रेष्ठ वा उच्च दर्जाचे आहे हे ठरवण्यासाठी केली जात नाही. इथे तुलना करणाऱ्या व्यक्तीची अवड निवड, पसंती नापसंती यांना वाव नसतो. तुलनात्मक अभ्यास हा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असतो. तुलनात्मक अभ्यास हा मनाची कवाडे विस्तरणारा असला पाहिजे.

## ५.२.१ तुलनात्मक साहित्य अभ्यासाची तत्वे

**१. साम्य**

तुलना करत असताना केवळ त्यातील साम्य शोधले म्हणून होत नाही. तर त्या सम्याना योग्य कारणे देवून एका निष्कर्षाकडे पोहोचणे महत्वाचे असते. साम्य हे तुलनात्मक साहित्याचे महत्त्वाचे तत्त्व होय.

**२. भेद**

प्रत्येक कलाकृतीत काही प्रमाणात सामानता असते आणि काही प्रमाणत ती विशिष्ट असते. त्याचबरोबर त्या साहित्यकृतीमध्ये जसे साम्य असतात तसे भेदही असतात. त्या भेदांची चिकित्सा करणे गरजेचे असते.

**३. प्रभाव**

तुलनेसाठी निवडलेल्या साहित्यकृतीचा प्रभाव एकामेकावर असणे गरजेचे आहे. एकाचा प्रभाव दुसऱ्यावर पडलेला आणि दुसऱ्याने तो कळत नकळत स्वीकारलेला असला पाहिजे. असे असेल तरच त्यामध्ये तुलना होऊ शकते. प्रभाव हा तुलनात्मक साहित्याचा महत्त्वाचा भाग आहे.

साम्य, भेद आणि प्रभाव या तत्त्वांना अनुसरून  तौलनिक साहित्याचा अभ्यास केला जातो.

## ५.३ ‘जिणं आमुचं’, ‘माज्या जल्माची चित्तरकथा’, ‘अंतःस्फोट’, ‘मिटलेली कवाडे’ या आत्मकथनांची तुलना

प्रत्येकीचे दुःख हे वेगवेगळे असते. जरी एकाच समाजातील असल्या तरी त्यांना आलेले अनुभव, वेदना, दुःख हे समान नसतात. अस्पृश्यता हे त्यांच्या दुःखाचे कारण असले तरी त्यांच्या दुःखात भिन्नता जाणवून येते. या अस्पृश्यतेमुळे त्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. समाजातील प्रत्येक माणसाकडून त्यांना या अस्पश्यतेचा अनुभव आला. त्यांच्यात दोन गोष्टीं समान आहे, एक म्हणजे  त्या दलित आहे आणि दुसर म्हणजे त्या स्त्रिया आहे. समाजाशी झूंज देत असताना एक तर स्त्री म्हणून आणि दुसरे म्हणजे दलित स्त्री म्हणून त्यांना सामना करावा लागतो.

इतर तीनही आत्मकथनांहून ‘जिणं आमुचं’ हे आत्मकथन खूप वेगळया स्वरूपाचं आहे. या आत्मकथनांत बेबी कांबळे यांनी स्वतः विषयी फार कमी आणि आपल्या समाजाविषयी जास्त सांगितलेले आहे. या वरून असे ही दिसून येते की हे आत्मकथन त्यांचे नाही तर, हे आत्मकथन त्यांच्या समाजाचे आहे. धर्मांतरापूर्वीच्या ‘म्हार’ समुहाची जीवन कहाणी आहे. इतर कोणत्याही दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतून त्याच्या समजाचे,त्यांच्या रूढी, परंपरा, प्रथा, त्यांचे जगणे इत्यादी जगण्याचे चित्रण बारकाईने निरीक्षण पूर्व आलेले नाही. हे या आत्मकथनांच वैशिष्ट्य आहे जे इतर आत्मकथनांमधून दिसून येणार नाही.  इतर आत्मकथनांमधून ही दलित समाजाचे चित्रण आलेले दिसून येते.पण तिथे त्यांनी स्वतः ला जास्त महत्तव दिलेला दिसून येतो. त्यात त्या समाजाविषयी फार कमी भाष्य करताना दिसून येतात. त्यांना आपली जीवन कहाणी लोकांना समाजाला सांगायची असते म्हणून त्यांच्या आत्मकथनांत समाजदर्शन कमी आणि स्वतःचे दर्शन अधिक प्रमाणत असतात.

या समाजाचा भाग असल्या कारणाने त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. पण प्रत्यकीचे दुःख वेगळे असते. ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मकथनात शांताबाई कांबळे यांनी लहान असल्यापासून पोटाच्या भुकेसाठी तळमळतना पाहिले आहे. भूक काय असते याची त्यांना पुरेपुर जाणीव आहे. लोकांच्या उष्ट्या, शिळया अन्नावर त्यांनी आपले पोट भरले आहे. खायला अन्न नाही घालायला वस्त्र नाही असे जीवन त्या जागल्या. ‘जिणं आमुचं’, ‘अंतःस्फोट’, ‘मिटलेली कवाडे’ या आत्मकथनातील लेखिकेचे जीवन शांताबाई कांबळे यांच्या जीवनाहून वेगळे आहे. त्यांना रोजच्या अन्नासाठी यातना सहन कराव्या लागल्या नाही. इतरांकडून मागून लोकांच्या शिळया, उष्ट्या

अन्नावर जगावे लागल नाही. त्यांची परिस्थिती ही लहानपणाच्या शांताबाईंच्या परिस्थितीहून खूप चांगली होती. त्यांना घालायला चांगले अंगभर वस्त्र होते. त्यांना जीवनात पोटाच्या भुकेची तळमळ काय असते याची जाणीव त्यांना कधी झाली नाही. त्यांना चांगले दोन वेळेचे अन्न मिळत होते.राहायला चांगले घर होते पण या उलट शांताबाईच लहानपणाच जीवन होत. एकाच समाजाचा घटक असल्या तरी त्याच्या दुःखात भिन्नता जाणून येते.

'जिणं आमुचं' हे आत्मकथन सोडले तर राहिलेल्या तीनही आत्मकथनांतून काही तरी करण्याची जिद्द दिसून येते.'जिणं आमुचं' या आत्मकथनांत लेखिका आपल्या समाजाविषयी भाष्य करतात त्यामुळे त्याच्या व्यक्तिगत जीवनाविषयी तसे फारसे काही कळून येत नाही. 'अंतःस्फोट', 'मिटलेली कवाडे', 'माझ्या जन्माची चित्तरकथा' ही आत्मकथने त्यांच्या जीवनावर भाष्य करताना दिसून येते. समाजाला तोंड देवून जिद्दीने आपल्या पायावर त्या उभ्या राहताना दिसून येतात. समाजाला लढा देवून काही तरी करण्याच्या जिद्दीने त्या पुढे जाताना दिसू  येतात. ही जिद्द त्यांना त्याच्या आयुष्यात थोर बनवून जातात. त्या शिकून आपल्या क्षेत्रात मोठ्या होताना दिसून येतात. आपल्या कार्याने समाजाचे तोंड बंद करताना दिसून येतात.

'अंतःस्फोट' या आत्मकथनांतून एक वेगळेच रूप दृष्टीत पडते ते म्हणजे आपल्याच माणसाशी लढावे लागते. एकाच समाजाचा भाग असून त्यांना जातियतचे चटके काय असतात याची पुरेपूर माहिती असते . तेच लोक त्याच्याहून खालच्या जातीच्या लोकांचा छळ करताना दिसून येतात.दलित समाजातील मुलगी त्याच्याहून खालच्या धोबी जातीतल्या मुलाशी लग्न करते म्हणून भर लग्नाच्या मंडपात त्याच्यावर दगड फेक केली जाते. त्यांच्या लग्नात अडथळे निर्माण करतात. ज्या लोकांनां 'जात' या शब्दाचा अर्थ आणि त्या मागील वेदना पुरेपूर माहीत आहे त्याच लोकांची मानसिकता ही अशी दिसून येते. त्यांना या जातीचे दुःख पूर्निष्ठ माहीत आहे तीच लोक असा छळ करताना दिसून  येतात. आंतरजातीय विवाह केला म्हणून पोटाच्या मुलाशी नात संपवून टाकणारा हा समाज आहे. आपल्या मुलाचा आनंद न दिसणारे भावनाशून्य माणूस आहेत. हे असे दुःख इतर आत्मकथनांमधून दिसून येत नाही.

शांताबाईला समजाशी लढता लढता आपल्या स्वतः च्या नवऱ्याशी लढावे लागते हे तिचे दुर्दैव आहे. स्त्रीला पुरुष सत्ता कशी दुय्यम लेखते आणि आपल्या फायद्यासाठी स्त्रीचा कास छळ केला जातो याचे दर्शन या आत्मकथनातून घडविले आहे. घरात पहिली पत्नी असताना दुसरी पत्नी आणणे केवळ आपल्या स्वार्थासाठी. तिच्यावरील मन

भरले की परत पहिलीकडे यावे. पुरुष स्त्रीला आपल्या हातातले खळणे असल्याप्रमाणे तिच्या मनाशी खेळताना दिसतो. पतीकडून असह्य वेदना मिळाल्या असल्या तरी शेवटी शांताबाई आपल्या नवऱ्याकडे जाताना दिसून येतात. हे आत्मकथनात कुठे तरी खटकत. जो व्यक्ती आपल्या फायद्यासाठी तिच्या भावनांशी खेळतो या गोष्टीचे भान न ठेवता शांताबाई त्याच्या जवळ जाताना दिसून येते.या घटनेमुळे असे दिसून येत की समाजात जगण्यासाठी स्त्रीला पुरुषाचा आधार हवा. या एका गोष्टीमुळे हे आत्मकथन इतर आत्मकथनांच्या तुलनेत मनाला न भिडणार असे आहे. स्वतः एक शिक्षिका असून ज्यांनी दुःख दिले त्यात व्यक्तीशी एक रूप होऊन पुन्हा आपल्या संसार लागणे हे कुठे तरी चुकीचे वाटते. समाजात लढणारी बाई घरी मात्र आपल कुटुंब टिकांव म्हणून नवऱ्याच्या चुकांवर पडदा घालताना दिसून येते. इतर आत्मकथने ही आपल्या होणाऱ्या अन्यायावर आवाज उठवताना दिसून येतात. आपल्या विचारांवर ठामपणे उभे राहताना दिसून येतात. पण ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मकथनांत नवऱ्याबरोबर पुन्हा संसार सुरू करावा म्हणून आपल्या विचारांवर एक रूप न होताना दिसून येतात. या एका निर्णयाने हे आत्मकथन इतरांच्या तुलनेत कमी प्रभावी ठरल आहे.

चारही आत्मकथनांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचारप्रणाली आणि तत्वज्ञान मांडलेले आहे. आत्मकथने त्याच्या विचारप्रणालीचे पालन करताना दिसून येतात. पण बेबी कांबळे यांच्या ‘जिणं अमुचं’ या आत्मकथनांतून इतरांच्या तुलनेत अधिक प्रमाणत दिसून येते. आंबेडकरांचे वर्णन, त्यांची भाषणे, विचार इत्यादी सर्व सविस्तर माहिती दिलेली आहे जी इतरांच्या आत्मकथनात दिसून येत नाही.समाजात कसे भीमवार सुटले आहे याचे वर्णन केले आहे. समाज पहिल्यांदा त्याच्या तत्वांना कशा प्रकारे विरोध करतो आणि नंतर त्यांना आपला देव मानतो या सर्व गोष्टीचे दर्शन हे आत्मकथन घडवते. इतरांच्या तुलनेत या आत्मकथनांतून अधिक प्रमाणत भीम वार दिसून येते.

‘अस्पृश्यता’ हे त्याच्या दुःखाचे कारण होते.पण प्रत्येकीला याचे वेगवेगळे अनुभव आले आहे. समाज त्यांना ही ‘अस्पृश्यता’ विसरू देत नाही. पण ज्याप्रमाणे ‘जिणं अमुचं’ आणि ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मकथनांतून अस्पृश्यतेचे दर्शन घडते तशा प्रकारचे दर्शन ‘मिटलेली कवाडे’ आणि ‘अंतःस्फोट’ या आत्मकथनांतून दिसून येत नाही. कुमुद पावडे आणि मुक्ता सर्वगोड यांची सामाजिक स्तिथी बेबी कांबळे आणि शांताबाई कांबळे याचाहून खूप चांगली होती. ‘अस्पृश्यता’ काय असते? याचा त्यांना बेबी कांबळे आणि शांताबाई कांबळे यांना अनुभव आले तसे अनुभव त्यांना कधी आले नाही. ‘जिणं अमुचं’ या आत्मकथनांतून रेडे जत्रा या सणावरून अस्पृश्यतेला समाज कशा

पद्धतीने पळतो याचे हुबेहू दर्शन घडत. त्याचबरोबर 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतून पंढरपूरला पायी चालत जाऊन समाज त्यांना मंदिरात इतरांप्रमाणे प्रवेश दिला जात नाही. समाज अस्पृश्यता कशा पद्धतीने पळतो याचे दर्शन या आत्मकथनांतून होते. या समाजात जन्माला आल्या कारणाने मुक्ता सर्वगोड आणि कुमुद पावडे यांनाही अस्पृश्यतेचे अनुभव आले. पण ज्या पद्धतीने शांताबाई कांबळे आणि बेबी कांबळे यांना अनुभव आले तसे आले नाही.

शिक्षण घेत असताना साऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागला. त्यांना सहजा सहजी शिक्षण मिळाले नाही. त्या शिक्षणासाठी त्यांना अनेक दुःखाना, वेदनेला सामोरे जावे लागले. पण 'अंतःस्फोट' या आत्मकथनांत शिक्षण घेत असताना कुमुद पावडे यांना आलेला अनुभव इतरांहून वेगळा आहे. एका दलित मुलीने संस्कृत भाषेत शिकण घेतले म्हणून समाज तिला त्रास देताना दिसून येतो. शाळेत तिने संस्कृत शिकू नये म्हणून शिक्षकाने अनेक प्रकारचे प्रयत्न केले. तिच्या शिक्षणात अनेक प्रकारचे अडथळे निर्माण केले. या साऱ्यां अडचणीला सामोरे जावून तिने संस्कृत भाषेत एम. ए. केली. संस्कृत ही देवाची भाषा समजणारा समाज तिला नोकरी देण्यास विरोध करू लागला. चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊनही तिला नोकरी मिळण्यासाठी २ वर्ष थांबावे लागले. प्रत्येक ठिकाणी दलित मुलीने संस्कृत शिकवावा हे न पटल्यामुळे तिची निवड होत नव्हती. तिला नोकरी मिळते पण ती कुमुद पावडे या नाव ऐवजी कुमुद सोमकुवरच्या नवाने मिळते. तिला पावडे या आडनावाच्या ऐवजी पाटलांच्या आडनावातून नोकरी मिळते.एखाद्याच्या आयुष्यात 'जात' कशी आडवी येते याचे दर्शन कुमुद पावडे शिक्षण घेताना दिसून येते.

आत्मकथन लहिण्यामागे त्यांची काही तरी भूमिका असल्याचे दिसून येते.बेबी कांबळे याच्या आत्मकथनांतून तत्कालीन म्हार समाजाचे चित्रण दिसून येते. त्यांचे संपूर्ण आत्मकथन हे समष्टी दर्शनाच्या धोरणेवर जाताना दिसून येते. हे आत्मकथन 'मी' ला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेले नाही. 'समाज' आणि 'लोक' हेच या आत्मकथनाचे केंद्रस्थान आहे. तत्कालीन समाज कसा होतो हे आजच्या पिढीला कळावे याच हेतूने त्यांनी हे आत्मकथन लिहिले. 'माज्या जल्माची चित्तरकथा' हे आत्मकथन केवळ शांताबाईच्या प्रवासाविषयी भाष्य करते. या आत्मकथनात 'मी' हा केंद्रस्थानी आहे. या 'मी' भोवतीत हे आत्मकथन फिरत असते. या आत्मकथनांतून 'मी' चे प्रश्न आलेले आहे. हे आत्मकथन समाजदर्शन न घडवता व्यक्तीदर्शन घडवत असते. 'मिटलेली कवाडे' या आत्मकथनातून एका समाज कार्यकर्त्यांचे जीवन दिसून येते. समाजाच्या हक्कासाठी सतत लढताना दिसून येतात. मुक्ता सर्वगोड या आपल्या

जीवनाविषयी जास्त भाष्य करताना दिसून येत नाही. त्याच्या आत्मकथनातून केवळ त्यांच्या कार्याचे दर्शन घडत असते. समाजासाठी काहीतरी करण्यासाठी सतत त्या लढताना दिसून येतात. त्यांना आपल्या व्यक्तित्क जीवनाविषयी न बोलता आपल्या कार्याविषयी भाष्य करायचे आहे. याच कार्याचे दर्शन त्याच्या संपूर्ण आत्मकथनात दिसून येतात. त्यांना आपली कार्याची किर्ती समाजाला दाखवून देण्याच्या हेतूने त्यांनी हे आत्मकथन लिहिले आहे. त्यांनी आपल्या आत्मकथनात कार्य केंद्रस्थानी ठेवले आहे. ‘अंतःस्फोट’ या आत्मकथनांतून कुमुद पावडे स्वतः च्या अनुभवाविषयी भाष्य करताना दिसून येते.तिचे आणि समाजाचे नाते ती स्पष्ट करताना दिसून येते. इथे ‘मी’ बरोबर इतरांचे प्रश्न दिसून येते. त्या प्रश्नाच्या अतंथकरणात जावून सोडण्याचा प्रयत्न करताना त्या दिसून येतात. इथे ‘मी’ जरी केंद्रस्थानी असला तरी त्या ‘मी’ बरोबर इतरही येताना दिसून येतात. इथे त्या स्वतः विषयी भाष्य करत असताना समाजाविषयी भाष्य करताना दिसून येते. त्यांचे प्रश्न, त्यांची समस्या सोडण्याचा प्रयत्न त्या करताना दिसून येतात.

बेबी कांबळे यांनी आपल्या ‘जिणं अमुचं’ या आत्मकथनात कुठेत त्या आपल्या पेश्याविषयी भाष्य करताना दिसून येत नाही. पण इतरांच्या आत्मकथनातून त्याच्या पेश्याची जाणीव होते. त्या स्वतः आपल्या पेशाविषयी भाष्य करताना दिसून येतात. कुमुद पावडे आपल्या आत्मकथनांतून आपण महाविद्यालयात संस्कृत भाषेची प्राध्यापिका आहे यांची ओळख करून देते. ‘मिटलेली कवाडे’ या आत्मकथनांतून वाचकाला आपण एक समाज सेविका आहे यांची ओळख स्वतः मुक्ता सर्वगोड करून देतात. समाज कार्यासाठी सतत लढत असल्याची भूमिका निभावताना त्या दिसून येतात. समजाच्या हितासाठी तिचे कार्य चालुच असते. ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मकथनांतून लेखिका आपण शिक्षिका असल्याचे भाष्य करते. निवृत्त होता होता त्या शिक्षण विस्तार अधिकारी होताना दिसून येतात. आपल्या पेश्याविशयी त्या आत्मकथनात भाष्य करताना दिसून येतात.

‘मिटलेली कवाडे’ आणि ‘अंतःस्फोट’ या आत्मकथनांची भाषा ही साधी प्रमाण भाषा आहे. त्यामुळे वाचकाला सहज लक्षात येते. मिटलेली कवाडे या आत्मकथनात बोली भाषेचा वापर क्वचित झालेला आढळून येतो. पण ‘अंतःस्फोट’ या आत्मकथनांतून कुठेच बोली भाषेचा वापर झालेला दिसून येत नाही. बोली भाषे ऐवजी संस्कृत भाषा काही प्रमाणात आलेली आहे. याच कारण म्हणजे त्या स्वतः संस्कृत भाषेची प्राध्यापिका असल्या कारणाने तिच्या व्यवहारात संस्कृत भाषा असल्यामुळे आत्मकथनात ही भाषा येते. अजून एक कारण म्हणजे त्या शिकलेल्या

असल्या कारणाने आणि विशेषता शहरात राहत असल्या कारणाने त्याचे आत्मकथन हे प्रमाण भाषेतून लिहिलेले दिसून येते. 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांत बोली भाषेचा वापर झालेला दिसून येतो. संपूर्ण आत्मकथनात संवाद बोलीभाषेतून आलेले आहे आणि निवेदन प्रमाण भाषेत झालेले आहे. त्याची लेखणीची पद्धत खूप वेगळी आहे. त्या एका विशेष ओळी नंतर थोडी जागा ठेवताना दिसून येतात. त्या ओळीच्या खाली विवेचन केले जाते. त्या खाली जागेतून वाचकाला खूप काही सांगून जातात. तिच्या लेखणीच हे वैशिष्ट आहे. अजून एक वैशिष्ट म्हणजे त्या कोणत्याही घटनेची माहिती सोप्या, सहज व सरळ शब्दात सांगतात. त्याच्या आयुष्यात खूप मोठ वादळ येत,त्याच्या नवऱ्यानी दुसरे लग्न केले हे ती केवढ्या सहज सांगते. कोणताही घटना, प्रसंग त्या अगदी सहज सांगतात जेणे करून ते वाचकाच्या मनात शिरते. 'जिणं अमुचं' या आत्मकथनाची भाषा ही बोली आणि प्रमाण भाषेचे मिश्रण आहे. या आत्मकथनांतून अधिक प्रमाणत बोली भाषेचा वापर केलेला दिसून येतो. लेखिकेचा पिंड हा लेखनाचा नसल्या कारणाने वाचत असताना सहज त्यांची जाण होते. बेबी कांबळे यांचा पिंड हा समाजशास्त्रज्ञानाचा आहे. त्यामुळे लहानपणापासून त्यांनी समाजावर बारीक निरीक्षण केले आणि ते निरीक्षण त्यांनी आत्मकथनाच्या रुपात समाजासमोर मांडले. त्यांच्या जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्थान खूप मोठे आहे. त्यामुळे त्यांच्या आत्मकथनात भाषेची सहजता दिसून येत नाही. त्या सहजतेचे रुप आंबेडकरांच्या प्रबोधनाचा दिसून येतो.

चारही आत्मकथनांतून एक गोष्ट ठळकपणे दिसून येते ती म्हणजे त्यांनी आपल्या वेदनेबरोबर समाजातील इतर स्त्रियांच्या वेदनेविषयी त्या भाष्य करतात. आपल्या दुःखा बरोबर त्याच्या दुःखा, समस्या विषयी भाष्य केले आहे. गावातील स्त्रिया त्याचे जगणे या सर्व गोष्टीचा समावेश या आत्मकथनांतून झालेला आहे. त्याच्या अनुभवात आलेली प्रत्येक स्त्री आणि तिच्या दुःखात भिन्नता थोड्या प्रमाणत आढळून येते. 'मिटलेली कवाडे' या आत्मकथनात मुक्ता सर्वगोड यांनी ज्या स्त्री घर चालवण्यासाठी काम करतात आणि त्यांचे पती आपल्या बायकोच्या पगारावर जगतात या स्त्रियांचे दुःख त्यांनी माडले आहे. 'अंतःस्फोट' या आत्मकथनांतू कुमुद पावडे यांनी ज्या स्त्रिया आपल्या पतीला देव मानतात आणि हाच देव त्यांना दुःख देतो. पण त्या गप्प राहताना दिसून येत नाही त्या विदेनविरुद्ध आवाज उठवताना दिसून येतात. कुमुद पावडेचे हे आत्मकथन थोड्या प्रमाणात स्त्रीवादकडे जाताना दिसून येते. 'जिणं अमुचं' हे आत्मकथन तत्कालीन म्हार समाजाचे दर्शन घडवते. यात आलेल्या स्त्रिया या पतिव्रता

आहे. पतीच्या आज्ञाबाहेर त्या नाही. जे मिळाल त्यात समाधान मानून जीवन जगणाऱ्या त्या स्त्रिया आहे. त्याच्या समोर एकच प्रश्न असतो तो म्हणजे पोटाचा. भूक थांबवण्यासाठी त्या कष्ट करताना दिसून येतात. 'माज्या जल्माची चित्तरकथा' यात शांताबाई सासुरवासी स्त्रियांच्या वेदनेचे दर्शन घडवतात. त्यांच्याकडून रात्र दिवस काम करून घेतले जाते आणि त्यांना खायला काहीच दिले जात नाही. त्यांची घरात नोकरा एवढीच किंमत ठेवली जाते. अशा स्त्रियांचे दुःख त्यांनी मांडले आहे. प्रत्येकीला मिळालेली स्त्री आणि तिचे दुःख भिन्न आहे.

## ५.४ समारोप

‘निवडलेल्या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास’ या प्रकरणाच्या अंतर्गत सर्वात प्रथम ‘तुलना’ म्हणजे काय हे पहिले. त्यासाठी तुलनात्मक साहित्याची संकल्पना जाणून घेतली.या संकल्पनेच्या आधारे तुलनात्मक साहित्याच्या इतिहासाची जाण झाली. १९ व्या शतकात तुलनात्मक साहित्याला आरंभ झाला. नंतर विविध अभ्यासकांनी तुलनात्मक साहित्यावर केलेल्या व्याख्याच अभ्यास केला. हेन्री एच. एच. रेमाक या अभ्यासकांची व्याख्या तुलनात्मक साहित्यात महत्त्वाची आहे. या व्याखेला तुलनात्मक साहित्याची सर्वसाधारण व्याख्या म्हणून संबोधले जाते यांची जाणीव झाली. त्यानंतर तुलनात्मक साहित्याचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पुढे तुलनात्मक साहित्याची साम्य, भेद आणि प्रभाव ही तत्वे जाणून घेतली. पुढे निवडलेल्या आत्मकथनांची तुलना केली. त्यात बेबी कांबळे यांचे ‘जिणं आमुचं’, शांताबाई कांबळे यांचे ‘माज्या जल्माची चित्तरकथा’, कुमुद पावडे यांचे ‘अंतःस्फोट’ आणि मुक्ता सर्वगोड यांचे ‘मिटलेली कवाडे’ या आत्मकथनांची तुलना केली आहे. या तुलनेतून एक गोष्ट सिद्ध झाली ती म्हणजे एकाच समाजातील असल्या तरी त्याच्या दुःखात, वेदनेत, त्यांना आलेले अनुभव यात भिन्नता आहे.

## ५.५ निष्कर्ष

१. तुलनात्मक साहित्याला देश, सीमा आणि काळ ओलांडणारा अभ्यास म्हणून संबोधले जाते. कारण या अभ्यासात एका देशातील सहित्याकृतीची तुलना दुसऱ्या देशातील सहित्यकृतीशी केली जाते.

२. तुलनात्मक साहित्यात केवळ साम्य आणि भेद दाखवून देणे म्हणजे तुलना नाही. तर त्या भेदाची योग्य अशी  कारणे देऊन शेवटी निष्कर्ष काढणे आवश्यक असते.

३. चारही लेखिका एकाच दलित समाजातील असल्या तरी त्यांच्या जीवनात भिन्नता दिसते. प्रत्येकाच्या जीवनातील अनुभव, दुःख, वेदना या परस्पर विरोधी व भिन्न आहेत.

४. आत्मकथन लिहिण्यामागे भूमिका म्हणजे आपले जीवन इतरांना कळावे या उद्देशाने आत्मकथने लिहिलेली आहेत.

५. ‘अस्पृश्यता’ हे त्यांच्या दुःखाचे कारण होते. या कारणामुळे आलेले अनुभव या आत्मकथनात आलेले आहे.

६. साहित्यकृतीबरोबर त्या लेखकाची ही तुलना केली जाते. ही तुलना त्यांचे विचार, विषयाची निवड, आशय, सूत्र, मांडणी, तंत्र, वाक्यरचना, शब्दप्रयोग इत्यादिंमध्ये केली जाते.

७. तौलनिक साहित्याद्वारे वेगवेगळ्या देशातील साहित्यातील आदान प्रदान आणि परस्पर संबंध शोधले जाते.

**संदर्भ ग्रंथ**


१. मिरजकर, निशिकांत. “तौलनिक साहित्य.” प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. क्र. १

२. मिरजकर, निशिकांत. “तौलनिक साहित्य.” प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. क्र. ३

३. मिरजकर, निशिकांत. “तौलनिक साहित्य.” प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. क्र. ३

४. राऊत, अनंत. “तुलनात्मक साहित्य आणि विश्वकुटुंबाची घडण.” कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०११, पृ. क्र. ३१

५. मिरजकर, निशिकांत. “तौलनिक साहित्य.” प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. क्र. ११

६. मिरजकर, निशिकांत. “तौलनिक साहित्य.” प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. क्र. ११

७. राऊत, अनंत. “तुलनात्मक साहित्य आणि विश्वकुटुंबाची घडण.” कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०११, पृ. क्र. ३३

८. शेळके, भास्कर. “मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना.” शेळके प्रकाशन, पुणे, २०१३


------------------------------- xxxxxxxxxxxxxxxxxxxxxx ------------------------------

# प्रकरण ६

# निवडक स्त्री लिखित आत्मकथनांचे वाङ्मयीन मूल्यमापन

## प्रकरण ६ : निवडक स्त्री लिखित आत्मकथनांचे वाङ्मयीन मूल्यमापन

प्रास्ताविक........................................................................................१०९

६.१ बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनांचे मूल्यमापन.......११०

६.१.१ सत्यकथन...................................................................................११०

६.१.२ तटस्थवृत्ती..................................................................................११०

६.१.३ 'स्व' ला केंद्रस्थान .......................................................................११०

६.१.४ घटनांची निवड व कुशाल मांडणी..................................................१११

६.१.५वस्तुस्थितीदर्शक निवेदन................................................................१११

६.२ शांताबाई कांबळे यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांचे मूल्यमापन............ .......................................................................................१११

६.२.१ सत्यकथन...................................................................................१११

६.२.२ तटस्थवृत्ती..................................................................................११२

६.२.३ 'स्व' ला केंद्रस्थान........................................................................११२

६.२.४ घटनांची निवड व कुशाल मांडणी..................................................११३

६.२.५ वस्तुस्थितीदर्शक निवेदन...............................................................११३

६.३ कुमुद पावडे यांच्या 'अंत:स्फोट' या आत्मकथनांचे मूल्यमापन...........११३

६.३.१ सत्यकथन...................................................................................११३

६.३.२ तटस्थवृत्ती..................................................................................११३

६.३.३ 'स्व' ला केंद्रस्थान........................................................................११४

६.३.४ घटनांची निवड व कुशाल मांडणी..................................................११४

६.३.५ वस्तुस्थितीदर्शक दिवेदन...............................................................११४

६.४ मुक्ता सर्वगोड यांच्या 'मिटलेली कवाडे' या आत्मकथनांचे मूल्यमापन......११५

६.४.१ सत्यकथन........................................................................११५

६.४.२ तटस्थवृत्ती........................................................................११५

६.४.३ 'स्व' ला केंद्रस्थान..................................................................११५

६.४.४ घटनांची निवड व कुशाल मांडणी.................................................११५

६.४.५ वस्तुस्थितीदर्शक निवेदन...........................................................११६

६.५ समारोप...............................................................................११७

६.६ निष्कर्ष.................................................................................११७

संदर्भ ग्रंथ ..................................................................................११८

# प्रकरण ६ : निवडक स्त्री लिखित आत्मकथनांचे वाङ्मयीन मूल्यमापन

## प्रास्ताविक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाणीने - लेखणीने दलित समाज जागा होत गेला, संघटित होत गेला, तो लिहू - वाचू लागला, तो स्वतः वरील अन्याय - अत्याचार वाणीने - लेखणीने व्यक्त करू लागला. दलित चळवळ हीच दलित साहित्याच्या निर्मितीस कारणीभूत ठरली.

दलित साहित्यात इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणेच 'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकारही विकसित होत गेला. समाजातील शोषणाखाली भरडलेल्या व्यक्तींनी स्वतःचे अनुभव, स्वतःचे जगणे अतिशय मोकळेपणाने कथन केले. आत्मकथन हे व्यक्तीच्या वास्तव जीवनाचा आयुष्यपट सांगणारा वाङ्मयप्रकार आहे. आत्मकथनात त्या व्यक्तीला कळायला लागल्यापासूनचे जगणे आरंभ होते ते आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंतचा प्रवास असतो. आत्मकथनकाराच्या कथनशैलीमुळे वाचकाच्या मनावर परिणाम साधतो. परंतु लेखकाच्या जीवनातील घटना, प्रसंगच एवढे अस्वस्थ करून जातात की, शैलीची भूमिकासुद्धा प्रभावी वाटत नाही. एवढे सामर्थ्य दलित आत्मकथनात आहे.

बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं', शांताबाई कांबळे यांचे 'माज्या जल्माची चित्तरकथा', कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट' आणि मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे' या चारही आत्मकथनात वाङ्मयीन मूल्ये दडलेली आहेत. त्य वाङ्मयीन मूल्यांचा शोध या प्रकरणात घ्यायचा आहे.

## ६.१ बेबी कांबळे  यांच्या ‘जिणं आमुचं’ या आत्मकथनांचे मूल्यमापन

### ६.१.१ सत्यकथन

या आत्मकथनातील सर्व घटना प्रसंग लेखिकेशी व समाजाशी निगडित आहे. हे आत्मकथन केवळ तिचे एकट्याचे नाही तर धर्मांतरापूर्वीच्या ‘महार’ समाजाचे ते समाजचित्रण आहे. लेखिकेने आजूबाजूला जे पाहिले, अनुभवले त्याच अनुभवातून लेखन केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या आत्मकथनात सत्याचा खराखुरा अविष्कार दिसून येतो. सर्व घटना प्रसंगांना लेखिका स्वतः साक्षीदार होत्या त्यामुळे कुठेही सत्यकथन नसलेले आढळून येत नाही.

### ६.१.२ तटस्थवृत्ती

आत्मकथनकार हा निष्पक्ष असेल तरच आत्मकथन योग्य पद्धतीने मांडता येईल. लेखकाला जे मांडायचे आहे ते तो चांगल्या पद्धतीने मांडेल. आपल्या चांगल्या गोष्टींबरोबरच आपल्या वाईट गोष्टीचा म्हणजे दोषाचाही विचार करता आला पाहिजे. बदललेल्या दलित समाजावर आपला राग व्यक्त करताना त्या दिसून येतात. शहरी दलित समाजावार आपली नाराजी अगदी स्पष्टपणे व्यक्त केलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्व कर्त्याहून श्रेष्ठ आहे. जे देवालाही करता आले नाही ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजासाठी केले. एवढे करूनही त्यांच्याच बुद्धीवान माणसांनी बाबांना देहातून कडून टाकले. या लोकांच्या प्रती राग त्या व्यक्त करताना दिसून येतात. आपल्या समाजाला विसरलेल्या बाबसाहेबांच्या विचारांना, मूल्यांना दूर  सारणाऱ्या लोकांविषयी भाष्य करतात. त्यांनी आपल्या आत्मकथनांतून आपल्या समाजातील वाईट दोषही सांगितलेले आहे. लोकांची मानसिकता कशी बदलून जाते हे सांगीतलेले आहे. त्याचबरोबर आपल्या वाईट रीती-रीवजाविषयी त्यांनी सांगितलेले आहे. या अशा घटनांमुळे आपले आत्मकथन वाचकांना आवडणार नाही म्हणून त्यांनी आपल्या सामजाच्या वाईट गोष्टीवर पडदा टाकला नाही. तिने अगदी सुष्म पद्धतीने, सरळ मांडणी केली आहे.

### ६.१.३ ‘स्व’ ला केंद्रस्थान

आत्मकथनात ‘स्व’ हा महत्त्वाचा असतो कारण त्यांच्या भोवतीच आत्मकथन फिरत असते. ‘जिणं आमुचं’ या आत्मकथनात लेखिकेने स्वतः ला केंद्रस्थानी न ठेवता आपल्या समाजाला केंद्रस्थानी ठेवले आहे. संपूर्ण आत्मकथन ‘महार’ समाजाविषयी भाष्य करते. या आत्मकथनात व्यक्तीचा किंवा स्वतःचे जीवन आलेले नाही, तर मोठ्या प्रमाणात समाजदर्शनच घडते.

### ६.१.४ घटनांची निवड व कुशाल मांडणी

आत्मकथनात कोणत्या घटना-प्रसंगाची मांडणी करायची, आत्मकथनाची सुरूवात कुठून करावी, कुठे थांबावे इत्यादी. त्याचप्रमाणे मांडणी कशी असावी, कोणते प्रसंग घ्यायचे, अगदी थोडक्यात मांडणी करायची की सगळ्या गोष्टी सांगायच्या इत्यादी आत्मकथनकराच्या हातात असते. या आत्मकथनात लेखिकेने प्रत्येक घटना प्रसंगाचे वर्णन केलेले आहे. गावातील रेडे जत्रा असो की लग्न समारंभ असो प्रत्येक विधीचे वर्णन केले आहे. त्यांनी प्रत्येक घटना प्रसंगाला योग्य ज्ञाय दिला आहे. लेखिकेने कोणत्याच घटनेचे वर वर विवेचन केले नाही. त्यांनी निवडलेल्या प्रत्येक घटनेचे सखोल विवेचन केले आहे.

### ६.१.५वस्तुस्थितीदर्शक निवेदन

आत्मकथनकाराने संपूर्ण आयुष्यातील मोजक्याच घटनांची निवड करावी आणि त्याच्या आधारे संपूर्ण आत्मकथन लिहावे. लेखिकेने आत्मकथनात आपल्या जीवनाविषयी कमी आणि समजाविषयी अधिक सांगितलेले आहे. लेखिकेने आजूबाजूला जे पाहिले त्याच्या आधारे तिने आत्मकथन लिहिले. समाजातील महत्त्वाच्या वाटणाऱ्या अशा घटनांची निवड आत्मकथनात केली आहे. समाजातील लोकांची राहणीमान, त्यांची परस्थिती, दारिद्रय जीवन इत्यादी वास्तवाचे दर्शन घडवणाऱ्या घटनांची निवड केली आहे.

गणपतदादांनी गूळ समंजून मातीचा गोळा पिठात माळवला आणि भाकरी भाजून खालेली. जेव्हा त्यांची पत्नी येऊन त्या मातीच्या गुळयाला शोधायला लागली तर तिचा हाती गुळच लागे. या लोकांना माती आणि गुळ यातील फरक कळत नाही असा हा समाज होता. त्यांना काहीच कळत नव्हत, जनावरांप्रमाणेच ते वागत असे. त्यांना माणूस म्हण्याइतपत त्याच्याजवळ माणसा प्रमाणे हाथ- पाय, बोलू चालू शकतात म्हणून माणूस नाहीतर निव्वळ जनावर. त्या जनावरांना खायला तरी मिळते पण याच्या नशिबी तेही नाही.

## ६.२ शांताबाई कांबळे यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांचे मूल्यमापन

### ६.२.१ सत्यकथन

या आत्मकथनातील सर्व घटना-प्रसंग लेखिकेशी निगडीत आहे. लेखिकेने जे जीवन जगले, वाटेत आलेल्या अडचणी, दुःख इत्यादी सर्व आत्मकथनातून वाचकांसमोर आले आहे. सर्व घटना प्रसंग लेखिकेच्या अनुभवातून आलेल्या आहेत. लेखिका स्वतः साक्षीदार होत्या. त्यामुळे कुठेही सत्यकथन नसलेले आढळून येत नाही.

### ६.२.२ तटस्थवृत्ती

शांताबाई कांबळे यांनी हे आत्मकथन तटस्थवृत्तीने लेखन केले आहे. त्यांना जे मांडायचे आहे ते तिने प्रांजळ, प्रामाणिक आणि सरळ मांडलेले आहे. तिने आपल्या जीवनातील चांगल्या गोष्टींबरोबरच वाईट गोष्टीचे लेखन सूक्ष्मरित्या मांडलेले आहे. नवऱ्याचे गुण वाईट आहे हे त्यांना लग्नाच्या वरातीला एका बाईकडून कळले तरीही त्याच्या कुटुंबाने तिचे लग्न मस्तराशी लावून दिले. मास्तर आपल्या फायद्यासाठी मामाच्या मुलीशी लग्न करतो. तेव्हा त्या मास्तरांना सरळ सोड चिठ्ठी द्या म्हणून सांगते आणि मास्तरांचे घर सोडून माहेरी राहायला येते. पतीला सोडले तर आपल पुढे काय होणार?, कसे जीवन जगणार, लोकांना कसे सामोरे जाणार याचा विचार करत नाही. तिच्या मनाला जे पटले नाही तिथे त्या सरळ निर्णय घेताना दिसून येतात.

### ६.२.३ 'स्व' ला केंद्रस्थान

संपूर्ण आत्मकथन शांताबाई कांबळे याच्या भोवती फिरताना दिसून येते. आत्मकथनांत योग्य पात्राची निवड करून स्वतःचे व्यक्तिमत्व कसे विकसित होणार याची दखल तिने घेतलेली आहे. वडील, पती, बहीण, भाऊ, आई, आणि इतर गौण पात्रांच्या मदतीने व्यक्तीमत्व विकसित करण्यास महत्त्वाचा वाटा आहे. लेखिकेच्या आईला आपल्या मुलीने खूप शिकावे अशी इच्छा होती. आपण अडाणी असलो म्हणून मुलांना अडाणी ठेवले नाही. तिला शिक्षणाचे महत्त्व माहीत होते.आपल्या आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी तिने खूप कष्ट घेतलेले दिसून येते. पण तिचे हे श्रेय आपल्या डोळयांनी पाहण्याच्या वेळेला तिचे निधन झाले. आईच्या शिक्षणाच्या आवडीमुळेच त्या शिक्षणाकडे वळल्या. शिक्षण मिळवण्यासाठी लेखिकेच्या आईचे महत्त्वाचे योगदान आहे.

### ६.२.४ घटनांची निवड व कुशाल मांडणी

या आत्मकथनात आलेल्या सर्व घटना प्रसंग लेखिकेच्या जीवनाशी निगडीत आहे. शांताबाईच्या घरगुती अडचणी, शाळेवरच्या बदल्या, कांबळे मास्तर आणि तिच्यामधील वादावाद, दलित म्हणून भोगाव्या लागणाऱ्या वेदना इत्यादी घटना प्रसंग आलेले आहे. लेखिकेने कोणत्याच घेटनेचे सखोल चिंतन केले नाही. त्या सरळ मांडणी करताना दिसून येतात. आपल्या पदरच किंवा उगाच वाढून सांगत नाही. कोणतीही घटना त्या सहज भाष्य करताना दिसून येतात. पण त्यातून खूप काही अर्थ बोध होऊन जातो. " अपून पंढरपूरला आलूया अन् अपनाला देवळात जाऊ का देत नाहीत? मग आपण कशाला पंढरपूरला आलूया?." त्याची लेखणी ही

खूपच सुटसुटीत आहे. तिने आपल्या जवळच्या अनेक माणसाचे मृत्यू पाहिलेले आहे. या सर्वांचे मृत्यू मनाला चटके लावून जातात. आपल्याला जीवनाविषयी सांगताना तिने योग्य घटना प्रसंगाची निवड केलेली दिसून येते.

### ६.२.५ वस्तुस्थितीदर्शक निवेदन

लेखिकेने आपल्या आयुष्यावर भाष्य करताना मोजक्याच घटनांची निवड केलेली आहे. त्या घटनांच्या आधारेच त्या आपल्या जीवनावर भाष्य करताना दिसून येतात. पण त्यातील सर्वच घटना मनाला पटणाऱ्या असतील असे नाही. काही घटना आहे ज्या मनाला न पटणाऱ्या आहेत. या समाजातील लोकांच्या मानसिकतेचे दर्शन घडवणाऱ्या घटना आहेत. कोणी आजारी पडला तर कुठे कुठे भटकून देवाचा अंगारा लावला जातो. तो लावला की माणूस बरा होतो अशी त्याची मानसिकता होती. लेखिकेच्या आईचा अंगात देव बसला होता. गावात कोणी आजारी पडल्यावर तिच्या अंगात यायचा. आजारी व्यक्तीला तिने अंगारा लावल्यावर त्या व्यक्तिला बरे वाटायचे. अशा मानसिकतेची माणसे या समाजात राहत होती. अंगारा लावला की माणूस बरा होतो हे कुठे तरी न पटण्यासारखे आहे.

## ६.३ कुमुद पावडे यांच्या 'अंत:स्फोट' या आत्मकथनांचे मूल्यमापन

### ६.३.१ सत्यकथन

कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट' हे आत्मकथन पूर्णतः त्याच्या जीवनावर आधारीत आहे. यात आलेले घटना प्रसंग लेखिकेशी निगडीत आहे. त्यामुळे संपूर्ण आत्मकथनात सत्याचा खराखुरा आविष्कार दिसतो. आपल्याच लोकांकडून मिळालेली वागणूक यांचे दर्शन लेखिकेने केले आहे. आत्मकथनात कुठेच सत्याचे पात्र खाली पडताना दिसत नाही.

### ६.३.२ तटस्थवृत्ती

लेखिकेला जे मांडायचे आहे ते चांगल्या पद्धतीने मांडलेले आहे. कोणाला न घाबरता तिला जे सांगायचे आहे ते तिने सांगितलेले आहे. आपल्या स्वतः च्या माणसाविषयी तिने तटस्थ राहून लेखन केलेले आहे. आपल्या सासरच्या माणसांशी तिच्या प्रती वागणुकीचे चित्रण केलेले आहे. त्याचबरोबर आपल्याच समाजातील माणसे कशी दुसऱ्या लोकांना छळतात याविषयी तिने लेखन केलेले आहे. आपल्या चांगल्या गोष्टींबरोबरच आपल्या वाईट गोष्टींचे दर्शन घडविलेले आहे. आंतरजातीय विवाह केला म्हणून पोटच्या मुलाशी नाते तोडले. ज्यांनी

लग्नाच्या वेळी पुढाकार घेतला त्याच दिरांनी पुढे जाऊन शिव्याची बरसात केली.त्यांचे लेखन हे केवळ टिकेपुरतेच मर्यादित राहत नाही, तर त्या घटनेवरील प्रांजळ प्रतिक्रियाही असते.

### ६.३.३ 'स्व' ला केंद्रस्थान

आत्मकथनात 'स्व' हा महत्त्वाचा असतो. 'स्व' चे दर्शन आले नाही तर त्या आत्मकथनाला महत्त्व राहणार नाही. हे सूत्र लक्षात धरुनच लेखिकेने आत्मकथन लिहिले आहे. संपूर्ण आत्मकथन लेखिकेभवती फिरताना दिसून येते. आपल्याला केंद्रस्थानी ठेवून तिने लेखन केले आहे. त्याचप्रमाणे पात्राची निवडही आपले व्यक्तीमत्व विकसीत होणार याचे भान ठेवून केलेली आहे. शाळेतील शिक्षक तिच्या विरोधात होते त्यामागचे कारण एका दलित मुलीने संस्कृत भाषा शिकावी हे त्यांना पटत नव्हते. तसेच समाजालाही पटत नव्हते. या अशा घटनेमुळे व्यक्तिमत्व विकसीत होताना दिसून येते.

### ६.३.४ घटनांची निवड व कुशाल मांडणी

या आत्मकथनात लेखिकेने योग्य घटनांची निवड केलेली दिसून येते. त्या कोणत्याही घटनेची केवळ मांडणी किंवा ती घटना हुबेहू व वाचकाच्या डोळयासमोर उभी करत नाहीत, तर त्या घटनेच्या आधारे असलेली आपल्या मनातील भावना आणि आपले मत लगेच व्यक्त करत. त्यांच्या लेखणीत दुसऱ्या व्यक्तीशी सहज संवाद साधण्याचे सामर्थ्य आहे. स्त्रीजीवनविषयक जिव्हाळयामुळे त्यांचे लेखन हे आपल्याशी संवाद साधत आहे असे वाटते.

### ६.३.५ वस्तुस्थितीदर्शक दिवेदन

लेखिकेने ज्या घटनांची निवड केलेली आहे त्या घटनाना योग्य न्याय दिलेला आहे. त्याच्या घटनांमधून वास्तवाचे दर्शन घडते. 'जात' हा असा प्रकार आहे जो आपल्या पोटच्या गोळयाशी संबंध तोडून टाकतो. आंतरजातीय विवाह केला म्हणून एका बापाने आपल्या रक्ताच्या मुलाशी नाते तोडले. या भयानक वास्तवाचे दर्शन कुमुद पावडे आपल्या आत्मकथनातून घडविते. मोजक्याच पण उत्तम घटनांची निवड करून आत्मकथन पूर्ण केले आहे. काही अशा घटना आहे ज्या मनाला पटत नाही पण ते समाजातील वास्तव आहे. समाज स्त्रियांना आपले गुलाम समजतो. काही स्त्रियांना हे पटत पण काहीना पटत नाही आणि त्यावेळी त्या आवाज करताना

दिसून येतात. पटणाऱ्या स्त्रिया आपल्या पतीच्या पायाचे तीर्थ घेऊन दिवसाची सुरुवात करतात. असे करणे तिच्या मनाला पटत नाही.

## ६.४ मुक्ता सर्वगोड यांच्या 'मिटलेली कवाडे' या आत्मकथनांचे मूल्यमापन

### ६.४.१ सत्यकथन

आत्मकथन हे स्वतः लेखिकेचे असल्या कारणाने लेखिका या आत्मकथनाच्या नायिका आहे. संपूर्ण आत्मकथन तिच्या भोवतीच फिरताना दिसून येते. त्याच्या आठवणीतून आयुष्यातील एक एक पान घटनांच्या माध्यमांतून पुढे सरकत जाते. त्या स्वतः घटनांच्या साक्षीदार असल्या कारणाने त्याच्या आत्मकथनात सत्याचा आविष्कार दिसून येतो.

### ६.४.२ तटस्थवृत्ती

मुक्ता सर्वगोड ह्या समाज कार्यकर्ता असल्याकारणाने त्याच्या लेखनात तटस्थपणा दिसून येते. त्या समाजकार्यकर्त्या म्हणून वाचकांशी संवाद साधत असते. त्यामुळे त्यांच्या इतर व्यक्तिगत आयुष्यावर फारसा प्रकाश न पडता फक्त त्यांच्या सामाजिक जीवनाची आपणास दर्शन घडत राहते. त्यांचे लेखन हे प्रांजल प्रामाणिक आणि सरळ आहे. त्यांना जे मांडायचे आहे ते त्यांनी चांगल्या पद्धतीने मांडलेले आहे.

### ६.४.३ 'स्व' ला केंद्रस्थान

मिटलेली कवाडे हे संपूर्ण आत्मकथन लेखिकेभोवती फिरताना दिसून येते. यात आलेल्या घटना प्रसंग लेखिकेचे व्यक्तिमत्व विकसित करते. समाज कार्यकर्त्या असल्याकारणाने आपल्या समाजासाठी त्या लढताना दिसून येतात. आपल्या समाजकार्याला त्यांनी केंदस्थानी ठेवले आहे. दलित समाजाविषयी काही तरी करण्यासाठी त्याची धडपड चालू असते. त्याची ही धडपड त्यांचे व्यक्तिमत्व विकसित करते.

### ६.४.४ घटनांची निवड व कुशाल मांडणी

मुक्ता सर्वगोड यांनी आपल्या आत्मकथनात योग्य घटनांची निवड केली आहे. त्यांनी आपल्या वयक्तिक जीवनावर फारसा प्रकाश न पडता आपल्या समाजकार्यावर अधिक अधिक प्रकाश टाकला आहे. आपल्या वयक्तिक जीवनावर वर वर भाष्य केलेले दिसून येते. पण आपल्या कार्याचा सखोल विचार केलेला आहे. त्या

स्वतः आत्मकथनाची नायिका असल्या कारणाने कोणती घटना घ्यावी कोणती नाही याचा अधिकार त्यांना आहे. या अधिकारामुळे त्यांनी आपल्या समजकर्यावर जास्त लक्षकेंद्रित केलेले दिसून येते.

### ६.४.५ वस्तुस्थितीदर्शक निवेदन

लेखिकेच्या आयुष्यात बऱ्याच घटना घडलेल्या असतात. त्यातल्या मोजक्याच घटनांची निवड करून त्यांनी आत्मकथन लिहिले आहे. पुरुष समाजाचे एक वेगळेच रूप या आत्मकथनातून दिसून येते. पुरुष हे आपल्या पत्नीच्या पगारावर जीवन जगताना दिसून येतात. स्त्रिया कामाला जातात आणि पुरुष घरी बसून राहतात. त्यांना या गोष्टीची लाज वाटत नाही. या अशा वेगळ्याच पुरुष समाजाचे दृष्य दिसून येते.

## ६.५ समारोप

‘निवडक स्त्री लिखित आत्मकथनांचे घटकाद्वारे मूल्यमापन’ या प्रकरणात सर्वात प्रथम बेबी कांबळे यांचे ‘जिणं आमुचं’ या आत्मकथनाचा अभ्यास करण्यात आला आहे. सत्यकथन, तटस्थवृत्ती, ‘स्व’ ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशाल मांडणी, वस्तुस्थितीदर्शक निवेदन या घटकाद्वारे मूल्यमापन करण्यात आले आहे. पुढे शांताबाई कांबळे यांचे ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मकथनाचे घटकाद्वारे मूल्यमापन करण्यात आले आहे. आत्मकथनात सत्यकथन हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे याची जाणीव या अभ्यासाद्वारे झाली. नंतर कुमुद पावडे यांचे ‘अंत:स्फोट’ या आत्मकथनाचा अभ्यास करण्यात आला. कुमुद पवाडे यांच्या लेखनशैलीचा अभ्यास केला. पुढे मुक्ता सर्वगोड  यांचे ‘मिटलेली कवाडे’ या आत्मकथनाचे घटकाद्वारे मूल्यमापन करण्यात आले. त्याच्यातील समाजकार्यकर्त्यांविषयी जाणून घेतले.

## ६.६ निष्कर्ष

१. आत्मकथनातील सर्व घटना-प्रसंग आत्मकथनकाराच्या जीवनाशी निगडीत असतात. त्या व्यक्तीने जे जीवन जगले, त्याच्या वाट्याला आलेल्या अडचणी, दु:ख इत्यादी सर्व घटना आत्मकथनातून वाचकांसमोर येतात

२. आत्मकथनकाराला आपल्या चांगल्या गोष्टींबरोबरच आपल्या वाईट गोष्टीचा, आपल्या दोषाचा विचार आत्मकथनात करता आला पाहिजे.

३. आत्मकथनाची सुरूवात कुठून करावी, मांडणी कशी असावी, कोणते प्रसंग घ्यायचे, अगदी थोडक्यात मांडणी करायची की सगळ्या गोष्टी सांगायच्या इत्यादी सर्व आत्मकथनकराच्या हातात असते.

४. आत्मकथनकार आपल्या आयुष्यावर भाष्य करत असताना मोजक्याच घटनांची निवड करून त्या घटनांद्वारे आत्मकथन लिहीत असतो.

## संदर्भ ग्रंथ

१. सांगोलेकर, अविनाश. "दलित साहित्य: प्रवाह आणि प्रकार." प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८

२. मुलाटे, वासुदेव. "दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप." स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९

३. गरुड, शामल. "दलित स्त्री आत्मकथनेयशश्री." प्रकशन, पुणे, २०१०

------------------------------------------ xxxxxxxxxxxxxxxxx -------------------------------------

# प्रकरण ७

# समारोप आणि निष्कर्ष

# प्रकरण ७ : समारोप आणि निष्कर्ष

**'दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास : निवडक आत्मकथनांच्या संदर्भात'** या विषयाचा अभ्यास एकूण सहा प्रकरणाद्वारे केलेला आहे. या विषयातील हे सहावे व शेवटचे प्रकरण म्हणजे समारोप व निष्कर्ष होय.

प्रबंधिकेचे पहिले प्रकरण **'दलित साहित्य : संकल्पना स्वरूप आणि वाटचाल'** या प्रकरणांमध्ये दलित साहित्याच्या पार्श्वभूमीचा अभ्यास केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध प्रकारांच्या चळवळीने त्यांनी दलित समाजातील लोकांना जीवन जगण्याची दिशा दिली. त्याचप्रमाणे दलित कोणाला म्हटले जाते, दलित साहित्याची संकल्पना, व्याख्या व स्वरूप इत्यादींचा अभ्यास केला आहे. तसेच दलित साहित्याच्या वाटचालीचा आढावा घेतला आहे.

**'मराठी दलित आत्मकथने आणि स्त्रियांची आत्मकथने'** या दुसऱ्या प्रकरणात 'आत्मचरित्र' या प्रकाराचा आढावा घेतला आहे. तसेच आत्मचरित्राची संकल्पना व विविध अभ्यासकांनी मांडलेल्या मतांचा अभ्यास केला आहे. नंतर आत्मकथनांची संकल्पना, व्याख्या, स्वरूप आणि वैशिष्ट्यांचा आढावा घेतला आहे. पुढे आत्मचरित्र व आत्मकथन या दोन्ही प्रकारामधील साम्य भेदांचा अभ्यास केला आहे. 'आत्मचरित्र' हा प्रकार आत्मचरित्रकार वयाच्या शेवटच्या क्षणात लिहितो. पण 'आत्मकथन' हा असा प्रकार आहे जो लेखक कधीही लिहू शकतो. आयुष्याच्या कोणत्याही वर्षी तो लिहू शकतो. आत्मकथन हा प्रकार आत्मचरित्राप्रमाणे भूतकाळात चालत नाही तर तो भूतकाळाबरोबर वर्तमान काळातही चालू असतो. भूतकाळातील भोगलेले जीवन आणि वर्तमानात बदलणारे जीवन यांची रूपरेषा दलित आत्मकथनात दर्शवलेली आहे. हा फरक या अभ्यासातून स्पष्ट झाला.

**'निवडक दलित स्त्री आत्मकथनांतून दिसून येणाऱ्या दलित आणि स्त्री जाणिवा'** या प्रकरणात निवडलेल्या चारही आत्मकथनांतील दलित आणि स्त्री जाणीवांचा आढावा घेतला आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, मानसिक दृष्टीने समाजाने त्यांचे शोषण केले आहे आणि याच शोषणातून दलित जाणीव निर्माण झाली आहे. तसेच दलित स्त्रियांचे जीवन हे दुःखाने वेदनेने दारिद्र्याने भरलेले असते. यांच्या विचारांना, भावनांना

समाजात स्थान नाही. तिचे सर्व अंगाने शोषण केले जाते. ती आवाज न करता त्या सर्व यातना सहन करत असे. या चारही आत्मकथनातून दलित स्त्रियांच्या शोषित जीवनाचा अभ्यास केला आहे.

**‘निवडलेल्या आत्मकथनाचा तुलनात्मक अभ्यास’** या चौथ्या प्रकरणात तुलनात्मक साहित्याची संकल्पना व स्वरूप इत्यादींचा अभ्यास केला आहे. पुढे तुलनात्मक साहित्याची साम्य भेट आणि प्रभाव ही तत्त्वे जाणून घेतली. बेबी कांबळे यांचे ‘जिणं आमुचं’, शांताबाई कांबळे यांचे ‘माज्या जल्माची चित्तरकथा’, कुमुद पावडे यांचे ‘अंतःस्फोट’ आणि मुक्ता सर्वगोड यांचे ‘मिटलेली कवाडे’ या आत्मकथनांची सर्व अंगाने तुलना केलेली आहे. एकाच समाजातील असल्या तरी त्यांच्या दुःखात भिन्नता जाणवून येते. त्यांचे जीवन त्यांना आलेले अनुभव, वेदना, दुःख इत्यादींत भिन्नता आहे.

**‘निवडक स्त्री लिखित आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन’** या पाचव्या प्रकरणात निवडक स्त्रियांच्या आत्मकथनांचे मूल्यमापन करण्यात आले. सत्यकथन, तटस्थवृत्ती, ‘स्व’ ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशाल मांडणी, वस्तुस्थितीदर्शक निवेदक या घटकाद्वारे मूल्यमापन करण्यात आले.

**प्रकरण पाचवे ‘समारोप व निष्कर्ष’** असे असून या प्रकरणात एकूण प्रबंधिकेचा समारोप व निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

अशाप्रकारे मी एकूण सहा प्रकरणाद्वारे **‘दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास : निवडक आत्मकथनांच्या संदर्भात’** अभ्यास केला आहे. यातील उणीवांची मला जाणीव आहे. परंतु मी हा प्रयत्न केला आहे.

## निष्कर्ष

१९६० नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह दिसून येऊ लागले. त्यातले दोन मुख्य टप्पे म्हणजे ग्रामीण साहित्या आणि दलित साहित्य. या प्रवाहाच्या आगमनाने साहित्यात खूप मोठा बदल दिसून येऊ लागला. त्या त्या जाणिवातील लोक एकत्र येऊन लेखन करू लागले आणि त्यातूनच हे प्रवाह जन्माला आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे दलित शोषित समाज अधिक प्रचंड वैचारिक क्रांती झाली. समाजातील सर्व लोकांना शिक्षण मिळाल्याने त्यांना आपल्यावर अन्याय होतो याची जाणीव झाली. शिक्षणामुळे समाज सुशिक्षित झाला.

त्यांना ‘स्व’ ची जाणीव झाली. या जाणिवेतूनच आपले दुःख, वेदना, यातना, त्रास, अनुभव इत्यादी साहित्याद्वारे समाजासमोर आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. दलित लेखकाबरोबर स्त्री लेखिकेचे पण दलित साहित्यात महत्त्वाचे योगदान आहे. दलित स्त्री म्हणून तिला भोगाव्या लागणाऱ्या वेदना दुःख दारिद्र्य अनुभव इत्यादींचा अभ्यास ‘दलित स्त्री लिखित आत्मकथनांचा अभ्यास : निवडक आत्मकथनाच्या संदर्भात’ या प्रबंधिकद्वारे केला आहे.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली समाजातील वेगवेगळ्या जाती-जमातीतील लोकांना शिक्षण मिळाले आणि त्यामुळे दलित साहित्य निर्माण झाले.
२. शिक्षणाचा लाभ सर्व समाजातील लोकांना झाल्यामुळे मराठी साहित्यात नवनवीन वाङ्गयीनप्रवाहाचा जन्म झाला.
३. दलित साहित्याचा उदय हा नवे अनुभवविश्व व मूल्यात्मक संवेदना देणारी घटना आहे.
४. दलित लेखक हा शोषणाविरुद्ध बोलतो, शोषणाविरुद्ध लिहितो, वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थावर आघात करतो त्याचप्रमाणे तो हिंदू धर्माला नाकारतो आणि दलित जीवन मूल्याचे दर्शन घडवितो.
५. दलित साहित्य हे विद्रोहाचे, वेदनेचे, नकाराचे साहित्य असले तरी त्यांचा हेतू एकच असतो तो म्हणजे समाज परिवर्तन.
६. दलित साहित्यातील विद्रोह हा केवळ एका व्यक्तीविषयी किंवा केवळ समाजाविषयी नाही तर हा विद्रोह असमानतेविषयी आहे.
७. दलित साहित्यात लेखक जरी स्वतः विषयी बोलत, लिहीत असला तरी तो अनुभव त्याचा एकट्याचा नसून पूर्ण समूहाचा असतो.
८. ‘आत्मकथन’ या प्रकाराचा उदय हा दलित साहित्यिकांनी केला आहे.
९. ‘आत्मचरित्र’ लिहिण्यामागचा आत्मचरित्रकाराचा हेतू म्हणजे आपल्या मनातील भावना, जीवन जगत असताना जे अनुभवल, दुःख, सुख इत्यादी सर्व आत्मचरित्रात सांगून आपला ताण मुक्त व्हावा या हेतूने तो लेखन करीत असतो.

१०. 'आत्मकथन' हा प्रकार विशिष्ट समाजातील लोकांनी हाताळलेला असल्याकारणाने त्यात विशेषतः दारिद्र्याचे व भुकेचे चित्रण आलेले आहे.

११. आत्मकथनकार आपल्या पुरतीच मर्यादित राहत नाही तर आपल्याबरोबर समष्टीचेही दर्शन घडवितो.

१२. 'आत्मकथन' या प्रकाराची चिकित्सा करता मोठ्या प्रमाणात आत्मकथनात आत्मकथनकाराचे दुःख आलेले दिसून येते.

१३.दलित आत्मकथनातील अनुभव हे प्रामुख्याने वर्णव्यवस्थेमुळे म्हणजेच जातीविशिष्ट आहेत.

१४. दलित साहित्यात वेदना, विद्रोह, दुःख, माणसाच्या स्वातंत्र्यासाठी धडपटणारे, वर्णव्यवस्थेविरुद्ध बंड करणारे, माणसाला महान बनवणारे या सर्वांचा समाविष्ट असतो.

१५.अन्याय आत्मकथनाच्या तुलनेत बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं' हे आत्मकथन वेगळे ठरले त्या मागचे कारण म्हणजे त्यांनी आपल्या समाजाविषयीचे केलेले अचूक चित्रण होय.

१६. या समाजाची नाळ अस्पृश्यतेशी तसेच त्यांचे जन्म-जन्माचे नाते या अस्पृश्यतेशी जुळलेले आहे.

१७. एक स्त्री कष्ट करून शिकून एका मोठ्या पदावर पोहोचते, पण अस्पृश्यता तिची पाठ सोडत नाही.

१८.आत्मकथनात वास्तव चित्रण रेखाटलेले आहेत.

१९. समाजात सर्वात जास्त छळ कोणाचा झाला असेल तर तो दलित स्त्रियांचा. कारण तिला बहुजन समाजही छळतो आणि तिची स्वतः माणस ही छळत असतात.

२०.समाज दलित स्त्रियांच्या दारिद्र्य जीवनाचा फायदा घेताना दिसून येतो. तिला कशाची गरज आहे याची जाणीव समाजाला नाही.

२१.तुलनेद्वारे माणूस जीवनातील विविध घटकांचा शोध घेऊन त्यांच्या गुण, मर्यादा, दोष सांगता येतात.

२२.तुलनेद्वारे साहित्यकृतींच्या गुणवैशिष्ट्यांचा शोध येणे शक्य आहे.

२३.साहित्यकृतीबरोबर त्या लेखकाची ही तुलना केली जाते. ही तुलना त्यांचे विचार, विषयाची निवड, आशय, सूत्र, मांडणी, तंत्र, वाक्यरचना, शब्दप्रयोग इत्यादिंमध्ये केली जाते.

२४. तौलनिक साहित्याद्वारे वेगवेगळ्या देशातील साहित्यातील आदान प्रदान आणि परस्पर संबंध शोधले जाते.

२५.तौलनिक साहित्यात केवळ साम्य आणि भेद दाखवून देणे अपेक्षित नसते, तर त्या भेदाची योग्य अशी कारणे देऊन शेवटी निष्कर्ष काढणे अपेक्षित असते.

२६.अस्पृश्यता' हे त्यांच्या दुःखाचे कारण होते. या कारणामुळे त्यांना आलेले अनुभव या आत्मकथनातून आलेले आहे.

२७.चारही लेखिका एका समाजातील असल्या तरी त्यांच्या प्रत्येकांच्या जीवनात भिन्नता दिसते. प्रत्येकांच्या जीवनातील अनुभव, दुःख, वेदना या परस्पर विरोधी व भिन्न आहेत.

२८.आत्मकथनकाराच्या जीवनातील घटना, प्रसंग एवढे अस्वस्थ करून जातात की, शैलीची भूमिकासुद्धा प्रभावी वाटत नाही.

२९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या समाजासाठी विश्व कार्यकर्त्याहून श्रेष्ठ आहे. जे देवालाही करता आले नाही ते त्यांनी या समाजासाठी केले. त्यांनी या लोकांचे 'आत्मभान जागृत. केले यावरून सिद्ध होते.

३०.या समाजातील लोकांचा अंधश्रद्धेवर मोठ्या प्रमाणात विश्वास होता.

३१. कुमुद पावडे यांच्या लेखणीत दुसऱ्या व्यक्तीशी सहज संवाद साधण्याचे सामर्थ्य आहे.

३२.मुक्ता सर्व गोड यांचे लेखन हे प्रांजळ, प्रामाणिक आणि सरळ आहे त्यांना जे मांडायचे आहे ते त्यांनी चांगल्या पद्धतीने मांडलेले आहे.

३३. शांताबाई कांबळे यांनी आपल्या जीवनातील चांगल्या गोष्टी बरोबर वाईट गोष्टीचे लेखन सूक्ष्मरित्या मांडलेले आहे.

३४. बेबी कांबळे यांनी आपल्या समाजातील वाईट गोष्टींवर वाचकांना आवडणार नाही म्हणून पडदा टाकला नाही.

# परिशिष्टे

## परिशिष्ट १

### १. लेखिकांची छायाचित्रे



बेबी कांबळे



शांताबाई कांबळे




कुमुद पावडे



मुक्ता सर्वगोड


## परिशिष्ट २


### १.२ निवडलेल्या आत्मकथनांची मुखपृष्ठे









## संदर्भ ग्रंथ

१. लिंबाळे, शरणकुमार. "साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह." दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१४

२. निंबाळकर, वामन. "दलित साहित्य : स्वरूप व भूमिका." प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९८६

३. कऱ्हाडे, स.दा. "दलित साहित्य चिकित्सा." स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०११

४. मनोहर, यशवंत. "दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप." प्रबोधन प्रकाशन, औरंगाबाद, १९७८

५. सांगोलेकर, अविनाश. "दलित साहित्य : प्रवाह आणि प्रकार." प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८

६. पगारे, म.सु. "दलित साहित्याचा इतिहास." प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००५

७. गंधारे, द.के. "मराठी वाङ्मय प्रकार : स्वरूप संकल्पना व वाटचाल." शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१५

८. लुलेकर, प्रल्हाद. "वेदनांचा प्रदेश." कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०००

९. कऱ्हाडे, स. दा. "चरित्र आत्मचरित्र." आवरण प्रकाशन, गिरगाव, १९७६

१०.मोराळे, महालक्ष्मी. "आत्मचरित्रात्मक कादंबरी वाङ्मयप्रकार व वाङ्मयचर्चा." पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१०

११.विमाल, "आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास." साहित्यप्रसार केंद्र, नागपूर, १९८५

१२.महोनार,यशवंत. "दलित स्वकथने." प्रबोध प्रकाशन, नागपूर, १९८२

१३.कऱ्हाडे, स. दा. "साहित्य विश्लेषण." स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९

१४. मुलाटे, वासुदेव. "दलितांची आत्मकथने." स्वरूप प्रकाशन, पुणे, १९९

१५.मिरजकर, निशिकांत. "तौलनिक साहित्य." प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१६

१६.राऊत, अनंत. "तुलनात्मक साहित्य आणि विश्वकुटुंबाची घडण." कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०११

१७.शेळके, भास्कर. "मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना." शेळके प्रकाशन, पुणे, २०१३

१८.गरुड, शामल. "दलित स्त्री आत्मकथनेयशश्री." यशश्री प्रकाशन, पुणे, २०१०

१९.मनोहर, यशवंत. "आंबेडकरवादी मराठी साहित्य", प्रकाशन भीमरत्न म्हैसकर निवास, नागपूर,१९९९

२०.धोंगडे, रमेश. "दलित आत्मचरित्र साहित्य आणि समाज." दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९२

२१.लिंबाळे, शरणकुमार. "दलित आत्मकथा एक आकलन." दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१०

२२.सांगोलेकर, अविनाश. “दलित साहित्य उगम आणि विकास.” प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१०

२३.कांबळे, संजयकुमार. “दलित स्त्रियांच्या मुक्तीचा प्रश्न.” प्रकाशन डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१६

२४.भागवत, विद्युत.”स्त्रियांचे मराठीतील निबंध लेखन.” प्रकाशन साथिया अकॅडमी, दिल्ली, २०१३

२५.पगारे, म.सु. “ग्रामीण – दलित साहित्याचा अनुबंध.” दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१०

२६.पाटील, आशुतोष. “स्त्री-लिखित साहित्य संदर्भ आणि चिकित्सा.” शब्दालयप्रकाशन, श्रीरामपूर, २०१५

२७.अहिरे, प्रतिभा.”समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने.” कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २०११

**आधार ग्रंथ**

१. कांबळे, बेबी. “जिणं आमचं.” मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९०

२. कांबळे, शांताबाई. “माझ्या जन्माची चित्तरकथा.” सुगाव प्रकाशन, पुणे, १९९०

३. पावडे, कुमुद. “अंतः स्फोट.” सुगाव प्रकाशन, पुणे, १९८१

४. सर्वगोड, मुक्ता. “मिटलेली कवाडे.” सुगाव प्रकाशन, पुणे, १९८३